साप्ताहिक माणूस

२२ मे ८४/२ रुपये

# दूरदर्शनवर ज्ञानदीप की अज्ञानदीप ?

लेख
मुलाखती
प्रतिक्रिया



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : पन्नासावा

१२ मे १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## सप्रेम नमस्कार १

'साप्ताहिक माणूस' चा २१ एप्रिलचा अंक वाचला. 'सह्याद्री वाचवा–आता गरज आहे रणशिंगाची!' आणि 'मंचर–एका कॉलेजने बदलेला परिसर!' हे दोन्ही लेख मनापासून आवडले. 'सह्याद्री' ला वाचवण्यासाठी 'मंचर' चा प्रयोग निष्ठेने करावयास हवा. घराघरातून वृक्षसंवर्धनाचे महत्त्व जेव्हा पटेल तेव्हाच हा विनाश थांबेल! जन–जागरण युद्धपातळीवर करावयास हवे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या वाढदिवशी एक वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास गल्लोगल्ली सह्याद्री निर्माण होतील! राष्ट्रीय सेवा योजना, रोटरी क्लब, लायन्स क्लब ह्यासारख्या समाजसेवी संस्थांनी आपल्या सभासदांच्या संख्येएवढे वृक्ष प्रतिवर्षी लावले व वाढवले तर उध्वस्त वनश्रीचे दुःस्वप्न सत्यात येणार नाही. 'हम दो, हमारे दो' हा कुटुंबनियोजनाचा कानमंत्र आणि 'हम दो, हमारे दो सौ' असा वृक्षसंवर्धनाचा संदेश प्रत्येकाने आचरणात आणावयास हवा. अन्यथा मानवी वंशाचा विनाश अटळ आहे! शासकीय व अशासकीय संस्था, कार्यालये, शिक्षणसंस्था, देवालये, प्रार्थनास्थळे ह्यांमधून काम करणाऱ्या सेवकांनी कर्तव्य म्हणूनच आपल्या परिसरात वृक्षसंवर्धन करावे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवून हरितक्रांतीचे स्वप्न साकार करण्यासाठी श्रमअर्घ्य द्यावयास हवे. 'वृक्षनाश म्हणजेच विनाश' हे कटुसत्य प्रत्येकाला जेव्हा उमजेल तो 'सुदिन' म्हणावा! नवा 'माणूस' हे आव्हान समर्थपणे पेलेल तर ह्या आवाहनाचे सार्थक होईल असा विश्वास वाटतो. युवाशक्तीने ह्या समस्येकडे गांभीर्याने पाहावयास हवे असे आग्रहाने म्हणावेसे वाटते. वृक्षसंवर्धन सामाजिक व सांस्कृतिक चळवळ व्हावयास हवी.

२२ एप्रिल ८४ — वासुदेव रायते

(अध्यक्ष–महाराष्ट्र प्रदेश वृक्षमित्रसंघटना, सांगली शाखा)

दिनांक ७ एप्रिलच्या अंकात, जादूगार तायडे ह्यांची मुलाखत वाचनात आली. योग्य त्या लेखकाने, योग्य त्या माणसाची मुलाखत घेतली असे माझे मत.

जादू ह्या विषयावर अनेक लेख आपण प्रसिद्ध करून आज 'लयाला' चाललेली कला समाजमान्य व लोकप्रिय 'माणूस' तर्फे वाचकांसमोर ठेवाल, अशी आशा.

२२ एप्रिल ८४ — जादूगार शैलेंद्र

डोंबिवली.

दि. २१ एप्रिलच्या अंकातील मंचर कॉलेजविषयीचा श्री. द. ता. भोसलेंचा लेख वाचला. लेख परिचयात्मक असल्याने अशा नानाविध संस्थांतील कार्यकर्ते एका विशिष्ट भावनेने आपली सेवा समाजाला अर्पण करीत असतात ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत!

सुरुवातीस लेख वाचताना क्षणभर आमच्या महाविद्यालयाची आठवण झाली. कार्यामध्ये थोडाफार फरक असू शकेल; परंतु ज्या माळरानावर मंचर कॉलेजच्या प्राचार्यांनी नंदनवन फुलविले, त्याचप्रमाणे दोंडाईचे महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. भास्करराव पाटील यांनी सरकारने दिलेल्या ९ एकर महाविद्यालयाच्या ओसाड जागेवर विविध प्रकारची झाडे, वेली लावून जवळजवळ एक हजार विविध वृक्षांची 'जोपासना' करून ते वाढविले आहेत. म्हणूनच सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ही सेवाव्रती मंडळी आपले कार्य निःस्वार्थ, निर्लेप भावनेने करीत आहेत, यात कोणत्याही प्रसिद्धीची आस नाही.

अशा स्वरूपातील कार्याची वाढ स्वतःची जिद्द व कार्यातील नियोजनबद्धता यावर अवलंबून असते आणि म्हणूनच 'कर्मण्येवाधिकारस्ते' हे गीतेतील तत्त्व पूर्णत्वाने

येथे लागू पडते. अशा लेखांची उपयुक्तता जाणून लेख प्रसिद्ध केल्याबद्दल अभिनंदन !

२७ एप्रिल, ८४ लक्ष्मीकांत गो. जोशी
दोंडाईचे (धुळे)

□ दि. २१ एप्रिलच्या अंकातील कुंपण आणि आकाश हे सदर वाचले. नेहमीच हे लेख अतिशय वाचनीय व मनाला सहजपटणारे असतात. या अंकातील सदरात, मंगलाताईंनी आजच्या स्त्रीचे हुबेहुब चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे स्त्रीला अति भावनिक बनवून त्याचे स्तोम केले आहे हेही खरे आहे. स्त्रीनेच स्त्रीला दुबळे बनविले आहे. घरामध्ये मुलगी जन्माला आली की, जन्मापासूनच तिच्या सौंदर्याची, शरीराची, मनाची बायकी जपणूक, घरातील आई, आज्या व इतर करू लागतात. या सर्वांमुळे ऐनसंस्कारक्षम वयात चांगले वळण लागण्याऐवजी मुलीला आपल्यासारखं दुबळंच बनविण्यात येतं. स्त्रीनेच स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे आणि पुन्हा होण्याऱ्या अन्यायाविरुद्ध तीच ओरडूही पहात आहे.

मंगलाताईंचे हे लेख मनाला खूपच भिडतात.

२८ एप्रिल, ८४ सौ. स्मिता जोशी
मुंबई

## आनंदवनात दोन शिबिरे

सध्या महाराष्ट्रात विधायक क्षेत्रात अनेक संघटना काम करताहेत. ह्या सगळ्या परस्परपूरक काम करणाऱ्या संघटनांच्या कामात सुसूत्रता निर्माण झाली तर ह्या सगळ्याच चळवळींचा जनमानसावरील प्रभाव किती तरी पटींनी वाढून समाजपरिवर्तनाची दिशा अधिक वेगवान होईल. म्हणूनच बाबा आमटेंच्या आनंदवनात ( वरोरा, जि. चंद्रपूर ) दोन शिबिरांचं आयोजन केलं आहे.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा–निर्मूलनाच्या क्षेत्रात झपाट्यानं काम करणाऱ्या अनेक संघटना आहेत. या सगळ्या कामात सूत्रबद्धता यावी म्हणून २२–२३–२४ मे ह्या तारखांना 'अंधश्रद्धा निर्मूलन समन्वय शिबिर' आयोजिलं आहे.

ह्यासाठी अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, लोकविज्ञान संघटना, विज्ञानप्रबोधिनी, राष्ट्रसेवादल, मराठी विज्ञानपरिषद, रॅशनॅलिस्ट असोसिएशन, मानवीय नास्तिक मंच, श्रमिकसंघटना, शहादा, छात्र युवा संघर्षवाहिनी, क्रांतिबा फुले सांस्कृतिकमंच इत्यादी संघटनांना निमंत्रित केले आहे.

बुवाबाजी, नशीब–ज्योतिषशास्त्र, भूत–भानामती–देवी अंगात येणे ह्यासंबंधी आणि प्रसार-माध्यमांची भूमिका, देवाची संकल्पना, श्रद्धा-अंधश्रद्धा नेमका फरक, पाठ्यपुस्तकातील अंधश्रद्धा, मांत्रिक व मानसोपचारतज्ज्ञांची भूमिका, योगदान अशा अनेक तात्त्विक मुद्द्यांसंबंधी ऊहापोह करून भावी कामाची प्रत्यक्ष व्यूहरचना आखण्याचं महत्त्वाचं काम ह्या शिबिरात होणार आहे.

सामाजिक क्षेत्रातल्या सगळ्या संघटनांसाठी प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण आणि काही प्रश्नांबाबत समान भूमिका घेण्यासंबंधी विचारविनिमय व्हावा ह्या अपेक्षेनं 'सामाजिक चळवळ समन्वय- व्यासपीठ' निर्माण करण्याचं ठरलं आहे. २५, २६, २७ मे ह्या तारखांना ह्याचं पहिलं संमेलन आनंदवनात ( वरोरा, जि. चंद्रपूर ) होणार आहे. संमेलनात वरील सर्व संघटनांशिवाय हुंडाविरोधी आघाडी, बलात्कारविरोधी मंच, प्रगतिशील विद्यार्थी संघटना, युवक बिरादरी ( नागपूर ), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ यूथ वेल्फेर, अ. भा. विद्यार्थी परिषद, चेतनाविकास, ग्रामोपयोगी विज्ञानकेंद्र, नेचर क्लब, परिसर, युवामंच, क्रांतिकारी महिला संघटना, शेतकरी संघटना, नारी समतामंच, भाग्यश्री सगुणा मंडळ या आणि इतर अनेक संघटनांना निमंत्रित केलं आहे.

ह्या शिबिरात सर्व संघटनांच्या कार्याचा परिचय व दिशा, बेरोजगारी, पर्यावरण, स्त्रियांचे प्रश्न व आंतरराष्ट्रीय युवावर्ष ह्यासंबंधी सखोल चर्चा करून प्रत्यक्ष व्यूहरचना आखण्यासंबंधी निर्णय घेण्यात येतील. ह्या दोन्ही शिबिरांसाठी महाराष्ट्रातल्या अनेक नामवंत विद्वानांना व मान्यवर कार्यकर्त्यांना, साहित्यिकांना निमंत्रित केलं आहे.

ह्या दोन्ही शिबिरात इतर अनेक संघटनांना व सामाजिक चळवळीत रस असणाऱ्या स्वतंत्र व्यक्तींनाही सहभागी होता येईल; पण त्यासाठी त्यांनी ५ मेपूर्वी आपला पुरेसा परिचय करून देणारी संपूर्ण माहिती पत्राद्वारे पाठवून पूर्वपरवानगी घेणं अपरिहार्य आहे. ( पूर्वपरवानगीशिवाय सहभागी होता येणार नाही.)

ही दोन्ही शिबिरं डॉ. विकास आमटे संचालक, आनंदवनप्रकल्प आणि श्याम मानव संघटक, अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती ह्यांनी निमंत्रित केली आहेत.

संपर्कासाठी : डॉ. विकास आमटे, संयोजक
आनंदवन, वरोरा □

## म. श्री. दीक्षित
## एक साहित्यप्रेमी–कार्यकर्ता

गेल्या २५–३० वर्षांत ज्या ज्या व्यक्तींचा महाराष्ट्र साहित्य परिषदेशी या ना त्या निमित्ताने संबंध आला आहे, त्यांना म. श्री. दीक्षित ही व्यक्ती निश्चित माहीत असली पाहिजे. याला कारणं दोन आहेत. दीक्षित परिषदेमध्ये किंवा परिषदेशी संबंधित असलेल्या कामामध्ये सतत अडकलेले असतात किंवा अडकवलेले असतात. त्यामुळे त्यांची नोंद घ्यावीच लागते आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचं व्यक्तिमत्त्व. बारीक अंगकाठीचे, मध्यम उंचीचे, ठराविक झब्बा-पायजमा-जाकीट अशा साहित्यिक वेषातले आणि सतत तोंडाने साहित्यिकांचं – साहित्याचं नामस्मरण (?) करणारे दीक्षित कुठूनही नजरेत येतातच. परिषद–वसंत व्याख्यानमाला ही दीक्षितांची जणू घरची कार्ये! त्या कामासाठी ते मनापासून आपलेपणाने राबतात. कार्यक्रम यशस्वी झाला की आपला त्यात हातभार आहे, या कल्पनेने सुखावतात, कार्यक्रम पडला तर हसतमुखाने टिंगल–टवाळीला तयार राहतात. एकाच संस्थेमध्ये नोकरीची २५ वर्षं आणि नंतर विनावेतन आठ वर्षं अशी एकूण ३३ वर्षं सेवा रुजू करण्याचा विक्रम दीक्षितांनी स्वखुशीने केला आहे. पहिली पंचवीस वर्षे संस्थेमध्ये हेडक्लार्क व नंतर परिषदेचे सभासद होऊन ओळीने आठ वर्षं निवडणुकीत उभे राहून भरघोस मतांनी कार्यवाह म्हणून त्यांनी सन्मानाने आठ वर्षं काम केलं आहे.

ज्या कामातून आर्थिक लाभ नाही, झाला तर तोटाच आहे, अशा कामात दीक्षितां-सारखी माणसं का रमतात? का झोकून देतात? सार्वजनिक कामाची आत्यंतिक हौस, साहित्याची आवड आणि हाडात मुरलेला कार्यकर्ता हीच त्याची कारणं आहेत. म्हण-नच आर्थिकदृष्ट्या लाभ होऊ शकेल, अशी नोकरी सोडून दीक्षित अल्पवेतनावर साहित्य परिषदेत आले.

दीक्षित म्हणतात, 'आर्थिक हानी सोडली तर, परिषदेतल्या कामाचा मुख्य लाभ म्हणजे शेकडो लहानमोठ्या साहित्यिकांशी, विद्वा-नांशी, विचारवंतांशी, पत्रकारांशी माझा जवळून परिचय झाला. काव्यशास्त्रविनो-दात काळ कंठण्यात मला खराखुरा आनंद लाभतो. लेखन आणि तसलेच काही बौद्धिक श्रम करून (उदाहरणार्थ रेडिओवरील भाषणे, ग्रंथसूची करणे, प्रासंगिक लेखन इ.) मी स्वाभिमानपूर्वक नेटका प्रपंच केला आणि तो करता करता सार्वजनिक कार्यही अगदी तडीला जाईपर्यंत करीत आलो. गरिबीचं गाऱ्हाणं गाणं, लाचारीनं वागणं माझ्या रक्तातच नाही. माझ्या मर्यादांची मला नेह-मीच जाणीव असते. माझ्या गरजा नि माझ्या आकांक्षाही मी मर्यादित ठेवल्या. त्यामुळे माझे आपणहून कधी कोणाशी वैर नाही. असलं तर ते तेवढ्यापुरतं असतं. माणसं जोडणं, लोकांच्या ज्या ज्या मार्गानं उपयोगी पडता येईल, ते करणं हा माझा धर्म आहे.'

दीक्षितांशी ज्यांचा परिचय आहे, त्यांना त्यांचं हे बोलणं नक्कीच प्रांजळ वाटेल.

दीक्षितांनी साहित्यक्षेत्रात केलेलं सार्व-जनिक कार्य लक्षात घेण्यासारखं आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह (१९७६ ते १९८४), वसंतव्याख्यानमालेचे कार्यवाह (१९७७ ते १९८४ – सतत आठ वर्षे) अ. भा. म. साहित्यसंमेलनाचे कार्य-वाह (१९७७) थोरले बाजीराव स्मारक समितीचे कार्यवाह (१९७९ ते १९८४) याशिवाय वसंतव्याख्यानमाला शताब्दी स्मरणिका, पुण्याई व अमृतशारदा या तीन स्मरणिकांच्या संपादनात मोठा भाग दीक्षितांचा होता.

लेखन ही दीक्षितांची हौस आहे. वेग-वेगळ्या नियतकालिकांतून त्यांनी सतत प्रासंगिक लिखाण केलेच; पण ऐतिहासिक चरित्रात्मक आणि व्यक्तिचित्रणात्मक एकूण पंधरा छोटी छोटी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. दीक्षितांवरचे लहानपणचे संस्कार हिंदुत्ववादाचे–सावरकरवादाचे झाले, याचा पुरावा या पुस्तकांमधून मिळतो. वीरपूजेची त्यांच्या मनातली भावना म्हणजे त्यांची चरित्रात्मक पुस्तके आहेत.

दीक्षित साहित्यपरिषदेबद्दल फार प्रेमाने बोलतात. ते म्हणतात, परिषद हे माझं व्यसन आहे आणि पुढे म्हणतात, साहित्य-संस्थेची पायरी माझ्या दृष्टीनं नामदेवाची पायरी आहे, ती चुकायला नको. परिषदेच्या कार्यवाहपदाचा त्यांना अजूनही कंटाळा आलेला नाही; पण निवडणुकींचा मात्र कंटाळा आला आहे. आपल्यामागे परिषदेचं काय होईल? असली भाबडी शंका त्यांना येत नाही. कारण ते म्हणतात, आम्ही करून ठेवलेलं काम इतकं चिरेबंदी आहे की, कुणी मनात आणलं तरी त्याला धक्का पोचणार नाही!

दीक्षितांच्या डोळ्यांसमोर परिषदेचं कार्य खूप वाढलं. आजीव सभासद वाढले, परि-षदेच्या शाखा वाढल्या, कार्यक्रम वाढले. यातही खूप वाटा दीक्षितांचा आहे यात शंका नाही. कार्यकारी मंडळाच्या इतर सभासदांच्या सहकार्याचा दीक्षित न विस-रता उल्लेख करतात हेही महत्त्वाचं आहे.

परिषदेतल्या वास्तव्यामुळे दीक्षितांचा सर्व साहित्यिकांशी खूप जवळून संबंध आला. ते म्हणतात, 'साहित्यिक व्यासपीठावर किंवा पुस्तकात जेवढे मोठे असतात, तेवढे खाजगी आयुष्यात नसतात. माटे किंवा दत्तोपंत पोतदारांसारखी माणसं आजच्या साहित्यिकांमध्ये नाहीत. आजची पिढी पिटी, प्रसिद्धिपटू. पाणी उथळ, त्यामुळे खळखळाट फार. सखोल ज्ञानाची आस क्वचितच दिसते.'

आपल्या सेवेतले कडू–गोड अनुभव सांग-ण्यासारखे आहेत; पण ते एवढ्यात नाही. कारण अजून मला त्याच लोकांमध्ये काम करायचं आहे हा विवेक दीक्षितांमध्ये आहे.

हे सगळं लिहायचं कारण म्हणजे १६ मे रोजी दीक्षितांनी साठी ओलांडली. अनु-भवांच्या गाठी जोडत–सोडत पुरी केलेली ही साठी आहे. शिवाय एका अस्सल कार्य-कर्त्याची साठी आहे.

कार्यकर्ते ही खरं बदनाम जात. त्यांच्या अपेक्षा–ध्येयं सारं काही मर्यादित. ओझी वाहणाऱ्यांची ही जात; पण संस्थेला वाहून घेणाऱ्या अशा कार्यकर्त्यांच्या आधारावरच संस्था उभ्या राहतात, चढतात. साहित्य-संस्थेच्या प्रांगणात सूर्य, चंद्र आणि लुक-लुकते तारे उजळण्यासाठी अंधारात राहून काम करणारे सेवाभावी कार्यकर्ते फारच मोलाचे आहेत!

–प्रतिनिधी


विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. –अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : २५ रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# मुंबापुरी

## शिवजयंती

आम्ही जात्याच धाडसी आणि शूर पत्रकार असल्याने शिवजयंतीच्या मिरवणुकीसाठी भिवंडीला जायला सांगितल्याबरोबर आमच्या काळजाचे पाणी झाले आणि पोटात गोळा उठला; परंतु प्रत्यक्षात भिवंडीला आणि कल्याणला जे आम्ही पाहिले त्यामुळे आम्हाला संतोष जाहला.

मुळातच महाराष्ट्रात शिवजयंतीउत्सवास दंगलीच्या भीतीने बंदी घालणे हे सरकारच्या दुर्बलतेचे लक्षण होते. ही बंदी अधिक काळ वाढवली असती तर जातीय सलोखा वाढण्याऐवजी अधिकच दुरावला असता.

मिरवणूक मात्र अतिशय थाटामाटात पार पडली. पोलीसबंदोबस्तही चोख ठेवण्यात आला होता. सकाळीच आम्ही भिवंडीला पोहोचलो तेव्हा वातावरणात भीतियुक्त औत्सुक्य होते. ठिकठिकाणी गटागटांनी जमून लोक दबलेल्या आवाजात चर्चा करीत होते. दुकाने बंद होती. मिरवणूक बारा वाजता निघणार होती; पण नेतेमंडळी येता येता एक वाजला!

संध्याकाळी निघण्यापूर्वी आम्ही निझामपुरा पोलीसस्टेशनवर गेलो. तेथे गफूर नावाचे एक वृद्ध गृहस्थ बसले होते. वय सत्तरीच्या आसपास असावे. मिरवणुकीत ज्या काही मोजक्या मुसलमानांनी भाग घेतला त्यापैकी ते एक होते. ते म्हणाले, 'आज मिरवणूक झाली हे फार चांगले झाले. भिवंडीला शिवजयंतीला बंदी घालावी लागणे हे हिंदूंना जितके लांछनास्पद होते तितकेच मुसलमानांनाही होते. मागे एकूणसत्तर साली या निझामपुरा भागात मी स्वतः गणपतिउत्सवाच्या तयारीला मदत केली होती. त्यानंतर इतक्या मोठ्या प्रमाणावर असा उत्सव परत झाला नाही!'

शिवसेनेचे भिवंडीमधील कार्यकर्ते शेटे यांनीही हा एकोपा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले.

आपण नेहमी ज्या नेत्यांची नावे ऐकतो, वाचतो त्यांच्या भाषणांनी जातीय ऐक्य वाढण्याऐवजी बहुधा दुरावतेच. गफूर आणि शेटे यांच्यासारखी माणसे शांतपणे काम करतात; पण त्यांच्या कार्याला अधिक अर्थ आहे.

## थंड हवेचे ठिकाण

महाराष्ट्राचे या घटकेला असलेले मुख्यमंत्री (आम्ही उद्याची हमी देत नाही) वसंतदादा पाटील सुट्टीनिमित्त महाबळेश्वरला गेले असल्याने मंत्रालय हे सध्या थंड हवेचे ठिकाण बनले आहे. दादांच्या चौदा कट्टर शत्रूंपैकी सहा मंत्रीही महाबळेश्वरलाच गेल्याने दादांना तेथेही उन्हाळा जाणवत असेल असा आमचा अंदाज आहे. जनाब अंतुले, बाबासाहेब भोसले आणि रामराव आदिक हे तीनही सत्पुरुष सध्या ईशचिंतनात मग्न आहेत. त्यामुळे मंत्रालयातील पत्रकार सध्या टाइपरायटर्सवर डोके ठेवून महाराष्ट्राच्या राजकारणाला आता कोणते वळण द्यायचे या चिंतेत पडले आहेत.

असो. दादा आले–दादा गेले, आपल्या पाठीवरचा बोजा त्यामुळे काही कमी व्हायचा नाही!

## घरचे पापड रस्त्यावर

लिज्जत पापडांची लज्जत आजकाल थोडी कमी झाली आहे. ह्या कंपनीत पापड लाटणाऱ्या महिलांना डावलून तिच्या संचालकपदी असणाऱ्या लोकांनीच तिचा नफा लाटला असे आरोप वृत्तपत्रांतून होत आहेत. त्यामुळे ह्या महिलाउद्योगाच्या संचालिका रुक्मिणीताई पवार यांनी वृत्तपत्रांतून एक–एक पानी जाहिरात देऊन संचालकमंडळाची बाजू मांडली आहे; परंतु आमचे असे स्पष्ट मत आहे की, हे घरातले पापड त्यांनी रस्त्यावर वाळवू नयेत. त्यामुळे या उद्योगाचे नाव अधिकच खराब होईल!

–विष्णु जयदेव

### गार्डनरीच खूनप्रकरण

# इद्रिसमियाँच्या पोलीस कस्टडीतील मृत्यूचे रहस्य

अभय गोखले

गेल्या १८ मार्चला कलकत्त्याच्या गार्डनरीच भागात पोलीसउपआयुक्त विनोदकुमार मेहता व त्यांचा बॉडीगार्ड मुख्तार अहमद खान यांचा दंगल करणाऱ्या जमावाकडून निर्घृणपणे खून करण्यात आला. गेल्या काही दिवसांतील अशा प्रकारची ही दुसरी घटना आहे. ११ मार्चला ओरिसात पॅरादीप युनियन्सच्या भांडणासून हजारो गोदीकामगारांनी जी दंगल केली त्यात कानुंगो नावाच्या पोलीसअधिकाऱ्याची हत्या करण्यात आली. कलकत्त्यात व विशेषतः बंगालमध्ये कित्येक वेळा अशा बातम्या वाचावयास मिळतात की, अमुक एका ठिकाणी चिडलेल्या जमावाने एखाद्या समाजकंटकाला ठार मारले किंवा आनंदमार्गियाला ठार मारले. अर्थात कित्येक वेळा ही ठार मारली गेलेली माणसे राजकीय कार्यकर्तीही असतात.

मात्र पोलीसउपआयुक्त विनोदकुमार मेहता व त्यांचा बॉडीगार्ड ज्या जमावाकडून मारले गेले तो जमाव साधा नव्हता. त्यामध्ये बरेच स्मगलर्स व गुंड यांचा हात होता. विनोदकुमार मेहता हे सचोटीने वागणारे गृहस्थ असल्याने त्यांनी कधीच या स्मगलर्सना व गुंडांना दाद दिली नाही व या स्मगलर्सनी त्यांना पॉकेट करण्याचा प्रयत्न केला. त्या प्रलोभनालाही ते बळी पडले नाहीत. गार्डनरीच भाग हा बंदरभाग असल्याने तेथे स्मगलर्सचा सुकाळ आहे. विनोद-

कुमार मेहता हे उपआयुक्त ( पोर्ट डिव्हिजन ) असल्याने त्यांनी या स्मगलर्सच्या अड्ड्यांवर वेळोवेळी धाडी घालून त्यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान केले होते. तेव्हा हे स्मगलर्स विनोदकुमार मेहता यांचा काटा काढण्याची संधीच शोधत होते. अशी संधी त्यांना एका साध्या प्रकरणामुळे मिळाली.

## पोलीस गाफील का ?

पहारपूर एक छोटेसे गाव. गार्डनरीच पोलीसस्टेशनच्या हद्दीत येणारे. या गावाच्या पश्चिम भागात बहुसंख्य हिंदूंची वस्ती आहे तर पूर्वेला जो भाग फत्तेपूर गावाशी निगडित आहे तेथे बहुसंख्य मुस्लिम राहतात. या भागातील बहुतेक मुसलमान हे बांगलादेश मुक्तिसंग्रामात जे पाकिस्तानी नागरिक अडकून पडले होते त्यांपैकी आहेत. बांगलादेश स्वतंत्र झाल्यावर पाकिस्तानी नागरिकांची मोठ्या प्रमाणात हकालपट्टी झाली व त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले. त्यांपैकी काही मुसलमान पहारपूरला पळून आले. नंतर प. बंगाल सरकारमधील काही राजकारण्यांच्या कृपेने त्यांना रेशन-कार्डेही मिळाली व त्याबरोबर नागरिकत्व व मतदानात हक्कही. या मुस्लिमांना कामधंदा लगेच मिळाला. पहारपूर हा पोर्टएरिया असल्याने स्मगलिंगच्या व्यवसायात त्यांना चांगला पैसा मिळू लागला व तो संपूर्ण विभाग म्हणजे स्मगलर्सचे एक जाळेच निर्माण झाले. तेथील स्थानिक पोलिसांना त्यापासून चांगली मिळकत होऊ लागल्याने त्यांनी या स्मगलर्सच्या ॲक्टिव्हिटीकडे कानाडोळा केला. मात्र विनोदकुमार मेहता त्यांपैकी नव्हते. त्यांनी या भागात सतत धाडी घालून या स्मगलर्सवर जरब बसवली. या स्मगलर्सनी राजकीय नेत्यांवर दडपण आणून मेहता यांची त्या विभागाबाहेर बदली करविण्याची खटपट केली. मेहतांनी आपल्या प्रामाणिकपणाने स्मगलर्स व गुंडांची दुष्मनी तर ओढवून घेतलीच; पण ज्या पोलिसांना या विभागात कमाई होत होती, ते पोलिसही मेहतांवर नाराज झाले.

१७ मार्च रोजी पहारपूरच्या पश्चिमेकडील भागातील काही तरुणांनी पूर्वेकडील भागातील मुन्वरा खातुन याच्या नारळाच्या झाडाचे नारळ चोरले. मुन्वरा खातुन राहत असलेला भाग मुस्लिम बहुसंख्य असलेला आहे. या प्रकरणावरून हिंदु–मुसलमान यांच्यात संघर्ष होण्याची भीती निर्माण झाली; परंतु गावातील काही प्रतिष्ठित नागरिकांच्या मध्यस्थीने हे प्रकरण तेथेच सामोपचाराने मिटविण्यात आले. मात्र हा सामोपचार गावातील गुंडांना, स्मगलर्सना व जातीयवाद्यांना रुचला नाही. त्यांनी यावरून पूर्वेकडील भागातील लोकांना भडकवले. मग दुसऱ्या दिवशी हे गुंड पश्चिमेकडील भागातील लोकांची घरे लुटावयास गेले. त्यांनी तेथे बराच धुमाकूळ घातल्याने जातीय तणाव निर्माण झाला. लोकांमध्ये घबराट होऊन पळापळीस सुरुवात झाली.

या घटनेची खबर मिळताच उपआयुक्त (पोर्ट) मेहता हे काही कॉन्स्टेबलसह तेथे ताबडतोब पोहचले. त्याअगोदरच स्थानिक पोलीसस्टेशनचे पोलीस तेथे पोचलेले होते. या पूर्वेकडील भागात (फत्तेपूर-गाव–रोड) बरेच गल्लीबोळ आहेत. त्या असंख्य गल्ल्यांतून तणाव निर्माण झालेला होता. त्यातील एका गल्लीतून पोलिसांवर बॉंब व दगडांचा वर्षाव करण्यात आला. मेहता यांनी त्या गल्लीत शिरून इतर सहकाऱ्यांना आपल्यापाठोपाठ येण्याचा आदेश दिला. मेहता यांचा बॉडीगार्ड सावलीप्रमाणे त्यांच्याबरोबर होताच. याच वेळेस पोलीसअसिस्टंट कमिशनर (पोर्ट) शर्मा यांना जमावाने फेकलेला एक दगड डोक्यात लागला व ते जखमी झाले. लोकांचा भयानक मूड पाहून व बॉंब–दगडांचा वर्षाव यांची धास्ती घेतलेल्या व त्या गल्लीत एखाद्या चक्रव्यूहाप्रमाणे सापडलेल्या पोलिसांनी श्री. शर्मा यांच्यासह तेथून लगेच काढता पाय घेतला व पोलीसउपआयुक्त मेहता आणि त्यांचा बॉडीगार्ड मुख्तार अहमद खान हे दोघेच त्या गल्लीमध्ये उरले. त्यामुळे जमावाने त्यांच्यावर घरांच्या छपरांवरून बॉंब व दगडांचा वर्षाव केला. त्या भागातील स्मगलर्स व गुंड यांचा मेहतांवर डोळा होताच. आता ते त्यांच्या कोंडीत सापडले होते. या विभागात स्मगलर्सनी धुमाकूळ घातल्याने मेहतांनी वारंवार धाडी घातलेल्या होत्या. हा मुस्लिम–बहुसंख्य भाग असल्याने समाजकंटकांनी, मेहता हे मुस्लिमविरोधी असल्याचा गैरसमज पसरवला होता. जमावाने केलेल्या या हुल्लडबाजीत व दंगलीत मेहता व त्यांचा बॉडीगार्ड बेपत्ता झाले ! ही खबर मिळताच लालबझार येथील हेडक्वार्टर्समधील वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यांनी या दोघा बेपत्ता माणसांचा (मेहता व त्यांचा बॉडीगार्ड) कसून शोध घेतला. त्यांनी हा सर्व भाग अक्षरशः पिंजून काढला. दुपारी दोन वाजता फत्तेपूररोड-जवळ एका पोलीसपार्टीला एका जळलेल्या गवताच्या ढिगाऱ्यात एक प्रेत सापडले. त्या प्रेताची छाननी करता ते प्रेत मेहतांचा बॉडीगार्ड मुख्तार अहमदखान याचे असल्याचे लक्षात आले. त्याचे हातपाय तोडून त्याला जाळण्यात आले होते; परंतु मेहता यांचा पत्ता लागेना. सुमारे पाचच्या सुमारास त्या भागातील एका रहिवाशाने रामनगरगल्लीतील एका गटारात आपण एक प्रेत पाहिल्याचे पोलिसांना सांगितले. पोलीस जेव्हा तेथे गेले तेव्हा त्यांना एक उघडे-नागडे प्रेत गटारात पडलेले दिसले. या प्रेताचे डोळे काढण्यात आले होते व त्याचे हातपाय बांधलेले होते. या प्रेताच्या अंगावर जागोजागी जाळल्याच्या व भोसकल्याच्या खुणा होत्या. हे प्रेत पोलीस-उपआयुक्त विनोदकुमार मेहता यांचेच होते. प्रश्न असा उपस्थित होतो की, एवढ्या भयानक दंगलीत स्थानिक पोलिसांनी पोलीस-उपआयुक्तासारख्या महत्त्वाच्या अधिकाऱ्यास एकटे सोडून पळ कसा काय काढला ? दुसरे असे की, मेहतांसारख्या उच्चपोलीसअधिकाऱ्याबरोबर एवढी तुटपुंजी पोलीसतुकडी का पाठवण्यात आली ? यामुळे पोलिसांबद्दलही विनाकारण संशय निर्माण होतो. स्मगलर्सनी व्यापलेल्या या विभागात नेहमीच तणाव असतो हे माहीत असूनही पोलीसखाते आपल्या एका उच्च अधिकाऱ्याच्या सुरक्षिततेबद्दल एवढे गाफील का राहिले ? हिंदु–मुस्लिम–संघर्षाचा हा बनाव मेहतांना या विभागात खेचण्यासाठी तेथील स्मगलर्स व गुंडांनी रचला होता हे उघडच आहे. मेहता बिचारे या जाळ्यात सापडले व त्यांना खलास करण्यात आले !

मेहतांच्या हत्येनंतर या विभागात पोलिसांनी ज्या झडत्या घेतल्या (खुन्याचा तपास करण्यासाठी) तो निव्वळ देखावा होता असे तेथील रहिवाशांचे म्हणणे आहे. ज्या दंगलीमुळे मेहतांचा खून झाला त्यात भाग घेणारे संशयित गुन्हेगार अगोदरच त्या विभागातून बाहेर पळून गेले होते. जर यातील खरे गुन्हेगार पकडले गेले असते तर त्यांनी पोलिसांना एक्सपोज केले असते असे काही रहिवाशांचे (त्या भागातील) मत होते.

पृष्ठ ३१ वर

# राजकारणी लोकांना या देशात कायदा लागू आहे की नाही?

प्रा. बी. वाय. कुलकर्णी, जालना

गव्हर्नर रॉबर्ट क्लाइव्ह भारतातून १९६७ मध्ये परत इंग्लंडला गेला. त्याने जमवलेल्या संपत्तीमुळे व त्याने केलेल्या वाईट गोष्टींमुळे इंग्लंडची बदनामी झाली या सबबीखाली त्याच्यावर संसदेत आरोप ठेवण्यात आले, त्यावर राष्ट्रघातकीपणाचा आरोप ठेवण्यात आला. लाचलचपतीचे आरोप त्यावर ठेवण्यात आले. या टीकेला तो तोंड देऊ शकला नाही. २२ नोव्हेंबर १९७४ ला कंटाळून त्याने आत्महत्या केली! गव्हर्नर जनरल हेस्टिंग परत गेला तेव्हा त्यावर अनेक आरोप ठेवण्यात आले. हाउस ऑफ लॉर्डसमध्ये त्याच्यावर खटला चालला. दरम्यान हेस्टिंगला वाचवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले; पण त्याच्यावरचा खटला मागे घेण्यात आला नाही. या खटल्यासाठी हेस्टिंगला ७०,००० पौंड खर्च आला. शेवटी त्याला कंपनीकडे पेन्शनसाठी याचना करावी लागली. व्हॉइसरायपदाचा दुरुपयोग त्याला महाग पडला! याचे श्रेय इंग्लंडमधील कायद्याच्या श्रेष्ठात्वाला व निष्कलंक न्यायपालिकेला जाते. अमेरिकेतील वॉटरगेट–प्रकरणही अशाच प्रकारचे आहे. निक्सननी हे प्रकरण दाबण्यासाठी व्हाइट हाउसचा उपयोग केला. एफबीआय (FBI) मार्फत होणाऱ्या चौकशीत सीआयए (CIA) मार्फत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला. दोन्ही सभागृहांतील रिपब्लिकन पक्षांच्या सभासदांनी वॉटरगेटप्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला; पण हे प्रकरण त्यांना दाबता आले नाही. न्यायालय खंबीर राहिले. सभागृह चौकशीसमितीने निःपक्षपातीपणाने काम केले. निक्सनला वॉटरगेटप्रकरणातील टेप्स दाखवणे भाग पडले. ९ ऑगस्ट १९७४ ला निक्सननी अध्यक्षपदाचा राजिनामा दिला. अमेरिकेत कायद्याच्या राज्याचा विजय झाला! निक्सननंतर फोर्ड सत्तेवर आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले की,

> 'Our long national nightmare is over. Our great Repablic is government of laws & not of men.'

या सर्व पार्श्वभूमीवर, भारतात मात्र असे उदाहरणच देता येत नाही. उलट इथे गुन्हा करून राजरोसपणे वर मान करून हिंडणाऱ्यांची संख्याच जास्त आहे. भारतात अद्याप एकाही राजकीय नेत्यास त्याने केलेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेली नाही हे अनेक घटनांच्या जंत्रीवरून सप्रमाण दाखवता येईल. विशेष म्हणजे आजच हे होतंय असं नाही. अगदी नेहरूंच्या काळात व्ही. के. कृष्णमेननच्या जीपप्रकरणाची चौकशी करण्यासाठी कॉंग्रेस संसदीय समितीने नेमलेल्या उपसमितीचा अहवाल, ज्यात मेननवर ठपका ठेवण्यात आला होता, नेहरूंनी तो अहवाल बाहेर येऊच दिला नाही. के. डी. मालवीयच्या बाबतीतही हेच झाले. त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करणाऱ्या दास आयोगाचे निष्कर्ष बाहेर यऊच दिले नाहीत.

भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी वैधानिक आयोगाची सुरुवात पहिल्या प्रथम झाली, ती दास–आयोगाने. लालबहादूर शास्त्रींनी ११ जून ६४ रोजी पंजाबचे मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरोंच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी हा आयोग नेमला होता. या आयोगाने कैरोंचा भ्रष्टाचार उघडकीस आणला. कैरोंचे काहीही झाले नाही. काश्मीरमध्ये सादिक अली सरकारने बक्षी गुलाम मोहम्मदच्या भ्रष्टचाराची चौकशी करण्यासाठी अय्यंगार–आयोग नियुक्त केला, ज्या आयोगाने बक्षी गुलामने केलेला भ्रष्टाचार उघडकीस आणला; पण काहीही उपयोग झाला नाही. १९७१ मध्ये श्रीमती गांधींनी बक्षी गुलाम मोहम्मदला श्रीनगरचे कॉंग्रेसचे तिकीट दिले. १९७१ मध्ये श्रीमती गांधी बहुमताने निवडून आल्या, बक्षी गुलाम मोहम्मद सर्व आरोपातून मुक्त झाले!

भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यात फक्त कॉंग्रेसवालेच आघाडीवर आहेत असे नाही, तर जनता पक्षही होता. ओरिसाचे मुख्यमंत्री सिंगदेव यांनी माजी मुख्यमंत्री बिजू पटनाईक यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी एच आर. खन्ना–आयोग बसवला, ज्या आयोगाने आपल्या अहवालात बिजू पटनाईकवर भ्रष्टाचाराचा ठपका ठेवला; पण १९७७ मध्ये मोरारजींनी खन्ना–आयोगाचा अहवाल बाजूस ठेवून बिजू पटनाइकांना मंत्रिमंडळात घेतले. बिजू पटनाईक दोषमुक्त झाले!

१९७६ मध्ये श्रीमती गांधींनी डिएमकेचे तामिळनाडूमधील मुख्यमंत्री करुणानिधींना मुख्यमंत्रीपदावरून दूर केले व करुणानिधीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी सरकारिया–आयोगाची नियुक्ती केली, जो आयोग भ्रष्टाचाराची चौकशी १९७२ पासून करणार होता. या आयोगाने करुणानिधीवर लक्षावधी रुपयांची लाच घेतल्याचा आरोप ठेवला, त्यानुसार करुणानिधीवर इंडियन पिनल कोड १६१,४६८,४७१ खाली खटले भरण्यात आले, याव्यतिरिक्त त्यांच्यावर काही खटले भ्रष्टाचारप्रतिबंधक कायद्याखालीही चालू होते, जे जनता सरकारने मागे घेण्यास नकार दिला होता. १९८० मध्ये श्रीमती गांधी सत्तेवर आल्या व करुणनिधींवरचे सर्व खटले काढून घेण्यात आले. कारण १९८० च्या निवडणुकीत श्रीमती गांधी व करुणानिधींच्या पक्षात निवडणूक-समझोता झाला होता म्हणजे करुणानिधींवरचे खटले मागे घेण्यात पूर्णतः राजकीय हेतू होता.

करुणानिधीवरचे खटले जनता पक्षाने काढून घेतले नाहीत. म्हणजे जनता सरकार भ्रष्ट व्यक्तींना शासन करू इच्छीत होते असे नव्हे, कारण त्यांनीही बिजू पटनाईकला पाठीशी घातले होते

व प्रकाशसिंग बादलांवरचे भ्रष्टाचाराचे अनेक खटले मागे घेतले होते.

ओरिसाचे माजी मुख्यमंत्री श्रीमती नंदिनी सत्पतींवरील भ्रष्टाचाराचे खटले काढून घेण्याबाबतचा अर्ज दि. २८ जानेवारी १९८३ ला दाखल करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने अर्ज मान्य केला, श्रीमती नंदिनी सत्पती सुटल्या! १९७९ च्या फेब्रुवारी महिन्यात मुख्यमंत्री डॉ जगन्नाथ मिश्रा व सहकाऱ्यांवर खोटी कागदपत्रे तयार करणे, फसवणे, कट याबाबतीत खटले दाखल करण्यात आले होते. याव्यतिरिक्त फक्त डॉ. मिश्रांवर भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याखाली अनेक खटले भरण्यात आले होते. जून १९८० डॉ. जगन्नाथ मिश्रा सत्तेवर आले व कॅबिनेटची खास बैठक होऊन मिश्रांवरील खटले मागे घेण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला तशा प्रकारचा अर्ज करण्यात आला. पाटणा दंडाधिकाऱ्यांनी त्याला मान्यता दिली व त्याला उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. हे प्रकरण नंतर सर्वोच्च न्यायालयात गेले. तेथे दोन विरुद्ध एक अशा मताने मिश्रांवरील खटले काढून घेण्याच्या निर्णयाला मान्यता देण्यात आली. खटले काढून घ्यावेत या बाजूने असणारे दोन न्यायाधीश होते. न्या. आर. बी. मिश्रा व न्या. बहारुल इस्लाम. पैकी न्या. बहारुल इस्लामनी नंतर न्यायाधीशपदाचा राजिनामा दिला व कॉंग्रेस आयच्या तिकिटावर आसाममध्ये निवडणूक लढवली.

## बन्सीलाल आणि मारुतीप्रकरण

१९८० मध्ये श्रीमती गांधी सत्तेवर आल्या व खटले मागे घेण्याच्या कामाला गती आली. बन्सीलालचा मुलगा सुरिंदरसिंगवरचा रेवासाचा खूनखटला १७ व २३ मे १९८० ला मागे घेण्यात आला. शाह कमिशनचा अहवाल बाजूस ठेवून तुर्कमानगेटप्रकरणातील सर्व खटले (रुकसाना, संजय व मंडळींवरचे) मागे घेण्यात आले. साचार प्रतिबंधनाच्या संदर्भात श्रीमती गांधी, आर. के. धवन व भिंदरच्या विरुद्ध न्यायालयात चाललेले खटले न्या. अगरवालनी २४ मे १९८० ला पुढे न चालवण्यास मान्यता दिली. धीरेन्द्र ब्रह्मचारीवर बेकायदेशीररीत्या गाडी व हेलीकॉप्टर (तेही सरकारी पैशाचा गैरवापर करून) खरेदी केल्याबद्दल काही खटले चालू होते तेही मागे घेण्यात आले.

सगळ्यात भयानक म्हणजे ७ जून १९८० ला मारुती कंपनीच्या संदर्भात गुप्ता अहवालाच्या निष्कर्षावरून दाखल केलेले संजय गांधींवरील खटले काढून टाकण्यात आले. याला मी 'भयानक' यासाठी म्हटले की, मारुतीप्रकरणाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या गुप्ता आयोगाने आपल्या अहवालात म्हटले आहे की, 'No holds were barred, no rules left inviolated' असे असताना खटले मागे घेण्यात आले. इतकेच नव्हे तर या संपूर्ण प्रकरणावर कायमचा पडदा टाकण्यासाठी एका वटहुकुमाद्वारे मारुती कंपनीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले व ४.३५ करोड रुपये कंपनीधारकांना मोबदला म्हणून देण्यात आले. म्हणजे मारुतीप्रकरणात भ्रष्टाचाराला फक्त पाठीशी घातले इतकेच नव्हे तर त्याला वैधता प्राप्त करून दिली!

या सर्वांवर कळस म्हणजे यूथ कॉंग्रेसचे नेते देवेंद्र पांडे व गोपाल पांडे, ज्यांनी इंडियन एअर लाइनच्या विमानाचे अपहरण केले होते, त्यांना कॉंग्रेस (आय)ने निवडणुकीत तिकीट दिले व नोव्हेंबर १९८० मध्ये विमानअपहरणाच्या संदर्भातील त्यांच्यावरील खटले मागे घेण्यात आले!

राजकीय नेत्यांवरील खटले काढून घेण्याच्या संदर्भातील आणखी एक गंभीर प्रकरण आहे बन्सिलालचे. बन्सिलालला मनोहरलाल यांनी, त्यांची भिवानीतील जमीन द्यावी यासाठी बन्सिलालने मनोहरलालवर दडपण आणले. कारण तेथे त्यांना पंचतारांकित हॉटेल व वातानुकूलित चित्रपटगृह उभे करावयाचे होते; पण मनोहरलाल यांनी जमीन देण्यास नकार दिला. बन्सिलालने भिवानी इंप्रुव्हमेंट ट्रस्टला हाताशी धरले व ट्रस्टने हुकूम काढला की, मनोहरलाल यांची जमीन नगरविकासासाठी आम्हाला हवी आहे व त्यामुळे तेथे उभी असणारी घरे आम्ही पाडणार आहोत. हा हुकूम निघाल्यावर मनोहरलाल तडजोडीला तयार होतील असे दिसून येताच मनोहरलाल यांची जमीन भिवानी इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या नगरविकास योजनेतून काढून घेतली; पण तरीही मनोहरलालनी तडजोड करायला नकार दिला व ती जमीन पुन्हा भिवानी इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या योजनेत समाविष्ट झाली. मनोहरलालनी सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेतली सर्वोच्च न्यायालयाने २१ मे १९७६ ला मनोहरलालची जमीन ताब्यात घेऊ नये आणि तेथील घरे पाडू नयेत असा आदेश दिला. हरियाना सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची दखल घेतली नाही व मनोहरलालच्या चार एकर जमिनीवरची घरे बुलडोझरने पाडली. भिवानी इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या कागदपत्रांनुसार त्या जमिनीवरची घरे पाडण्यासाठी खर्च आला १,८७०० रु. या सर्व प्रकरणाची चौकशी न्या. जगमोहन रेड्डींनी केली व त्यांनी म्हटले की, 'ही सारी कारवाई अत्यंत सूडबुद्धीची होती आणि बन्सिलाल व त्यांचे चिरंजीव हेच या कारवाईला जबाबदार ठरतात.' या अभिप्रायानुसार हरियाना सरकारने बन्सिलाल व इतर काही लोकांवर फौजदारी खटले भरले होते, त्या वेळी हरियानात भजनलालचे सरकार होते. २१ सप्टेंबर १९७९ रोजी पक्षांतरामुळे हरियानातील भजनलाल सरकार कोसळणार अशी स्थिती निर्माण झाली होती. भजनलालला आपले मुख्यमंत्रीपद टिकवण्यासाठी इंदिरा कॉंग्रेसच्या पाठिंब्याची अत्यंत गरज होती. म्हणून त्यांनी चंदीगडहून भिवानी येथे तारेने कळवले की, बन्सिलाल व इतरांवरील खटले ताबडतोब मागे घेण्यात यावेत व बन्सिलालवरील खटले मागे घेण्यात आले. मनोहरलालनी सर्वोच्च न्यायालयाकडे बन्सिलालवरील खटले मागे न घेण्याबाबत अर्ज केला. जेव्हा हा अर्ज कृष्णस्वामींकडे आला तेव्हा त्यांना प्रकरण ऐकून वाईट वाटले. ते म्हणाले, 'हे प्रकरण अत्यंत अमानुष व धक्कादायक आहे!' पण त्यांनी मनोहरलालचा अर्ज मात्र अमान्य केला. बन्सिलाल मुक्त झाले! मनोहरलालवर अन्याय झाला. कारण भिवानी ट्रस्टला मनोहरलालची मालमत्ता पाडण्यासाठी १,८७००० रु. खर्च आला आणि मनोहरलाल यांना मोबदला मिळाला १,५७००० रुपये!

हे प्रकरण इतक्या सविस्तरपणे यासाठी दिले की, खरे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने बन्सिलालवरील खटले मागे घेण्यास परवानगी द्यावयास नको होती. कारण न्यायप्रविष्ट खटले मागे घेण्यास

सर्वोच्च न्यायालयानेच काही संकेत रूढ केलेले आहेत व त्या आधारावरच खटले मागे घेण्याची परवानगी न्यायालय देत असते. साधारणत: जातीय दंगलीनंतर, ज्यांच्यावर खटले भरले आहेत ते चालू राहिले तर लोकभावना पुन्हा प्रक्षुब्ध होतील म्हणून खटले मागे घेण्याची परवानगी दिली जाते किंवा कामगार व मालक यांच्यातील तंटयामुळे काही जणांवर खटला भरण्यात आलेला आहे, ते खटले चालू राहिले तर कामगारांमध्ये प्रक्षोभ निर्माण होण्याचा संभव आहे, अशा वेळी कामगारांवरचे खटले मागे घेण्याची परवानगी दिली जाते, तसेच राजकीय गुन्ह्याच्या संदर्भातील खटलेही मागे घेण्याची परवानगी दिली जाते. थोडक्यात 'न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याशिवाय खटले मागे घ्यायला न्यायालयांनी परवानगी देऊ नये' हे न्या. कृष्ण अय्यर व न्या. चिन्नाप्पा रेड्डींचे मत खटले मागे घेण्याच्या संदर्भात लक्षात असावे; पण बन्सिलाल प्रकरण हे खटले काढून घेण्यासाठी समर्थनीय ठरलेल्या संकेतांपैकी एकातही बसत नसताना सर्वोच्च न्यायालयाने हरियाना सरकारला खटले काढून घ्यायला परवानगी दिली व गुन्हेगाराला रान मोकळे सोडले !

सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण इथेच संपवले नाही, तर २ मे १९८० ला बन्सिलालवरील खटले पुन्हा सुरू करायला सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला व त्याच दिवशी बडोदा डायनामाइट खटलाही पुन्हा सुरू करायला नकार दिला व अशा प्रकारे सरकारपक्ष व विरोधीपक्षाला न्यायालयाने एकाच निर्णयात खूष केले. यात विशेष म्हणजे न्यायालयाने बडोदा डायनामाइट खटल्याची तुलना बन्सिलालनी केलेल्या गुन्ह्यांशी केली, जी बरोबर नव्हती. कारण बडोदा डायनामाइट खटला खरोखरच राजकीय गुन्हा होता. हा गुन्हा सरकारच्या धोरणांबाबत नाराजी व्यक्त करण्याचे सर्व शांततामय मार्ग बंद केल्यामुळे केला होता. बन्सिलालने मनोहरलालच्या जमिनीबाबत जे प्रयत्न केले, मनोहरलालला आपल्या सत्तेचा दुरुपयोग करून जो त्रास दिला तो गुन्हा राजकीय होऊच शकत नाही; पण न्यायालयाने सरकारलाही खूष केले बडोदाडायनामाइट खटल्यात विरोधकांनाही.

बन्सिलालच्या गुन्ह्याला राजकीय गुन्हा म्हटल्याचा परिणाम अवघा चारच दिवसांनतर दिसला. दिल्लीतील दंडाधिकाऱ्याने ६ मे १९८० रोजी संजय गांधी व त्यांचे गणंग यांच्यावरील, त्यांनी १ मे १९७९ रोजी दिल्लीतील जनपथावर जी गुंडगिरी, दंगल व मारहाण केली होती, तिच्या संदर्भात भरण्यात आलेले खटले काढून टाकले. दंडाधिकाऱ्याने आपल्या निर्णयाचे समर्थन करताना म्हटले की, '१ मे १९७९ रोजी जे घडले ते प्रस्थापित सरकारच्या निषेधार्थ आयोजित केलेले निदर्शन होते. त्यामुळे त्याला राजकीय गुन्हा असे म्हणावे लागेल.' या पुढेही जाऊन दंडाधिकारी असे म्हणाले की, 'अशा प्रकारचा आरोप (संजय गांधी व गणंग) एके काळी महात्मा गांधी, भारताचे पहिले पंतप्रधान, भारताचे पहिले राष्ट्रपती आणि सध्याचे राष्ट्रपती यांच्यावरही ठेवण्यात आलेला होता.' आणि अशा प्रकारे गुंडगिरीसाठी शिक्षा तर सोडाच पण संजय गांधी व गणंगांना न्यायालयाने थेट महात्मा गांधी व इतर महात्म्यांच्या रांगेत नेऊन बसवले !

न्यायालयासमोर शपथ घ्यावयास नकार देणे हा भारतीय दंडसंहितेच्या १७८ व्या कलमानुसार गुन्हा आहे. निवेदन करावयास नाकारण संहितेच्या १७९ व्या कलमानुसार गुन्हा आहे श्रीमती गांधींनी ११ आणि १९ जानेवारी १९७८ रोजी न्यायमूर्ती शहांसमोर शपथ व निवेदन करायला नकार दिल्यामुळे त्यांच्यावर खटला भरण्यात आला होता. श्रीमती गांधींवरील हा खटला काढून टाकण्यात यावा असा निकाल न्या. चावलांनी ३० डिसेंबर १९८० रोजी दिला व चौकशी-आयोगाला अशा प्रकारे निरर्थक ठरवले व सत्तेचा गैरवापर व कोर्टाची बेअदबी करणाऱ्याला पूर्ण संरक्षण दिले !

यात महत्त्वाचा भाग असा आहे की, असाच गुन्हा एखाद्या सामान्य भारतीय नागरिकाने केला असता तर त्याला शिक्षा झालीच असती. मी असे म्हणतो याला पुरावा म्हणजे एम. एस. आर. कोशीसागर विरुद्ध महाराष्ट्र राज्य खटला (१९७३): या खटल्याच्या संदर्भात माहिती अशी की, परभणी जिल्ह्यातील एका तलाठयाने शंभर रुपयांची लाच घेतली, ज्यात तो पकडला गेला. आपला बचाव करताना तो तलाठी म्हणाला की, 'हे पैसे मी स्वत:साठी घेतलेले नाहीत, अल्पबचतीचे व पोस्टाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मी ते वापरले.' मुंबई उच्च न्यायालयाने 'आरोपी म्हणतो तसे असेलही; परंतु त्याचे काम आहे व ते करण्याच्या बदल्यात त्याने पैसे घेतले म्हणून हा गुन्हाच ठरतो.' न्यायालयाने त्याला एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली !

दुसरा खटला गुजराथमधील १९७६ चा. सुंदरलाल घीवाला विरुद्ध गुजराथ राज्य. भडोचच्या मामलेदाराकडे दोन व्यक्तींनी प्रतिज्ञापत्राची प्रत मागितली. या कामासाठी मामलेदाराने त्यांच्याकडून २० रु. घेतले व तो लाच घेताना पकडला गेला. मामलेदार आपला बचाव करताना म्हणाला की, 'मी हे पैसे ध्वजदिनाची वर्गणी म्हणून घेतले, स्वत:साठी नाही.' न्यायालयाने त्याचे म्हणणे ग्राह्य धरले नाही व त्याला २०० रु. दंड व एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली ! ह्या निकालाच्या समर्थनार्थ न्यायाधीश म्हणतात की, 'त्याने कशासाठीही पैसे घेतलेले असोत. ते सरकारी कामाच्या बदल्यात घेतले होते म्हणून तो गुन्हाच ठरतो !'

हे झाले सर्वसामान्य व्यक्तींच्या संदर्भात. अशाच प्रकारची कृती माजी मुख्यमंत्री अंतुलेंनीही केली. तेव्हा त्यांना भ्रष्टाचारविरोधी कायदा लागूच नये अशी कायद्यात दुरुस्ती करण्याचा प्रयत्न झाला. त्याला श्रेष्ठींनी दिल्लीत मान्यता दिली व मुंबईत काढून घेतली. भ्रष्टाचारविरोधी कायद्यात दुरुस्ती करणार नाही असे सांगतानाच पक्ष त्यांना वाचवण्याचा पूर्णत: प्रयत्न करील असेही राजीव गांधींनी म्हटले.

आपल्या पदाचा गैरवापर करताना मोठ्या प्रमाणात मंत्री दिसताहेत; पण सर्वसामान्यांना होणारी शिक्षा त्यांना होणार नाही. कारण या देशात फक्त १००, २००, ५० रु. खाणाऱ्यालाच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व त्यानुसार होणारी शिक्षा लागू आहे. कोटयवधी रुपयांचा अपहार करणाऱ्याला नाही !

सत्ताधारी लोकांना, त्यांनी केलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल शिक्षा राजेशाहीत व हुकुमशाहीतच फक्त नसते; पण इथे तर लोकशाही असताना सत्ताधाऱ्यांना कायदा लागू नाही अशी विचित्र स्थिती आहे. त्यामुळे राजकारणी मंडळी गुन्हा करून राजरोसपणे मुक्त होताना दिसत आहेत, जे लोकशाहीच्या दृष्टिकोनातून अत्यंत भयावह आहे ! □

## मुक्काम हैदराबाद ( ३ )

# तेलगुदेसम आणि एनाडू वृत्तपत्राचा पाठिंबा - विरोध

सुभाष काळे

नक्षलवाद्यांच्या चळवळीखेरीज चोऱ्या, खून, दरोडे यांचे प्रमाणही तेलगुदेसमच्या राजवटीत वाढले. जातीय दंगेही वाढले आहेत. खुद्द हैद्राबाद शहरात १९८३ च्या वर्षभरात अनेक दंगे झाले. २४ सप्टेंबर ८३ ला झालेल्या हैद्राबादच्या जातीय दंग्यात एकंदर ४० माणसे ठार झाली. २५ सप्टेंबरला ३६ तासांचा कर्फ्यू पुकारलेला होता, तरी तो दंगा लवकर शमला नाही !

तेलगुदेसमचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना त्यांनी, 'आपण राज्याला स्वच्छ व चांगले प्रशासन देऊ' अशी घोषणा केली होती. काय झाले त्या घोषणेचे ? मुख्यमंत्र्यांची घोषणा आणि वर्तन यात किती तफावत आहे हे दर्शविणाऱ्या खालील घटना पाहण्याजोग्या आहेत.

'हिंडापूर' हून निवडून आलेले तेलगुदेसमचे आमदार श्री. रंगय्या कुलू यांच्यावर आमदारनिवासातील झाडूवालीवर बलात्काराचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. त्यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला त्या वेळी एन. टी. आर. नी त्याला पक्षातून हाकलून दिले व गुन्हेगारांची गय केली जाणार नाही असे सांगितले. आज काय परिस्थिती आहे ? केस का रेंगाळते आहे ? याचे उत्तर मुख्यमंत्री देऊ शकत नाहीत. तसेच तो तेलगुदेसममध्ये परत कसा काय परतला याचाही खुलासा ते करू शकत नाहीत.

विजयवाडाहून निवडून आलेले तेलगुदेसमचे आमदार देवीनी जयप्रकाश ऊर्फ नेहरू यांच्यावर खुनासह दहा गुन्ह्यांच्या केसेस दाखल झालेल्या आहेत; पण त्याचा पुढे तपास बंद आहे कारण मात्र समजत नाही. कृष्णा रेड्डी हा तेलगुदेसमचा आणखी एक आमदार. त्याच्यावर, तो पूर्वी अॅग्रिकल्चरऑफिसर असताना सहा लाख त्र्याऐंशीहजार रुपयांच्या अफरातफरीबद्दल मेहबूबनगर कोर्टात गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल होऊन बराच काळ लोटलेला आहे; पण सुनावणी मात्र नाही. आहे की नाही गंमत !

गोपाल राजू या तेलगुदेसमच्या आमदारावर 'पद्रीकुपम्' या ठिकाणी हरिजनांचे खून पाडणे व त्यांची घरेदारे जाळणे याबाबतीत खुद्द शासनाने नेमलेल्या चौकशीसमितीने ठपका ठेवला आहे. ठपका आहे, पण कारवाई मात्र नाही आणि दुसरीकडे मुख्यमंत्री हरिजनांच्या झोपडीला भेट देत असल्याची तसेच त्यांच्या समवेत जेवण घेत असल्याची छायाचित्रे वृत्तपत्रांत झळकतात, याचा अर्थ त्यांची ही नाटके आहेत असा नव्हे तर काय ?

कुडाप्पा जिल्ह्यातून निवडून आलेल्या आ. रामकृष्णन् रेड्डीवर अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. १९७५ मध्ये त्याचेवर – १४७, १४८, ३२४, ३६५, ३८५ (क्रि. नं. १०१७५) या कलमांखाली कोर्टात केस चालू आहे. त्याच वर्षी परत त्याला लोकांकडून पैसे लुटणे व समाजविघातक कृत्यांबद्दल ताब्यात घेतले होते; पण साक्षीपुराव्याअभावी तो सुटला ! १९७६ मध्ये तो आणि त्याचे वडील दोघेही खुनाच्या आरोपावरून पकडले गेले होते. त्या प्रकरणाचा शोध न लागल्याने काही काळ मिसाखाली बंद होते. अशा गुन्हेगारांना तेलगुदेसमने तिकिटे कशी काय दिली ? इतर वृत्तपत्रांसह दैनिक एनाडूने ही सर्व प्रकरणे छापली आहेत; पण त्यावर एन. टी. रामाराव यांनी अद्याप मौन बाळगलेले आहे. इकडे मौन बाळगून दुसऱ्याच ठिकाणी रामारावनी एका मंत्र्याची दांडी उडविली ! ती घटना म्हणजे श्रममंत्री रामचंद्रराव यांना त्यांनी १५–१६ फेब्रुवारी ८४ ला लावलेला सापळा. ते एकंदर प्रकरण असे—

रामचंद्रराव हे एन. टी. रामाराव यांच्या मंत्रिमंडळातले श्रमखात्याचे मंत्री. ते लाच घेतात अशा अनेक तक्रारी आल्यानंतर, कोणत्याही एका प्रकरणाची निश्चित माहिती न पुरवता एक जनरल रुमर म्हणून 'तुमच्याबद्दल फार तक्रारी आहेत' असे एन. टी. रामाराव यांनी रामचंद्ररावना सांगितले. त्यावर रामचंद्रराव काय म्हणाले वगैरे हा भाग गुलदस्तातच राहिला. एक कर्तव्य म्हणून त्यांनी त्यांच्या कानावर घातले असावे. मागोमाग एन. टी. रामराव यांनी स्टेट इंटेलिजन्स खातेप्रमुखाला सूचना देऊन सापळा रचला.

स्टेट इंटेलिजन्स प्रमुख आहेत आप्पा राव. त्यांनी आपल्या एका निवृत्त स्नेह्याला 'येनान' चा उद्योगपती बनविले व कुठे जायचे, काय बोलायचे व काय करायचे या सर्व सूचना दिल्या. त्या नकली उद्योगपतीने श्रममंत्री श्री. रामचंद्रराव यांच्याशी फोनवरून कामाबाबत बोलणी केली व भेटीची वेळ निश्चित केली. त्या नकली उद्योगपतीकडे १०० रुपयांच्या शंभर नोटांचे बंडल दिले गेले. त्यातील ११ व्या नोटेवर एन. टी. रामाराव यांनी संक्षिप्त सही केली होती. हा उद्योगपती त्या नोटा घेऊन मंत्र्यांकडे गेला. प्रथम भेटला त्यांचा खाजगी सचिव गफूर. त्याने हे प्रकरण मंत्र्याकडे नेण्यासाठी १ हजार रुपये मागितले. ते देण्यात येऊन बाकीची रक्कम मंत्र्यांकडे पोचती झाली. त्यानंतर एन. टी. आर. नी रात्र जाऊ दिली व दुसरे दिवशी वृत्तपत्रांना बातमी दिली. वृत्तपत्रांतील बातमी पाहून श्रममंत्री मुख्यमंत्र्यांकडे गेले. त्या वेळी काही न बोलता त्यांनी त्यांची त्या नकली उद्योगपतीबरोबर झालेल्या बोलण्याची टेप त्यांना ऐकवली व राजिनामा द्यायला सांगितले व तो दिला नाही म्हणून राज्यपालांकरवी मंत्रिमंडळातून त्यांना हाकलले. पत्रकारांनी

घटनेची दुसरी बाजू समजून घेण्यासाठी श्रममंत्री रामचंद्र राव व खाजगी सचिव गफूर यांना भेटण्याचा प्रयत्न केला. ते भेटले नाहीत तसे एन. टी. रामारावही पण भेटले नाहीत.

आपल्या खात्यातला एक मंत्री भ्रष्टाचारी आहे हे स्वतःच मुख्यमंत्र्यांनी सिद्ध करून दिलेले असल्याने मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी राजिनामा द्यावा अशी जोरदार मागणी विरोधी पक्षांनी विधानसभेत केली. त्या वेळी झालेल्या चर्चेत मुख्यमंत्र्यांनी वृत्तपत्रांतून आलेला तपशील नाकारला व 'सापळा आपण लावलेला नव्हता, नोटाही आपल्या नव्हत्या. आरोपात कितपत तथ्य आहे हे फक्त मला जाणून घ्यायचे होते. तथ्य सापडले. मी त्यांना हाकालले,' असे उत्तर दिले.

स्वतः रामचंद्रराव यांचे म्हणणे असे की, आपण रंगे-हात पकडलो गेलो नाही. कोणी तरी उद्योगपती असल्याचे सांगून माझ्याकडे आला. त्याच्या हातात पैसे होते, मी त्याला चांगलाच झापला, तसा तो पैसे टाकून पळाला. म्हणून त्याच्या मागोमाग गेलो, तोच स्टेट इंटेलिजन्सचे प्रमुख आप्पाराव आत आले. एकंदर प्रकार सांगण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांना फोन लावला; पण ते नव्हते, वगैरे ! वगैरे ! !

एन. टी. रामाराव यांनी वाजविलेली टेप गोंधळाची आहे. त्यात काहीच ऐकायला येत नव्हते इतकी ती अस्पष्ट आहे, असे पत्रकारांचे देखील म्हणणे. मग या प्रकरणात कोणाची बाजू खरी ? एन. टी. रामाराव यांची की रामचंद्रराव यांची ?

एन. टी. आर. चे चिरंजीव एन. जयकृष्णा यांच्या मालकीच्या रामकृष्ण स्टुडिओचा प्रश्न. या स्टुडिओचे रुपांतर दोन जुळ्या चित्रपटगृहांत करण्याचा त्यांचा मानस होता. हा प्रश्न कार्पोरेशनच्या कार्यक्षेत्रातला होता; पण तरीही त्याला मान्यता मिळाली. ही जागा अगदी भर वस्तीत असल्याकारणाने वाहतुकीची समस्या निर्माण होणार होती; पण हे मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव पडले ! त्यांना विरोध कसा करणार ? कोणताही विचार न करता मान्यता दिली गेली. त्यावर लोकांनी विरोध केला. शेवटी निर्णय बदलला. दोन जुळ्या चित्रगृहांचा विचार बदलला तरी त्यांनी मूळ हेतू सोडला नाही, स्टुडिओविस्ताराची योजना आखली. ४० रुपयांना तीन फूट हा दर असलेली कार्पोरेशनची जागा १५ रुपयांना तीन फूट या दराप्रमाणे लाटली व भव्य स्टुडिओ उभारला ! संजयचा मारुती कारखाना तर एन. जयकृष्णाचा रामकृष्ण स्टुडिओ !

एन. टी. रामाराव यांनी आपल्या मोठ्या जावायला कार्पोरेशनचा चेअरमन केले आहे, तर दुसरा जावई डॉ. वेंकटेश्वर राव हे युवा तेलगुदेसमचे प्रमुख आहेत. हे नेहमी प्रशासनात हस्तक्षेप करीत असतात. त्यांचे तिसरे जावई इंदिरा कॉंग्रेसमध्ये होते. त्यांना तेलगुदेसमचे तिकिट देऊन आमदार केले आहे. तिकिटासाठी त्यांनी पक्षप्रमुखावर दडपण आणले. आता हा सर्व काही फार मोठा भ्रष्टाचार नाही हे खरे असले तरी ही सुरुवात आहे. एकदा सुरुवात झाली की मोठा भ्रष्टाचार व्हायला कितीसा वेळ लागणार ?

हे सर्व असले तरी रामाराव एकंदर काटकसरी आहेत हे मान्य करावेच लागते. पूर्वीच्या सरकारपेक्षा निश्चितपणे पैशाची उधळपट्टी कमी आहे. पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांचा प्रत्येक वर्षाला फोनखर्च ६२ लाख रुपये होता, तर विमानाचा एक कोटीच्या आसपास ! रामाराव यांनी टेलिफोनखर्च १ लाखावर आणला आहे. विमानखर्च फक्त काही लाखांत आहे. हिवाळी अधिवेशनाला रजा देऊन त्यांनी ३६५ दिवसांत फक्त ५३ दिवस अधिवेशन घेतले व खर्चकपात केली. ते स्वतःच्या निवासात राहतात. वटहुकूम काढून शासकीय पातळीवरील खर्चातही त्यांनी कपात केलेली आहे; पण झाले काय तर इकडे केलेली बचत दुसरीकडे चुकीची धोरणे आखून व उत्साही निर्णय घेऊन खर्चून टाकली. प्रशासनातील ढिलाईमुळे त्यांचा वचक संपलेला आहे. शिवाय प्रशासकीय कामाची माहिती नसल्याने सर्वत्र भ्रष्टाचार माजलेला आहे. सिनेमातल्या अभिनयाइतके प्रशासन चालविणे सोपे असते तर कोणताही 'हिरो' सिनेमा सोडून राजकारणाकडे पळाला नसता काय ?

## अण्णा डी. एम्. के. -- तेलगुदेसम

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द चांगली आहे. पाठोपाठ एन. टी. आर. च्या विजयामुळे अनेक चित्रपटअभिनेते राजकारणाकडे वळू लागले आहेत. कर्नाटकातला राजकुमार आहे. तामिळनाडूचा शिवाजी गणेशन त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील दादा कोंडके यांच्याही हालचाली सुरू आहेत; पण वस्तुस्थिती समजून घेतली जात नाही. एम. जी. आर. व एन. टी. आर. यांच्यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. तेहेत्तीस वर्षांपूर्वी मद्रास प्रांतात इ. व्ही. रामस्वामी नायकर यांनी सवर्णांच्या सामाजिक व राजकीय मक्तेदारीविरुद्ध दंड थोपटले त्या वेळी त्यांच्या जोडीला अण्णा दुराई, करुणानिधी यांच्याबरोबर एम. जी. आर. होते. या दोघांच्या अगदी जवळ राहून एम. जी. आर. नी राजकारणाचे धडे गिरवले आहेत. हा पहिला भाग. दुसरा भाग द्रविडमुन्नेत्रकळघम' हा पक्ष चांगला स्थिरावला होता आणि तिसरी गोष्ट म्हणजे राजकारण, मुत्सद्देगिरी, प्रशासकीय कौशल्य हे एम. जी. आर. कडे आहे, तर एन. टी. आर. कडे या सर्वच बाबींची ओरड आहे. त्यामुळे एम. जी. आर. व एन. टी. आर. त्याचप्रमाणे इतर चित्रपट हिरो यांची तुलना होऊ शकत नाही.

आण्णा डी. एम. के. ही केडरपार्टी आहे तशी 'तेलगुदेसम ही केडरपार्टी नाही. त्यामुळे स्वतः एन. टी. आर. कितीही चांगले असले किंवा त्यांचे निर्णय, योजना कितीही फायदेशीर असल्या तरी त्या तळागाळापर्यंत पोचविण्यासाठी पक्षाला स्वतःचे माध्यम नाही. त्यामुळे चांगल्या कामांची वाट लागत आहे.

एन. टी. आर. सत्तेवर आले त्या वेळची हवा फार जबरदस्त होती. भारताचा दक्षिणेतला पहिला भावी पंतप्रधान म्हणून लोक त्यांच्याकडे पाहू लागले होते. त्यांच्या स्वतःच्या मनातही ती इच्छा आहे, नाही असे नाही; पण गेल्या वर्षभरातील खडतर वाटचालीत ती काहीशी मागे पडली आहे.

एन. टी. रामाराव यांनी निवडणुकीत दिलेली आश्वासने, त्यानंतर मुख्यमंत्री म्हणून घेतलेले निर्णय आणि अंमलबजावणीत आलेले अडथळे पाहून त्यांनी त्यापासून काढलेला पळ पाहून त्यांच्यातली धरसोडवृत्ती दिसून येते. ठाम निर्णय ते घेऊ शकत नाहीत, हा त्यांचा वीकपॉइंट आहे. थोडी-फार टीका, विरोध झाला की, ते



एन्. टी. आर–
भाजप व लोकदलाला विरोधी पक्षआघाडीत सहभागी करून घेण्याबाबत जाहीरपणे आग्रही भूमिका घेतली होती.

सपशेल माघार घेतात. त्यांची ही मनाची गोंधळलेली अवस्था आजही कायम आहे. या बाबतीतला काही महिन्यांपूर्वीचा अनुभव बघण्याजोगा आहे.

विश्व हिंदु परिषदेने काढलेल्या एकात्मता रथयात्रेचा कार्यक्रम ठरला त्या वेळी आंध्रप्रदेशातील स्वागतासाठी स्वत: हजर राहणार, ती यात्रा तामिळनाडूच्या हद्दीत प्रवेश करेपर्यंत आपण रथयात्रेबरोबर राहणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते; पण टीका होताच त्यांनी निर्णय फिरवला. इतकेच नव्हे तर तेलगुदेसमच्या कोणत्याही आमदाराने रथयात्रेत सहभागी होऊ नये अगर संपर्क ठेवू नये असा आदेशही काढला ! मुख्यमंत्र्यांनी विरोध दर्शविला तरी हैद्राबादच्या लोकांनी रथयात्रेचे प्रचंड स्वागत केले. पोलिसांनीही कडक बंदोबस्त ठेवला. चारमिनारभागात काही महिन्यांपूर्वी दंगा झाला होता. तिथे जाण्यास नंतर प्रतिबंध करण्यात आला वगैरे-वगैरे भाग वेगळा.


रथयात्रेप्रमाणेच विरोधी पक्षांच्या आघाडीबाबत त्यांचे धोरण धरसोडीचे आहे. भारताचा दक्षिणेकडील पहिला भावी पंतप्रधान या शब्दात काही खुशमस्करे म्हणू लागले तेव्हा स्वत: एन टी. आर. चे डोळेही दिल्लीकडे वळले. सर्व विरोधी पक्षांचे नेतृत्व करण्याच्या विचाराने पछाडलेल्या रामाराव यांनी सर्व विरोधी पक्षांना ‘ विजयवाडा ’ येथे एकत्र आणले; पण त्यात भाजप व लोकदल सहभागी नव्हते. त्यांना त्यांनी सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने दिल्ली बैठकीत प्रयत्न केले; पण काश्मिरच्या बैठकीत मात्र पूर्णपणे न थांबता बैठक अर्धवट सोडून निघून आले. त्यांनी भाजप व लोकदलाला विरोधी पक्षआघाडीत सहभागी करून घेण्याबाबत जाहीरपणे आग्रही भूमिका घेतलेली होती. जम्मू–काश्मिरचे मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला हे हैद्राबादला आले होते. मुख्यमंत्री एन्. टी. रामाराव व फारुख अब्दुल्लांच्या वाटाघाटींच्या ज्या तीन–चार फेऱ्या झाल्या त्यातही त्यांनी हा आग्रह कायम ठेवला होता. त्यानंतर या वर्षाच्या सुरुवातीला भा. ज. प. चे अटलबिहारी बाजपेयी व चरणसिंग हे एकत्रितपणे हैद्राबादला आले होते. त्या वेळी एन. टी. आर., बाजपेयी, चरणसिंग यांच्या भेटीगाठी झाल्या- ‘पुढील लोकसभानिवडणुकीत भा. ज. प. लोकदलासह सर्व विरोधी पक्षांच्या लोकांनी एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही ’ असे एका जाहीर सभेत एन. टी. रामाराव यांनी नि:संदिग्धपण सांगितले; पण राज्यसभेच्या निवडणुका जाहीर होताच त्यांनी विरोधी आघाडी संदर्भात पवित्रा बदलला आणि विरोधी पक्षांशी–त्यातल्या त्यात भा. ज. प. शी–ते अतिशय अलिप्तपणाने वागू लागले आहेत. त्यामागचे कारण असे की, जर यदाकदाचित विरोधी पक्षाशी समझोता झालाच तर विरोधी पक्षांना काही जागा सोडाव्या लागतील. निदान ज्यांचे तीन–चार आमदार आहेत अशा भा.ज.प., कम्युनिस्ट पक्षांसाठी तरी सोडाव्या लागतील. त्याला त्यांची तयारी नाही. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये ‘ संडे ’ साप्ताहिकाच्या प्रतिनिधी अनिता प्रताप यांनी त्यांना विचारले होते–

‘ व्हॉट विल बी दि तेलगुदेसमस् स्ट्रॅटेजी फॉर दि लोकसभा पोल्स ?’

एन टी. रामारावनी उत्तर दिले होते– ‘ तेलगुदेसम इज तेलगुदेसम. वुई विल फील्ड अवर कँडिडेटस् इन ऑल द फॉर्टीटू सीटस. दॅट इज अवर पॉलिसी !’

यावरून एन. टी. आर. च्या भूमिकेवर प्रकाश पडतो. भारतात ज्या ज्या ठिकाणी विरोधी पक्षांच्या राजवटी आहेत त्या त्या ठिकाणी तेथल्या सत्ताधारी पक्षांनी सर्व जागा लढवाव्यात व उर्वरित जागांवर समझोता करावा अशी त्यांनी नवीन भूमिका घेतलेली आहे म्हणजे आंध्रातील लोकसभेच्या सर्व जागा तेलगुदेसमने लढवाव्या, तामिळनाडूतल्या आण्णा डी. एम. के. ने, काश्मिरात नॅशनल कॉन्फरन्सने, कर्नाटकात जनता पक्षाने आणि उरलेले प्रांत म. प्रदेश, उ. प्रदेश, बिहार या ठिकाणी इतर सर्व विरोधी पक्षांनी आपापसात वाटून घ्याव्यात ही त्यांची नवी भूमिका. एन. टी. आर. च्या भूमिकेने सर्व विरोधी पक्षात नवीन खळबळ उडाली आहे.

माणसाच्या नाडीवर बोट ठेवले की शरिरातील हालचाली समजू शकतात. हमाल, रिक्शावाले, शेतकरी, शेतमजूर, कामगार हा वर्ग म्हणजे शासनाच्या नाड्या. त्यांना चाचपले की राज्याची एकंदर परिस्थिती समजू शकते. हा वर्ग जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ माहिती सांगतो. कारण त्यांच्यापैकी कोणाला निवडून यायचे नसते की,



गरिबांची ही काळजी ! अपेक्षा खूप होत्या पण भ्रमनिरास झाला.

फायदा उपटायचा नसतो. चार घास सुखाचे मिळाले की ते एकंदर सुखी. दोन वेळच्या रोटीचाही प्रश्न पडतो तेव्हाच ते तक्रारीचा सूर लावतात. अवास्तव स्तुती किंवा अवास्तव टीका हे दोन्ही प्रकार त्यांच्याकडे नसतात. त्या दृष्टीने मी एका रिक्शावाल्याला म्हटले, 'तुम्ही कॉंग्रेसमधील राजवटीपेक्षा सुखी असाल. कारण एन. टी. आर. नी दोन रुपये किलो तांदूळ जाहीर केले आहेत. शिवाय इतरही अनेक सवलती जाहीर केलेल्या आहेत.'

त्यावर त्याचे उत्तर असे–

'क्या बताना साब ? दो रुपयाँ किलो चावल, बच्चों का दोपहेरका खाना, सस्ते मे चाय, इडली, गोरगरीब लोगोंके घरमें जाना. उनके पीठपर हात रखकर तस्वीर खींचना यह सब ड्रामा है-ड्रामा! कॉंग्रेसवाले जो भी करते थे वो कम से कम असलियत मे करते थे. अच्छा भी करते थे और बुरा भी. बिलकुल आमने–सामने मे. उनके पास ड्रामा वगैरे कुछ नही था. मगर यह सब लोग फिल्मी लोग हैं. नाटक करने मे एकदम एक्सपर्ट. सच क्या और झूट क्या यह पता नही चलता. देखो साब, अभी अनाज, चावल इतना मेहंगा है कि दो वक्त की रोटी भी आसानीसे नही मिलती. रात–दिन मेहनत करनी पडती है ! अपना फायदा उठाने के लिए यह लोग गोरगरीबोंके साथ तस्वीरे निकालकर अखबार में छपवाते हैं और व्होटके लिये हाथ फैलाते हैं।

हा प्रश्न मी अनेक रिक्शावाल्यांना विचारला. थोड्या–फार फरकाने उत्तर तेच असायचे; पण एन. टी. आर. राजवटीबद्दल झालेला भ्रमनिरास मात्र सर्वांनीच मांडला. अपेक्षा काय होत्या आणि झाले काय म्हणून हे बिचारे नशिबाला दोष देत दोन वेळच्या घासासाठी सकाळ-संध्याकाळ रखडत होते !

एक कम्युनिस्ट–कामगार–पुढारी भेटला. तोही एन. टी. आर. राजवटीवर नाराज होता. त्याला एकंदर परिस्थितीबद्दल विचारले असता तो म्हणाला, 'कॉंग्रेस राजवट चांगली होती. ते भ्रष्टाचारी होते वगैरे वगैरे सर्व काही खरे असले तरी ते उत्तम प्रशासक होते हे कोणीही मान्य करील. त्यांचा भ्रष्टाचार वरच्या लोकांना जाचक होता; पण गोरगरीब व मध्यमवर्गीय माणसे सुखी होती, सुरक्षित होती !'

गोरे नावाचे गृहस्थ भेटले. मूळचे ते सोलापूरचे. त्यांनी तेलगुदेसम व कॉंग्रेस राजवटीपेक्षा आम्ही निजामाच्या कारकीर्दीत फार सुखी होतो, असे म्हटले. आश्चर्य वाटल्याने मी परत म्हटले,

'म्हणजे ? आपण म्हणता तरी काय ?'

त्यावर त्यांनी 'रझाकाराचा काळ सोडता' असा खुलासा केला. आपल्याकडील ही मनोवृत्ती नवी नाही. थोडा–फार त्रास झाला की, आजही ही मंडळी म्हणतात, यापेक्षा ब्रिटिश बरे होते वगैरे वगैरे. हा त्यांच्या मनातील सात्त्विक मनस्तापाचा भाग. याचा अर्थ त्यांना स्वातंत्र्याचे मोल समजले नाही, असा मात्र नव्हे.

## सिर्फ लेबल नया !

आंध्रप्रदेश लोकदलाचे सेक्रेटरी जी राजेश्वरी रेड्डींची भेट झाली. करीमनगर जिल्ह्यातले हे एक जमीनदार. कमाल जमीनधारणा कायद्यातून पळवाटा शोधून अद्यापही एक हजार एकर जमीन जवळ बाळगलेली आहे. पूर्वी कॉंग्रेसमध्ये. पंतप्रधान गांधी, डॉ. एम. के. चेन्ना रेड्डी यांच्या वर्तुळात वावरलेला. या मंडळींबरोबर असलेले त्यांचे डझन–दोन डझन फोटोही पाहिले. सध्या ते लोकदलात असल्याने चरणसिंगबरोबर काढलेला एक फोटो त्यांनी माझ्या हातात ठेवला. हे महाशय एक मासिकही चालवतात. स्टेट इन्फर्मेशनच्या ऑफिसमध्ये भेट झाल्यानंतर मी त्यांना प्रश्न विचारला,

'व्हॉट अबाउट न्यू गव्हर्नमेंट ? एनी कॉमेंट ?'

त्यावर त्यांनी 'न्यू गव्हर्नमेंट ?' असे म्हणून प्रश्नार्थक चेहरा केला.

'देखो साब, !यह शराब भी पुरानी है और बोतल भी ! सिर्फ लेबल नया है !'

'वो कैसे ?'.. माझा प्रश्न.

त्यावर राजेश्वर रेड्डी...

. ' रिपोर्टरसाब, यह सब चोर है. ये कहाँ के नये हैं? वही लोग है जिन्होंने कॉंग्रेस को साफ किया है और भ्रष्टाचार कर के वो बाहर चले गये थे. अभी वो तेलगुदेसमें हैं इसका मतलब नया नही होता. जिन्होंने जिंदगीभर कॉंग्रेसमें रहकर लूट लिया अब वो ठीक कैसा करेंगे? अब तो वो वही करनेवाले हैं जो उन्होंने कॉंग्रेसमें किया. इनमे एन. टी. रामाराव खाली नया है. मगर वो तो अभी कठपुतली बन चुका है!'

राजेश्वर रेड्डींबरोबर अनेक विषयांवर चर्चा झाली. गप्पांनंतर त्यांनी आपल्या स्कूटरवरून स्वत: मला महाराष्ट्र मंडळात आणून सोडले व निरोप घेतला.

काही माजी मंत्री व सध्या आमदार असलेली इंदिरा कॉंग्रेसची मंडळी भेटली. त्यांनी तेलगुदेसमची शासनावरील पकड ढिली पडत चालली असल्याचे सांगून लवकरच आम्ही सत्तेवर येऊ असा आत्मविश्वास प्रकट केला. जनता पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्टांनी तेलगुदेसमचा सध्या तरी पराभव अशक्य आहे असे सांगितले; पण त्याचबरोबर प्रशासनातील दोषांमुळे सर्वसामान्य माणूस कसा भरडला जात आहे हे त्यांनी अनेक उदाहरणे देऊन दाखवून दिले आणि हीच परिस्थिती कायम राहिली तर ते पुढील निवडणुकीत भुईसपाट होतील असेही त्यांनी सांगितले.

भारतीय जनता पक्षाचे आमदार व्यंकय्या नायडूंची भेट विधान-सभागृहाबाहेर झाली. त्या वेळी त्यांनी सविस्तर गप्पा मारण्या-साठी व रात्रीच्या जेवणासाठी पार्टीऑफिसमध्ये येण्याचे निमंत्रण दिले. वेळ नसल्याने मी काही गेलो नाही. सभागृहाबाहेर चहा-पाणी करताना पंधरा-वीस मिनिटे आमच्या गप्पा झाल्या होत्या. एकंदर त्यांच्या बोलण्यातला सूर असा की, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था संपलेली आहे. त्यामुळे पुढील निवड-णुकीत त्यांना भवितव्य नाही. जनता पक्षाचे अपेश झाले हे खरे असले तरी त्यांचा केंद्रातला कारभार चांगला होता. भांडणा-मुळे त्यांना जावे लागले. तेलगुदेसमला लोक हाकलतील ते त्यांच्या निष्क्रियतेसाठी! पुढील निवडणुकीत राज्यातील भा. ज. प. ची ताकद निश्चितपणे वाढलेली असेल, असा त्यांनी विश्वास व्यक्त केला.

माझे एक दूरचे नातेवाईक-पुण्याचे पूर्वीचे जिल्हाधिकारी श्री. दिनेश अफजुलपूरकर यांचे बँक ऑफ इंडियात असलेले काका यांची अचानक भेट झाली. त्यांच्याशी बराच वेळ गप्पागोष्टी झाल्या. त्या वेळी त्यांनी 'आंध्रप्रदेशची सध्याची आर्थिक स्थिती चांगली असल्याचे सांगितले. तेलगुदेसमचा कारभार नवा असल्याने काही गोंधळ हा उडणारच; पण थोड्याच दिवसांत ते सुधारतील असे ते म्हणाले. पूर्वीची कॉंग्रेसची राजवट संपली. त्यामागचे कारण फक्त भ्रष्टाचार हेच होते. तेलगुदेसम भ्रष्टाचारी नाही. त्यामुळे ते सत्तेवर जादा काळ राहतील,' असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

माजी मुख्यमंत्री-डॉ. एम. के. चेन्ना रेड्डी यांची एका कार्यक्रमात भेट झाली. त्यांच्याशी थोडा वेळ बोललो. त्यांनी तेलगुदेसमला भवितव्य नसल्याचे सांगितले. त्याचबरोबर यापुढे आंध्रात कोणताही अखिल भारतीय पक्ष सत्तेवर येऊ शकणार नाही, येथे फक्त प्रादेशिक पक्षालाच वाव मिळेल असेही सांगितले. एकंदर बोलण्या-वरून ते फ्रस्टेटेड वाटले. सत्तेवर येण्याचा प्रयत्न म्हणून त्यांनी २६ फेब्रुवारी ८४ ला विजयवाडा येथे नव्या पक्षाची स्थापना केली आहे. १८ मार्चपर्यंत त्याचे स्वरूप अस्थायीच होते. त्यानंतर निवडणुकांचे नाटक होऊन स्वत: रेड्डीच निवडून आले. डॉ. एम. के. चेन्ना रेड्डी काहीही म्हणोत, आंध्रात 'तेलगुदेसम' अस्तित्वात आला त्याचे कारण कॉंग्रेसमधील भ्रष्टाचार आणि कॉंग्रेसमधील भ्रष्टाचाराला जर प्रामुख्याने कोण जबाबदार असेल तर ते डॉ. एम. के. चेन्ना रेड्डी! हे चांगले प्रशासक आहेत; पण कमालीचे भ्रष्ट. हे गृहस्थ केंद्रात पेट्रोलियम रसायनखात्याचे मंत्री होते. निवडणुकीत भ्रष्टाचार केल्याच्या कारणावरून त्यांची निवडणूक रद्द झाली तेव्हा ते आंध्रात परतले. त्यानंतर त्यांनी 'तेलंगण प्रजा समिती' नावाचा पक्ष काढला व दोन-तीन वर्षे आंदोलन केले. त्यानंतर आंध्राचे मुख्यमंत्रीपद प्राप्त करून घेतले. या काळात त्यांनी करोडो रुपये हडप केले. मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी झाल्यानंतर काही काळ ते राज्यपाल होते. राज्यपाल-पद सोडून आता ते परत आंध्रात परतले आहेत आणि परत मुख्य-मंत्रीपदावर येण्याची स्वप्ने पाहत आहेत.

कोणी काहीही म्हणाले तरी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांचे ध्येय मात्र वेगळे आहे. त्यांना आंध्राचे एम. जी. आर. व्हायचे आहे. एम. जी. आर. सारखा एक मजबूत मुख्यमंत्री म्हणून लोकांनी त्यांच्याकडे पहावे असे त्यांना वाटते. माझी आणि मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांची भेट झाली ती विधानभवनात लंच-अवरमध्ये. मुलाखतीसाठी वेळ मिळतो का ते बघण्यासाठी त्यांच्या पीआरओ कडे गेलो, तेव्हा ते तिथेच होते; पण माझा मूड आधीच त्यांच्या अवकारी मंत्र्याने-जीवन रेड्डी-ने खराब केला होता. त्यामुळे गेल्या-गेल्या मी प्रथम जीवन रेड्डीच्या उद्धटपणाबद्दल त्यांच्याकडे तक्रार केली. त्या वेळी त्यांनी प्रत्येक माणसाची दुसऱ्याला ट्रिट करण्याची पद्धत वेगवेगळी असते. फारसे मनावर घेऊ नका, सोडून द्या असे म्हणून माझी समजूत काढली.

जीवन रेड्डींच्या उद्धट वागण्याने थोडासा रंगभंग झाला होता त्यामुळे काहीच बोलता आले नाही. एन. टी. रामाराव यांच्याशी मुलाखत झाली; पण कशी? त्याचे स्वरूप सांगण्यासाठी राष्ट्रपती झैलसिंग यांनी पंढरपूर येथे पत्रकारांना ऐकवलेला शेर येथे देतो. तो पुरेसा आहे.

नजर ही नजर मे मुलाकात हो गई.
रहे दोनों खामोश और बात हो गई

मुख्यमंत्री एन. टी. रामाराव आणि माझ्या भेटीचे स्वरूप काहीसे असेच होते. मी त्यांच्याकडे मुलाखतीसाठी वेळ मागितली. त्यांनी तीन-चार दिवस थांबावे लागेल असे मला सांगितले. कारण दोनच दिवसांनी पंतप्रधान गांधींचा हैद्राबादला दौरा होता. त्यांच्या हस्ते विजयवाडा दूरदर्शनचे उद्घाटन होणार होते व त्या दौऱ्याच्या गडबडीत ते होते. 'मी तितके दिवस हैद्राबादमध्ये थांबणार नाही; पण यदाकदाचित थांबलोच तर भेट मिळेल का? निदान मला चर्चेसाठी एक तास तरी लागेल!' त्यावर ते म्हणाले, 'का नाही? सरळ घरीच या. मी पीआरओला सांगून ठेवतो.'

'ठीक आहे. मी प्रयत्न करतो.' असे म्हणून निरोप घेतला.

माझे हे बोलणे जेमतेम पाच–सात मिनिटांचे असेल; पण त्यांच्या बोलण्यात मात्र मार्दव होते.

पंतप्रधान गांधींच्या दौऱ्यामुळे मुख्यमंत्री भेटू शकले नाहीत. त्याचप्रमाणे राज्यविधानसभेचे अधिवेशन चालू असल्याने इतर मंत्री भेटू शकले नाहीत. तसेच सर्वजण भेटले; पण दहा–पंधरा मिनिटांपलीकडे कोणाशी बातचीत झाली नाही. माझा हैद्राबादचा मुक्काम संपला होता. तेलंगणातील इतर जिल्ह्यांत भटकायचे असल्याने मीही विशेष लक्ष दिले नाही.

### एनाडू–प्रकरण

मी हैद्राबादेत होतो तेव्हा 'एनाडू' चे संपादक श्री. रामोजीराव यांच्यावरील हक्कभंगप्रकरण ऐनरंगात आले होते. त्यानंतरच मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी राज्यपालांना विधानपरिषदेचे अधिवेशन तहकूब करण्याचा सल्ला दिला. या घटनात्मक पेचप्रसंगाने आंध्रप्रदेश विधानपरिषद, मुख्यमंत्री एन. टी. रामाराव, एनाडू आणि त्याचे संपादक रामोजीराव आज देशभर गाजत आहेत. या सर्वांचे मूळ आहे तो तेलगुदेसमचा विधानसभाबरखास्तीचा निर्णय. तो आपण मागच्या लेखांकात पाहिलेला आहेच. आता या ठिकाणी आपण ज्या दैनिक 'एनाडू' ने व रामोजीराव यांच्यामुळे पेचप्रसंग उभा राहिला, त्यांची थोडी माहिती करून घेऊ.

नऊ वर्षांपूर्वी रामोजीराव यांनी विशाखापट्टम् येथून 'एनाडू' हे तेलगु दैनिक सुरू केले. आता ते हैद्राबाद, विजयवाडा, तिरुपती या ठिकाणांहूनही निघते. या चार आवृत्त्यांचा एकंदर खप साडेतीन लाख आहे. आंध्रप्रदेशाच्या २३ जिल्ह्यांत दै. एनाडूचे तालुका पातळीपर्यंत एकूण २५० वार्ताहर आहेत. त्यातले २०० च्या जवळपास पार्टटाइम तर ५० पूर्ण वेळ वार्ताहर आहेत व ते दै. एनाडूचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम पाहतात. त्याशिवाय खप व जाहिराती याकडे लक्ष देण्यासाठी १५० लोकांची स्वतंत्र यंत्रणा आहे.

दै. 'एनाडू' ची जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी प्रतिनिधी-कार्यालये आहेत. ती सर्व मुख्य कार्यालयाशी टेलीप्रिंटरने जोडलेली आहेत. दिवसभरात जिल्ह्यातील बातम्या टेलिप्रिंटरवर पाठविल्या जातात. जिल्हा बातम्यांसाठी स्वतंत्र पान दिले जात असल्याकारणाने या सर्व बातम्या कव्हर केल्या जातात. एस. टी. अगर रेल्वेच्या वेळाप्रमाणे छापून त्या त्या जिल्ह्याला पोचविल्या जातात. 'एनाडू' च्या जिल्हावार आवृत्तीच्या प्रयोगामुळे त्याचा खप वाढण्यास फार मदत झाली. साहजिकच अनेक आवृत्त्या काढाव्या लागत असल्याकारणाने जुळणी, छपाईची यंत्रणा त्यांनी अद्यावत ठेवली आहे. पूर्वी फक्त विशाखापट्टम् येथूनच निघत असल्याकारणाने जिल्हा आवृत्त्यांचा ताण पडत असे. तो ताण हैद्राबाद, विजयवाडा, तिरुपती येथील शाखांमुळे कमी झाला. प्रत्येक भागाला जिल्हे वाटून दिलेले आहेत. त्यामुळे कामात सोयिस्करपणा आलेला आहे.

रामोजीराव यांनी दै. एनाडूचे एकंदर स्वरूप व मजकूर याबाबतीत दर्जा ठेवला आहे. सुबक छपाई, भरपूर बातम्या, सोप्या व प्रवाही भाषेतील दर्जेदार लेख व अग्रलेख यामुळे गेल्या नऊ वर्षात दै. एनाडूने आपला वाचकवर्ग तयार केला आहे. 'एनाडू'ने आतापर्यंत आंध्रात विरोधी पक्षांना उचलून धरले. एन. टी. रामाराव यांनी तेलगुदेसम्‌ची स्थापना करताच रामोजीराव यांनी त्यांना पाठिंबा दिला. प्रारंभी एन. टी. आर. यांच्या निवडणूकमोहिमेची इतर वृत्तपत्रे दखल घेत नसत. त्या काळात एनाडू त्यांच्यामागे उभा राहिला. एनाडूच्या वार्ताहरांनी एन. टी. रामाराव यांची निवडणूक वार्तापत्रे छायाचित्रांसह प्रसिद्ध केली. त्यामुळे तेलगुदेसम लोकांपर्यंत जाऊन पोचला. एन. टी. रामाराव यांच्या सिनेमातील राम व कृष्णाच्या भूमिकेमुळे ते खेडोपाडी, अशिक्षित लोकांपर्यंत पोचले होते व ते एन. टी. आर.च्या पाठीशी होते. त्यांना जो नव्याने मध्यमवर्गीय शिक्षितांचा पाठिंबा लाभला तो एनाडूमुळे. त्या दृष्टीने रामाराव यांच्या यशात 'एनाडू'चा वाटा मोठा आहे यात शंका नाही.

एनाडूने एन. टी. रामाराव यांना निवडणुकीत पाठिंबा दिला हे जसे खरे तसे तेलगुदेसम सत्तेवर आल्यानंतर, एन. टी. आर. यांच्या गैरकारभारावर, धरसोड वृत्तीवर, त्यांच्या चिरंजिवांच्या रामकृष्ण स्टुडिओच्या प्रकरणावर, भ्रष्ट मंत्र्यांवर, गुन्हेगार आमदारांवर लिहायलाही एनाडूने मागेपुढे पाहिले नाही. उलट कित्येक प्रकरणे एनाडूने उजेडात आणली, हे लक्षात घेण्याजोगे आहे.

अशा या दै. एनाडूने दिनांक १० मार्च १९८३ च्या आपल्या अंकात विधानपरिषदेच्या कामकाजाचे वृत्त देताना, 'प्रश्नोत्तर आला पै पेड्डाला गला भा.' –(प्रश्नोत्तराच्या वेळी वरिष्ठांनी केलेला गोंधळ) या मथळ्याखाली बातमी दिली. या बातमीची लगेच दखल विधानपरिषदेने घेतली. बातमीमुळे गृहाचा हक्कभंग व अवमान झाला असा ठराव विधानपरिषदेने संमत केला व हक्कभंगसमितीच्या शिफारसीनुसार रामोजीराव यांना सभागृहासमोर आणून ताकीद देण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे रामोजीराव यांना गृहापुढे हजर ठेवावे असा आदेश विधानपरिषद सभापतींनी हैद्राबादच्या पोलीसआयुक्तांना दिला. दरम्यान विधानपरिषदेच्या ठरावाविरुद्ध रामोजीराव यांनी सर्वोच्च न्यायालयात अर्ज केला व आपण हक्कभंग केलेला नाही असा दावा त्यांनी या अर्जात केला आहे. सर्वोच्च




या संघर्षातील माझे सर्वोच्च ध्येय ना गुलामी प्रथेला अभय देणे आहे ना तिचे उच्चाटन करणे आहे. ते आहे देशाची अखंडता अबाधित ठेवणे. जर एकाही गुलामाला मुक्त न करता मी देशाची अखंडता राखू शकलो तर ते मी करेन. जर काही गुलामांची मुक्तता केल्याने आणि काहींना तसेच ठेवून देश अखंड ठेवता आला, तर ते मी करेन मी गुलामी प्रथेबाबत वा काळ्या वंशाच्या लोकांबाबत जे करतो ते देशाची अखंडता कायम रहावी यासाठीच करतो आणि त्याला विरोध करतो तो यासाठी की त्यामुळे देश अखंड रहायला साहाय्य होणार असते – **लिंकन**

**देशाचे विच्छेदन हेच पाप मानणाऱ्या सर्वात महान राजकीय नेत्याची संपूर्ण ओळख करून देणारा ग्रंथ.**

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



**फाळणी एकदा झाली**
**पुनः होणार नाही ह्याची शाश्वती वाटावी**
**अशी परिस्थिती नाही.**
**प्रत्येकाने अभ्यासायला हवी अशी**
**लिंकनची राजकीय कहाणी.**

**भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली**
**पहिली डिलक्स आवृत्ती.**
**मोठा क्राऊन आकार**
**पृष्ठे : सुमारे ४००**

आमची पंधरावी कला

**राजहंस प्रकाशन** १०२५ सदाशिव पेठ. पुणे. ४११ ०३०.

न्यायालयाने रामोजीराव यांचा दावा प्रथम दर्शनी मान्य केला असून किरकोळ बाबीची विधानपरिषदेने गंभीर दखल घेतली असे मत व्यक्त करून, त्यांना अटक करून विधानपरिषदेसमोर नेण्यास पोलीसअधिकाऱ्यांना मनाई केली. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश न मानता पोलीसआयुक्तांनी रामोजीराव यांना गृहापुढे हजर करावे असा आदेश परत विधानपरिषदेने नव्याने काढला. या घटनात्मक पेचप्रसंगातून वाट काढण्यासाठी राष्ट्रपतींनी याबाबत सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घ्यावा अशी विनंती मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी केली. तसेच विधानपरिषदेचे अधिवेशन स्थगित करण्याचा सल्ला त्यांनी राज्यपालांना दिला व राज्यपालांनी त्याप्रमाणे आदेश काढला.

सर्वोच्च न्यायालयापुढील रामोजीराव यांच्या अर्जाची सुनावणी ३ एप्रिलला होऊन ती ३१ जुलैपर्यंत स्थगित करण्यात आलली आहे. या प्रकरणी केंद्र सरकारची व राज्य सरकारची बाजूही समजून घेतली पाहिजे असे रामोजीराव यांचे वकील एस. एफ. नरीमन यांनी न्यायालयाला सांगितले. न्यायालयाने त्याप्रमाणे त्यांना आपल्या अर्जात दुरुस्ती करण्याची परवानगी दिली आणि भारताचे ॲटर्नी जनरल व आंध्राचे ॲडव्होकेटजनरल यांना आपल्या बाजू मांडण्यासाठी न्यायालयाने नोटिसा काढल्या आहेत.

या सर्व घटनांमुळे आंध्रसरकारपुढे काही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

पहिला प्रश्न असा की, आंध्रप्रदेश विधानपरिषदेची बैठक पुन्हा कधी बोलावण्यात येईल? राज्यसरकारच्या सल्ल्याने राज्यपाल या बाबतीत निर्णय घेतात हे खरे असले तरी सर्वोच्च न्यायालयापुढील अर्जाच्या सुनावणीपूर्वी ही विधानपरिषदेची बैठक भरविली जाईल की सुनावणी पूर्ण होईपर्यंत ती भरवलीच जाणार नाही? सरकारपुढे व विधानसभेपुढे त्यामुळे काही अडचणीचे प्रश्न उपस्थित होतील का?

अर्थविषयक विधेयक विधानपरिषद फेटाळू शकते; पण ते फेटाळले गेलेले विधेयक परत विधानसभेने संमत केल्यास त्याचा कायदा होतो. यातला दुसरा भाग असा की, विधेयक विधानपरिषदेकडे पाठविले गेल्यापासून चौदा दिवसांच्या आत निर्णय करायचा तो न केल्यास कायदा होतो; पण या १४ दिवसांच्या कालावधीपर्यंत विधानसभेला थांबावेच लागेल. त्याच्या आत काही करता येत नाही असेही विधानपरिषद ठरवू शकते. असा निर्णय घेतल्यानंतर थांबावे लागत नाही; पण सध्या बैठक चालू नसल्याने १४ दिवस थांबणे भाग आहे. हा अनावश्यक कालापव्यय आहे.

समजा विधानपरिषदेची बैठक बोलावली तर पुरेशा गणसंख्येअभावी ती स्थगित करायला भाग पाडायचे असा डावपेच काँग्रेसचे सभासद अवलंबतील काय? हा एक प्रश्न सध्या तेलगुदेसमपुढे आहे. सभागृह चालू ठेवण्याइतपत, गणसंख्येइतके सभासद आपल्या बाजूला असावेत असा तेलगुदेसमचा प्रयत्न आहे. सध्या विधानपरिषदेत त्यांचे पाच सभासद आहेत. निवडणुकीनंतर तीन वाढतील. तरी एक जागा त्यांना गणसंख्येला कमी पडते. सरकारनियुक्त एक जागा भरावयाची आहे. त्या जागेनंतर हा प्रश्न मिटतो. विधानपरिषदेत २० जागांच्या निवडणुका जून–जुलैमध्ये होतील त्या वेळी निदान ११ जागा तरी मिळतील असा तेलगुदेसम्चा दावा आहे. त्यामुळे एकंदर वीस सभासद तेलगुदेसमचे होतील. एन. टी. रामाराव यांची नेहमीची धरसोडवृत्ती पाहता, त्या वेळी विधानपरिषद रद्द करण्याचा निर्णय त्यांनी बदलल्यास आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

आंध्रप्रदेश विधानसभाक्षेत्रातील हे प्रश्न झाले; पण त्यामुळे देशाच्या संसदीय क्षेत्रातही काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत. कारण घटनासमितीने विधिमंडळांचे व संसदेचे हक्क कोणते याची चर्चा केली; परंतु लेखी नियम किंवा कायदा अस्तित्वात नाही. ब्रिटिश पार्लमेंटला जे अधिकार व हक्क आहेत ते येथील विधिमंडळ व संसदेला आहेत असे मानले जाईल असे मार्गदर्शक तत्त्व घटनाकारांनी दिले आहे.

रामोजीराव एनाडूमध्ये केलेल्या बातमीमुळे हक्कभंग झाला असे विधीमंडळाला वाटले तरी त्यामुळे जर वृत्तपत्रस्वातंत्र्यावर परिणाम होत असेल तर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय करणे आवश्यक ठरते. कारण घटनेने सामान्य नागरिकाला आणि वृत्तपत्रांना मूलभूत हक्क दिले आहेत. हे मूलभूत हक्क हा भारतीय घटनेचा गाभा आहे. या मूलभूत हक्कांवर जर हक्कभंगाने गदा येत असेल तर न्यायालयाने हस्तक्षेप करणे आवश्यकच आहे. त्या दृष्टीने खा. मधू दंडवते यांनी 'संसदेची निवड करण्याबाबत जनता सार्वभौम आहे असे आपल्या घटनेने म्हटले आहे. कायदे करणे व कायद्यात दुरुस्ती करणे याबाबत संसद सार्वभौम आहे; परंतु कायद्याचा अर्थ लावणे याबाबत न्यायालये सार्वभौम आहेत' जे म्हटले आहे ते योग्यच आहे.

लोकसभेचे सभापती यांनी या प्रश्नावर लोकसभेतील चर्चेत 'संसद वा विधिमंडळ सार्वभौम आहे' असा उल्लेख केला. त्यामुळे 'विधिमंडळ वा संसद विरुद्ध मूलभूत हक्क' असे चित्र उभे राहते. त्या दृष्टीने भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस खा. लालकृष्ण अडवाणी यांनी सभागृहाच्या हक्कांच्या प्रश्नावर योग्य भूमिका कोणती घ्यायला हवी हे हैद्राबादच्या पत्रकारपरिषदेत चांगल्या प्रकारे विशद केले आहे. ते म्हणतात, 'विधिमंडळ सदस्यांना विशेषाधिकारांमुळे इतरांपेक्षा वरचढ दर्जा देण्यात आलेला नाही. विधानसभा-सदस्य व विधिमंडळावर झालेल्या वाजवी टीकेचे भा. ज. प. च्या आमदारांनी स्वागत करावे टीका दडपून टाकण्यासाठी हक्कभंगाचा उपयोग करण्याचे त्यांनी टाळावे. सध्याच्या दैनिक एनाडूवरील हक्कभंगप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची वाट पाहावी आणि पेचप्रसंग मिटविण्यासाठी प्रयत्न करावा.' या ठिकाणी भा. ज. प. च्या विधिमंडळ-सदस्यांनी काय केले हा महत्त्वाचा प्रश्न नाही. अडवाणींनी सांगितलेले एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून सर्वच पक्षांच्या विधिमंडळ-सदस्यांनी ते आचरणात आणायला हरकत नाही.

आंध्रप्रदेशाचा पंधरा दिवसांचा दौरा संपलेला होता. हैद्राबाद, नलगोंडा, वरंगल, करीमनगर, आदिलाबाद करीत करीत निझामाबादला आलो. निझामाबादला नांदेडकडे जाणाऱ्या गाडीत बसलो. त्या वेळी आकाशात ढग भरून आले. वळवाचा पाऊस सुरू झाला. त्या धुवांधार पावसातच गाडीने निजामाबाद सोडले!

**समाप्त**

'ज्ञानदीप' हा दूरदर्शनवरचा सध्या सर्वात हीट कार्यक्रम आहे आणि याचा हीरो आहे आकाशानंद. ज्ञानदीपच्या कार्यक्रमांचा एक साचा आहे आणि त्याच्यातून वेगवेगळया महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांवर पंधरा मिनिटांत लोकांच्या डोळयांत अंजन घालणारी ठाम उत्तरं निर्माण होतात. ज्ञानदीपला नावं ठेवणारे खुशाल ठेवोत; पण ज्ञानदीपनं दिलेली उत्तरं लोकांना आवडतात हे खरं आहे! याबद्दल ज्ञानदीपचे निर्माते, प्रेक्षक, दिग्दर्शक यांचं काय मत आहे ?

# ज्ञानदीपचा हेतू निश्चितच स्तुत्य आहे, पण त्यातून दिलं जाणारं शिक्षण हे वाजवीपेक्षा जास्त भाबडं आहे!

शुभदा रानडे

'दूरदर्शनच्या कार्यक्रमांवर टीका करणं हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' अशा थाटात प्रत्येकजण दूरदर्शनच्या कार्यक्रमांवर आणि पर्यायानं दूरदर्शनवर मोठया आवेशानं टीकेची झोड उठवत असतो. अर्थात असं असलं तरी 'घरात टी. व्ही. आहेच म्हणून कार्यक्रम बघतो.' असं म्हणत 'नाइलाजानं' का होईना; पण सारेच दूरदर्शनवरचे कार्यक्रम उत्साहानं बघतही असतात, त्यावर तावातावानं चर्चाही करतात. साहजिकच या टीकेच्या हल्ल्यातून तसं पाहायला गेलं तर दूरदर्शनचा कुठलाच कार्यक्रम सुटत नाही आणि 'ज्ञानदीप' तर नाहीच नाही. सुरुवातीपासून ते आतापर्यंत 'ज्ञानदीप' मधली नाटकं, या नाटकांमधला उथळ ढोबळपणा, सामान्य तांत्रिक बाजू, अभिनयाच्या प्राथमिक अवस्थेतले कलाकार, उपदेश देण्याचा हव्यास...वगैरे अनेक गोष्टींवरून 'ज्ञानदीप' ला सतत नावं ठेवली जातात, चेष्टा केली जाते आणि हे सर्व गृहीत धरूनही चित्रपटविषयक उधार-उसनवारीचे कार्यक्रम वगळता 'ज्ञानदीप' हा दूरदर्शनवरचा एक हीट कार्यक्रम आहे, या सत्य परिस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही. या विसंगतीतील कारणं शोधायचा प्रयत्न केला तर त्याला अनेक फाटे फुटत गेले आणि या शंकांचं निरसन 'ज्ञानदीप' च्या निर्मात्यांकडूनच करून घेणं अधिक योग्य ठरलं असतं म्हणून सरळ मुंबई दूरदर्शन केंद्र गाठलं.

आकाशानंद ऊर्फ आबा यांच्या 'केबिन' कडे जात असताना दूरदर्शनविषयीच्या सर्व ग्लॅमरस कल्पना भ्रामक ठराव्यात अशीच परिस्थिती आहे. तिथंच समोर एक खोली. इथं असणाऱ्या निर्मात्यांपैकी एक आकाशानंद (खोलीत निर्माते चार, टेबल-खुर्च्या तीनच, सोडवा बघू कोडं!) या खोलीच्या एकचतुर्थांश भागातच आबांनी 'ज्ञानदीप' चा संसार थाटलाय. 'ज्ञानदीप' च्या आठवड्याला दोन कार्यक्रमांच्या रतिबाची तयारी करणं, कार्यक्रमात भाग घ्यायला आलेल्या नवोदितांची दखल घेणं, दुसऱ्या एखाद्या ग्रुपबरोबर पुढचा कार्यक्रम ठरवणं, 'ज्ञानदीप मंडळां' च्या भाराभर उपक्रमांची नोंद घेणं, अशी अनेक कामं आबा जितक्या शांतपणे पण वेगानं हातावेगळी करत जातात, तोच शांतपणा त्यांच्यावर, 'ज्ञानदीप' वर होणाऱ्या टीकेला उत्तरं देताना त्यांच्या बोलण्यात आढळतो. कदाचित सहा वर्षं सतत टीका पचवल्याचा हा परिणाम असेल. अर्थात त्यांच्या उत्तरात शांतपणा आहे, मवाळपणा नाही. आत्मविश्वास आहे; पण अनाठायी नाही. मतांचा आग्रह आहे; पण सक्ती नाही.

'ज्ञानदीप' च्या कार्यक्रमांमध्ये साध्या शब्दात एखादी गोष्ट पटवून देणं, प्रेक्षक आणि कार्यक्रम यांच्यातली तटबंदी दूर करून प्रेक्षकांना कार्यक्रमात सामावून घेणं...वगैरे ठळक वैशिष्टयांची बीजं आबांच्या भूतकाळात सापडतात. कारण आकाशवाणी आणि दूरदर्शनवरचा हा यशस्वी निर्माता म्हणजे मूळचा शिक्षक. १९५३ ते १९५९ पर्यंत शिक्षक म्हणून काम केल्यानंतर १९५९ मध्ये आबा नागपूर आकाशवाणीवर निर्माता म्हणून गेले आणि ग्रामीण कार्यक्रम सादर करू लागले. याच कार्यक्रमात आबा आणि खंडूजी नावाच्या दोन पात्रांचा संवाद असायचा. चालू घटनांवरची दखल घेणं, त्यावर चर्चा करणं...असं त्या कार्यक्रमाचं स्वरूप असे. सतत बारा वर्षं या कार्यक्रमातील 'आबांच्या' भूमिकेतून श्रोत्यांशी पंचेचाळीस मिनिटं संवाद साधणाऱ्या आकाशनंदांचं 'आनंद बाळाजी देशपांडे' हे खरं नाव मागंच पडलं. त्यानंतर आबांनी नागपूर आकाशवाणीवरची नोकरी सोडली; पण त्यांना चिकटलेलं 'आबा' हे नाव काही सुटलं नाही. मुंबई दूरदर्शनवर पहिल्यांदा त्यांच्याकडे 'शालेय चित्रवाणी' सोपवण्यात आली होती. त्याच सुमारास मुंबई शहर समाज शिक्षण समितीतर्फे औपचारिक साक्षरतेचे (Formal Education) धडे देण्याचा कार्यक्रम दूरदर्शनवर सुरू झाला होता; पण साठ कार्यक्रमांचं कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर मुंबई शहर समाज शिक्षण समितीनं पुढं कार्यक्रम करायचं नाकारलं. तेव्हा या कार्यक्रमांना मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन, आबांनी हाच कार्यक्रम पुढं चालू ठेवला.

दूरदर्शनची सुरुवात झाली ती 'मनोरंजनातून शिक्षण 'EDUCATION THROUGH ENTERTAIMENT' हे ध्येयवाक्य बरोबर घेऊन; पण या ब्रीदवाक्याचा बऱ्याच अंशी बोऱ्या वाजला असला तरी 'ज्ञानदीप' ने मात्र या ब्रीदवाक्याचा आधार सोडलेला नाही, आणि कार्यक्रमाचं

स्वरूपच समस्याप्रधान नाटकं PROBLEM ORIENTED PLAYLETS असं ठरवून टाकलं. म्हणजे निव्वळ मनोरंजन नाही किंवा शिक्षणाचा रुक्ष व्यवहार नाही. म्हणजेच दूरदर्शनच्या धोरणाशी 'ज्ञानदीप' प्रामाणिक राहिला आहे. सहा वर्षं इमाने-इतबारे हे धोरण राबवण्याचा प्रयत्न करतो आहे. एक निर्माता या नात्यानं यामागची भूमिका स्पष्ट करताना आबा म्हणाले, 'ज्ञानदीप'साठी नाटकांची निवड करताना एक गोष्ट सतत ध्यानात ठेवावी लागते की, या नाटकात कुठला ना कुठला विचार दडलेला असला पाहिजे. कारण 'ज्ञानदीप' केवळ मनोरंजनासाठी नाटक देत नाही तर नाटक हे विचार, संस्कार देण्यासाठी, समोर मांडण्यासाठी निवडलेलं एक माध्यम आहे. साहजिकच कुठल्याही नाटकात विशिष्ट विचार असला पाहिजे—जो परावर्तित होऊ शकतो. या नाटकांनी प्रेक्षकवर्गाला विचार करायला भाग पाडलं पाहिजे किंवा त्यांच्या विचारांना दिशा मिळाली पाहिजे.'

'ज्ञानदीप' कार्यक्रमाचा हा हेतू निश्चितच स्तुत्य आहे; पण हे मान्य केलं तरीही या नाटकांचा फॉर्म किंवा त्यातून दिलं जाणारं शिक्षण हे वाजवीपेक्षा जास्तच भाबडं आहे, असा एक आरोप केला तर फारसं वावगं ठरू नये. गंमत म्हणजे खुद्द आबांनाही हा आरोप मान्य आहे. अत्यंत सफाईनं या आरोपाचं खंडन त्यांनी केलं—'एकदम मान्य हा आरोप; पण मला एक सांग- सहा वर्षांचं मूल भाबडंच असणार नाही का ? त्याच्याकडून आपण किती प्रौढ विचारांची अपेक्षा करायची ? 'ज्ञानदीप' आताशीक सहा वर्षांचं झालंय आणि ते जसजसं वयानं वाढेल तसतसं हे भाबडेपण आपोआपच कमी होत जाईल. सुरुवातीचे 'ज्ञानदीप'चे कार्यक्रम आणि आताचे 'ज्ञानदीप'चे कार्यक्रम यात निश्चितच फरक पडत गेलाय आणि 'ज्ञानदीप' नियमित पाहणाऱ्यांना हा फरक जाणवत असेल. तेव्हा पुढंही 'ज्ञानदीप'मधलं हे भाबडेपण कमी होत जाईल; पण त्याला थोडा वेळ जायला हवा.


आबांनी भविष्यकाळाची हमी दिल्यानं त्यावर आता काही बोलणं शक्य नव्हतं. त्यामुळं मोहरा सरळ दुसऱ्या प्रश्नाकडे वळवला. 'ज्ञानदीप'च्या कार्यक्रमांवर दिसणारा मध्यमवर्गीय संस्कृतीचा छाप आपोआप निर्माण झाला की, जाणूनबुजून निर्माण केला?

'ज्ञानदीप' वरचा मध्यमवर्गीय संस्कृतीचा शिक्का हा जाणूनबुजून उमटवलेला आहे कारण शेवटी 'ज्ञानदीप'चा प्रेक्षकवर्ग हा मुख्यत्वेकरून मध्यमवर्गीय संस्कृतीतलाच आहे. आता हाच प्रेक्षकवर्ग का बांधून घेतला तर हा कनिष्ठ मध्यमवर्गच असा आहे की, ज्याच्यात 'ज्ञानदीप' मधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचं, संस्कारांचं परावर्तन होताना दिसतं. 'ज्ञानदीप'च्या कार्यक्रमातून दिल्या जाणाऱ्या निष्ठांचं मूल्य त्यांना पटलय. म्हणजे मध्यमवर्गाशी जवळीक साधणाऱ्या निष्ठा, मूल्य, संस्कार हाताशी धरून 'ज्ञानदीपनं हुकमी प्रेक्षकवर्ग मिळवला आणि दिवसेंदिवस हा प्रेक्षकवर्ग वाढतच गेला. मग प्रश्न असा उरतो की, 'ज्ञानदीप'नं प्रौढ शिक्षणाचं व्रत स्वीकारलेलं आहे. मग शिक्षणात कनिष्ठ, उच्च असा भेदाभेद कसा करून चालेल ? किंवा फक्त कनिष्ठ मध्यमवर्गालाच शिक्षणाची गरज आहे का ? आबांचं उत्तर आहे. 'शिक्षणात असा भेदाभेद करता येत नाही. गोष्ट खरीय; पण हा



'ज्ञानदीप'चे निर्माते आकाशानंद

◘



**चला शिकू या (साक्षरतेचे वर्ग) — ज्ञानदीपचा फसलेला कार्यक्रम**

**कनिष्ठ मध्यमवर्ग** सोडला तर उरलेला **प्रेक्षकवर्ग** म्हणजे झोपडपट्टीतला, उच्च **मध्यमवर्ग** किंवा उच्च वर्ग; पण हे प्रेक्षक-**वर्ग** कुठल्याही प्रकारचं शिक्षण चटकन **स्वीकारण्यातले** नाहीत. 'ज्ञानदीप' मधले **संस्कार**-विचार कनिष्ठ मध्यमवर्गात जसे **पटकन** उचलले जातात. तसे या इतर प्रेक्षक-**वर्गात** उचलेले जात नाहीत. उच्च मध्यमवर्ग **किंवा** उच्चवर्ग यांच्यात 'ज्ञानदीप' कार्य-**क्रम** पाहिला जातो, नाही असं नाही. कारण **हे** लोक मुद्दाम पत्र–बित्र पाठवण्याची तसदी **घेत** नसले तरी कधी फोनवरून किंवा प्रत्यक्ष **भटीत** कार्यक्रम पाहिल्याचं, आवडल्याचं / न **आवडल्याचं** सांगतात. अर्थात या प्रति-**क्रिया** कार्यक्रम आवडला / न आवडला—**इथपर्यंतच** मर्यादित असतात. त्याच्या पुढची **प्रक्रिया** होत नाही. उरला प्रेक्षकवर्ग झोपड-**पट्टीतला** आणि त्यांना शिक्षण-बिक्षण **हवयच** कुठे? त्यांना हवे असतात ते छाया-**गीत**–चित्रपट वगैरे! अर्थात या प्रेक्षक-**वर्गाला** 'ज्ञानदीप'कडे कसं ओढून घेता **येईल**, यासाठी मी प्रयत्न करतो आहे.'

## तेच कलाकार, तेच प्रेक्षक


'ज्ञानदीप' नं आपला प्रेक्षकवर्ग ठरवून टाकलाय. विषय साधारणपणे ठरवून टाक-लेत. एवढंच नाही तर या विषयांच्या सादरी-करणाचाही एक साचा ठरवून टाकलाय. त्यात सुरुवातीला एखाद्या विषयावर तावा-तावानं चर्चा चाललेली असते. मग साधा-रणपणे नाटकाच्या मध्यावर 'ज्ञानदीप'चा तो सुप्रसिद्ध मध्यस्थ येतो. तो शेलक्या शब्दात मंडळींना कानपिचक्या देतो. मंड-ळींना ते पटतं आणि कुठला तरी महान संदेश देऊन नाटकाचा 'दी एन्ड' होतो. एकाच ठराविक साच्याची नाटकं सतत देऊ-नही 'ज्ञानदीप'ची प्रेक्षकवर्गातली लोक-प्रियता कमी झाली नाही. हा प्लस पॉइंट मान्य केला तरी इतकं चौकटीत राहण्याचा अट्टाहास का? कुठला ना कुठला तरी संदेश देण्याचा हट्ट का? हे मायनस पॉइंटसुद्धी टोचत राहतात; पण 'ही चौकट हेच 'ज्ञानदीप' चं वैशिष्टय आहे' असं सम-र्थन करत आबा पुढं म्हणाले, 'आमचं कुठ-लंही नाटक हे फक्त त्या विषयाला स्पर्श करून थांबत नाही, तर त्यावर काही ना काही तरी ठाम सोल्यूशन देऊन जातं आणि मला वाटतं याचीच जास्त गरज आहे. कारण त्यामुळे नाटक संपल्यानंतर प्रेक्षकांच्या हातात काही तरी मिळतं. विशिष्ट दिशेन विचार करण्याची, या बदलत्या दिशेनं प्रवास कर-ण्याची ताकद मिळते / वाढते आणि शेवटी आपल्या आतापर्यंतच्या इतिहासात तरी काय दिसतं? महात्मा गांधी, महंमद पैगंबर यांनी आपल्याला मार्ग दाखवला, तेव्हाच आपण पुढं गेलो ना? मग मीही तेच धोरण 'ज्ञानदीप' साठी राबवलं तर बिघडलं कुठे?

'ज्ञानदीप'च्या तांत्रिक अंगांकडे केलेलं दुर्लक्ष याच भावनेतून का?'

'ज्ञानदीप'च्या नाटकांची तांत्रिक बाजू उपेक्षित आहे, ही गोष्ट मला मान्य आहे; पण या एका गोष्टीमागं कारणं मात्र अनेक आहेत. महत्त्वाचं कारण म्हणजे आठव-ड्याला 'ज्ञानदीप' चे दोन कार्यक्रम कर-ण्याचं बंधन आणि त्या प्रमाणात दूरदर्शन-वर नसलेल्या सोयी. दुसऱ्या शब्दात सांगा-यचं तर इथं आम्ही ३० गृहिणी आहोत आणि स्वयंपाकघर एकच आहे. मग तुम्ही प्रेक्षकमंडळीच सांगा की हे एक स्वयंपाक-घर कसं पुरं पडणार? मग त्याचा कार्य-क्रमावर परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. काही काही वेळेस जुनाच कार्यक्रम दाखवावा लागतो. घरी नाही का फ्रीजमध्ये काही पदार्थ ठेवलेले असतात आणि स्वयंपाक तयार नसेल तर आपण तेच वाढतो, नाही का? तसंच आहे हे; पण जरा एखादा कार्य-क्रम परत दाखवला की, लोक लगेच आरडा-ओरडा करतात की, यांच्याकडे कार्यक्रम नाहीत... वगैरे. तसंच 'ज्ञानदीप' च्या दृष्टिकोनातून विचार करायचा झाला तर मला तांत्रिक बाबींपेक्षाही आशय मह-त्त्वाचा वाटतो. हा आशय किती सरळ साधे-पणानं मांडता येईल, तो कसा आणि किती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचेल, त्यांच्या पचनी पडेल, हे जास्त महत्त्वाचं वाटतं...'

'पण तांत्रिक गोष्टी आणि आशय या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक अशाच आहेत. साहजिकच एकाच गोष्टीवर पूर्ण लक्ष केंद्रित करण्यापेक्षा दोहोंची सांगड घालण्याचा प्रयत्न केला तर म्हणजे आशयाला तांत्रिक मूल्यांचीही जोड मिळाली तर कदाचित ते लोकांना जास्त आवडेलही आणि उच्च तांत्रिक मूल्य असलेले कार्यक्रम बघायचीही सवय लागेल...'

'पण त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे मूळ आशयापेक्षा कदाचित इतर बाबतीतच प्रेक्षक जास्त गुरफटून गेला तर 'ज्ञानदीप' च्या मूळ उद्देशाचं काय? लोकांनी जर मला कधी सांगितलं की, अमुक अमुक नाटकातला



'ज्ञानदीप'मधलं हे घरेलू वातावरण सामान्य लोकांना आकर्षित करतं

□

तमुक तमुक सेट चांगला झाला होता वगैरे. तर मला ते आवडणार नाही. माझं अपयश मानेन मी ते. याउलट, तुमचं नाटक बघून विचार करावासा वाटला, त्याप्रमाणे वागावसं वाटलं, असं काही सांगितलं तर मला निश्चितच आनंद होईल आणि चांगली नाटकं करायला मला काय नको आहे का? पण त्यासाठी या नाटकावर विचार करायला आवश्यक तेवढा वेळ पाहिजे, त्यासाठी सोयी तितक्या प्रमाणात उपलब्ध असायला पाहिजेत, तशी माणसं हाताशी पाहिजेत. या साऱ्याचाच विचार करायला हवा..'

'वेळ काढणं तुमच्याच हातात आहे. म्हणजे आठवड्यातून दोनदा 'ज्ञानदीप' देण्याऐवजी एकदाच सादर करायचा. 'थोडंच द्यायचं; पण चांगलं द्यायचं.' असा थोडासा वेगळा विचार करता येणं शक्य नाही का?'

हे झालं असतं तर सुरुवातीलाच व्हायला हवं होतं. कारण 'ज्ञानदीप'चा पसारा आता एवढा वाढलाय की, ही गोष्ट शक्य होणार नाही. अजून तसा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला नाही; पण कधी कधी ऐनवेळेस आलेल्या कार्यक्रमामुळे 'ज्ञानदीप' रद्द झाला किंवा 'ज्ञानदीप'ची वेळ जरी साधी मागंपुढं केली तरी प्रेक्षकांकडून येणारी पत्रं कधी नाराजीचा तर कधी चक्क रागाचा सूर घेऊन येतात. कारण अशा अचानक बदलांमुळे त्यांनी 'ज्ञानदीप'ला धरून आखलेलं सगळं वेळापत्रकच विस्कटून जातं. ही गोष्ट लक्षात घेता 'ज्ञानदीप'च्या कार्यक्रमांची संख्या दोनावरून एकावर आणली तर 'ज्ञानदीप'चे प्रेक्षक कधीच खपवून घेणार नाहीत. कारण आठवड्यातून दोन कार्यक्रमांची सवय झालीय त्यांना. सुरुवातीला 'ज्ञानदीप' आठवड्यातून दोनदा सादर करण्याचं धोरण स्वीकारताना कुठलाच एक विशिष्ट दृष्टिकोण नव्हता खरा; पण आता अशी परिस्थिती आहे की, मागं फिरणं शक्य नाहीय.'

## आबांनी घडवलं

सर्वसाधारणपणे दूरदर्शनच्या निर्मात्यांकडून कामाचा बोजा खूप असल्याच्या तक्रारी कायमच केल्या जातात; पण 'ज्ञानदीप'चे दोन–दोन कार्यक्रम करण्याची गर्दी असूनही त्या मानानं आबांच्या बोलण्यात तक्रारीचा सूर कुठं आढळत नव्हता किंवा 'आलिया भोगासी असावे सादर' अशी बनचुकी वृत्तीही जाणवत नव्हती. हे ठीक आहे, आबांनी आपलं तन मन धनच 'ज्ञानदीप' साठी दिलय; पण या परिस्थितीत विषय शोधण्याची किंवा विषय वैविध्याची त्रुटी कधी जाणवत असेल का? कारण शेवटी उपदेश करून करून तरी किती करणार? पण छे! त्याबाबतीतही आबांकडून निराशेचा–त्राग्याचा सूर नाही. किंचित त्राग्याचा सूर आहे; पण तोही लटका म्हणजे इतकी स्क्रिप्टस् येतात, त्यांचं काय करायचं? म्हणून. इतर निर्माते विषय कुठून आणायचे? लिहून कुणाकडून घ्यायचं? कलाकार कुठून आणायचे? अशा विवंचनांमध्ये गुरफटलेले असतात; पण आबांना मात्र अशा काळज्या नसतात. 'आठवड्यातून दोन कार्यक्रम करण्याचं 'ज्ञानदीप'वर बंधन असतं; पण तरीही कधी विषयांचा तुटवडा पडत नाही. कारण माझ्याकडे महिन्याला जवळजवळ साठ ते सत्तर स्क्रिप्टस् येतात. त्यातली 'ज्ञानदीप'ला हवी असतात जास्तीत जास्त दहा. आता साठ–सत्तर स्क्रिप्टस्मधून 'ज्ञानदीप'साठी योग्य अशी दहा स्क्रिप्टस् निश्चितच मिळतात. त्यातल्या काही कल्पना खरोखरच चांगल्या असतात; पण बऱ्याच वेळा ही स्क्रिप्टस् दूरदर्शन-माध्यम डोळ्यांसमोर ठेवून लिहिलेली नसतात. मग मला हवी तशी ती बदलून घेणं–हे माझं काम. त्यासाठी मी या लेखकांबरोबर चर्चा करतो. माझ्या मनाजोगतं स्क्रीप्ट उतरेपर्यंत त्यांच्याकडून पुन्हा पुन्हा लिखाण करून घेतो. एक गोष्ट मात्र खरी की, ही नवी मंडळीही सहनशील असतात, प्रामाणिक असतात. तेही न कंटाळता माझ्या सूचनांनुसार स्क्रिप्टस् पुन्हा पुन्हा लिहून काढतात. त्यांना हे एक प्रकारचं ट्रेनिंगच नाही का?'

'ज्ञानदीप'च्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असलेले आणि सध्या 'ज्ञानदीप मंडळ महासंघाचे' अध्यक्ष असलेल्या प्रकाश जोशींनी सांगितलेला अनुभव या गोष्टीस पूरकच ठरतो. 'ज्ञानदीप'साठी मी पहिलं नाटक लिहिलं त्या वेळचाच अनुभव सांगतो. नाटक होतं 'पाणी वाचवा' या विषयावरचं आणि नाटकाची सुरुवातच धो धो पाणी वाहातंय. नळाखाली लावलेलं पातेलं वाहून चाललंय, तरी कुणाचं लक्ष नाही, या दृश्यानं केली होती. आबांनी स्क्रीप्ट वाचलं आणि म्हणाले, 'स्टुडिओत वाहता नळ आम्हाला दाखवता येणार नाही, हे बदलायला हवं.' आता आली का पंचाईत मला प्रश्न पडला. कारण पाण्यावरचं नाटक आणि पाणी दाखवायचं नाही म्हणजे काय? पण आबांनी थोडा वेळ विचार केला आणि सुचवलं की, प्रत्यक्ष वाहातं पाणी दाखवायचं नाही. फक्त पाणी कसं वाहून चाललंय या बाबत दोन बायकांमधला संवादच दाख-

वायचा की झालं !' आबांकडून अशा सूचना वेळोवेळी मिळत राहतात आणि त्यांचा नवोदितांना अतिशय फायदा होतो. पेशानं क्वालिटी कंट्रोल इन्स्पेक्टर असलेले प्रकाश जोशी 'ज्ञानदीप'च्या लेखक-कलाकारांपैकी एक महत्त्वाचे कलाकार ठरले आहेत.

## ज्ञानदीप की अज्ञानदीप ?

'ज्ञानदीप' नं लेखन–दिग्दर्शन–अभिनय या तिन्ही क्षेत्रांत अनेक नवे कलाकार दिले/घडवले. बहुतांशी हे कलाकार अगदीच प्राथमिक अवस्थेतले असले तरी या आरोपाला मात्र आबा आक्षेप घेतात. ते म्हणतात, 'सुरुवातीच्या 'ज्ञानदीप' च्या कार्यक्रमांमध्ये कलाकारांची अभिनयाची पातळी प्राथमिक अवस्थेत होती खरी; पण गेल्या १–११। वर्षात मात्र त्यात बरीच सुधारणा झालीय'– काही मोजक्याच वेळा चांगले कलाकारही दिलेत. 'पण एकंदरीत पाहता जो चांगला कलाकार आहे तो 'ज्ञानदीप'च्या कार्यक्रमात भाग घेण्यास फारसा उत्सुक नसतो..' प्रश्न पुरा व्हायच्या आतच आबा काहीसे उसळूनच म्हणाले, 'असं कोण म्हणतं ? चांगले चांगले, नावाजलेले लेखक, अभिनेते 'ज्ञानदीप' मध्ये भाग घ्यावयास केव्हाही तयार आहेत. कित्येकांनी तर आपली तयारी असल्याचं मजजवळ बोलूनही दाखवलं आहे. मलाही त्यांना घेऊन कार्यक्रम करायला निश्चितच आवडेल; पण पुन्हा इथं माझंच धोरण आड येतं. कारण शेवटी ज्यांच्या नावाला किमत आहे, त्यांना दूरदर्शनच्या इतर किती तरी कार्यक्रमांत भाग घ्यायची संधी आहे; पण नवशिक्यांचं काय? त्यांचा कोण वाली ? तेव्हाच ठरवून टाकलं की, 'ज्ञानदीप' हे प्रथितयश मान्यवर कलावंतांचे व्यासपीठ नाही. त्यामुळे मी माझा कार्यक्रम संपूर्णपणे नवोदितांसाठी राखून ठेवला. स्वतःच स्वतःला दूरदर्शनवर पाहण्यात सर्वांत जास्त आनंद असतो, ही नस मी पकडली आणि नवशिक्यांना घेऊनही जर कार्यक्रम यशस्वी/लोकप्रिय होतोय तर मी तरी कशाला मान्यवर नावांचाच आग्रह धरू ?'

वास्तविक 'ज्ञानदीप' ही 'स्क्रीनटेस्ट' आहे असं मानलं तर इतर निर्मात्यांना काही चांगले कलाकार 'ज्ञानदीप' मधून निश्चितच उचलता येतील आणि असं झालं तर आज दूरदर्शनवर जे 'तेच तेच' चेहरे पाहायला लागतात, त्यातून दूरदर्शनची आणि प्रेक्षकांचीही सुटका होईल; पण हे होत नाही. मग हा विचार 'असं का ?' या प्रश्नापाशीच अडकून बसतो. आबा म्हणतात, 'खरं सांगायचं तर या 'का' चं निश्चित उत्तर माझ्याकडेही नाही; पण मला जाणवलेली दोन–तीन कारणं अशी : एक तर इतर निर्माते 'ज्ञानदीप' हा कार्यक्रम फारसे बघत नसावेत. त्यामुळे चांगले कलाकार त्यांच्या नजरेसच पडत नसावेत किंवा 'ज्ञानदीप' हा कनिष्ठ कार्यक्रम समजला जातो, त्यामुळे त्यातले कलाकार कशाला घ्यायचे ? असं वाटत असावं; पण दूरदर्शनवरील अनुराधा देव ही निवेदिका 'ज्ञानदीप'मधून पुढं आली, तर मराठी व्यावसायिक रंगभूमीवरील प्रमोद पवार, राजा नाईक, विलास राज, क्षमा राज हे कलाकार 'ज्ञानदीप' मधल्या नाटकांमध्ये असायचे.'.

यावरून आणखी एक मुद्दा आठवला तो म्हणजे एकीकडे 'ज्ञानदीप' मधून 'दारू पिऊ नका', 'सिगरेट ओढू नका' यासारखे संदेश मोठ्या प्रमाणावर दिले जातात आणि दुसरीकडे धूम्रपान, मद्यपान यांचा अतिरेक असलेली नाटकं/चित्रपट दाखवले जातात. एकाच माध्यमातील या विसंगतीला काय म्हणायचं ? तेव्हा आबा म्हणाले, 'अशा प्रकारची विसंगती दूरदर्शनवर आहे– हे सगळ्यांनाच मान्य करावं लागेल; पण मी यात काय करू शकतो ? असं होतं म्हणून मी 'ज्ञानदीप'नं घेतलेलं शिक्षणाचं व्रत तर टाकून देऊ शकत नाही? या गोष्टीचा विचार संबंधित कार्यक्रमाच्या निर्मात्यांनी करायला हवा, नाही का ? कदाचित हे सगळं त्यांना पटतंय म्हणून ते करत असावेत किंवा त्यांचे कार्यक्रम हे कलात्मक पातळीवरचे वगैरे असल्यानं या गोष्टीची त्यांना नाटकात गरज भासत असावी आणि या नाटकांचा एकंदरीत फॉर्म बघता या गोष्टी खपूनही जातात; पण मी उद्या 'ज्ञानदीप' मध्ये असं काही केलं तर 'ज्ञानदीप'चा प्रेक्षकवर्ग मला फाडूनच खाईल! तसंच 'ज्ञानदीप'च्या धोरणाचाही सतत विचार करावा लागतो. मागं एकदा 'ज्ञानदीप' मध्ये धूम्रकांड' नावाचं नाटक केलं होतं. नाटक अर्थातच धूम्रपानविरोधी होतं; पण तरीही त्यातील एकाही कलाकाराला सिगारेट पेटवू दिली नव्हती ! नुसती हातात धरायला लावली होती. म्हटलं सिगारेट पेटवली की, एक तरी झुरका घेतला जाणारच ! असं आहे. माझ्या कार्यक्रमापुरता विचार करायचा तर मी याचं भान अवश्य राखत असतो. दूरदर्शनवरील इतर कार्यक्रमात काय होतं– याला मी जबाबदार नाही !'

---

## 'इस्टेट सार्थकी लागली'

'ज्ञानदीप'चं मुख्य धोरण सामाजिक प्रबोधनाचं आहे; पण हे प्रबोधन समाजानं स्वीकारलं तर पुढची वाटचाल दृष्टिक्षेपात येणार ना ? साहजिकच 'ज्ञानदीप'मधून दिले जाणारे संदेश प्रेक्षकवर्गाच्या मनावरून सहज घरंगळून जातात की, आचरणातही आणले जातात ? असा प्रश्न मनात येतो; पण याबाबतीत 'ज्ञानदीप'ची परिस्थिती बरीच आशादायक आहे. 'ज्ञानदीप'मध्ये डॉ. गोविंद खरे यांचं मरणोत्तर नेत्रदानावरील कीर्तन आणि डॉ. गंगाधर काणे यांची 'देहरूपी उरावे' ही नाटिका सादर झाल्यानंतर देहदान आणि नेत्रदान करण्यास उत्सुक असलेल्या पत्रांचा 'ज्ञानदीप'वर अक्षरशः पाऊस कोसळला. त्यात एक पाय मरणाच्या दारात ठेवून उभे असलेले आजी–आजोबा होते, तशी ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी असलेली तरुण मंडळीही होती.

तसंच काही दिवसांपूर्वी 'ज्ञानदीप'मध्ये एक नाटक सादर झालं होतं. 'इस्टेट सार्थकी झाली.' तो कार्यक्रम पाहून 'ज्ञानदीप'कडे एका बाईचं पत्र आलं. आबा म्हणतात, मोठं बोलकं पत्र होतं ते. या बाईंची हकीकत अशी होती की, लहानपणी त्या अनाथ होत्या आणि त्यांना एका धनिक गृहस्थानं दत्तक घेतलं होतं. ते गृहस्थ वारल्यानंतर त्यांची सर्व संपत्ती या बाईंच्याकडे आली. वृद्धत्वाकडे झुकलेल्या या बाईंना या संपत्तीचं काय करायचं ? असा प्रश्न पडला होता. त्याच वेळेस त्यांनी 'ज्ञानदीप'चं नाटक पाहिलं आणि त्यांचं म्हणणं असं आहे की, या नाटकानं त्यांना मार्ग दाखवला. यापेक्षा अजून महत्त्वाचं बक्षीस कुठलं असेल ?'

---

दूरदर्शनवरील बहुतेक कार्यक्रमांनी आपापली वयोमर्यादा ठरवून टाकलीय; पण आवांच्या मते ‘ज्ञानदीप’ ला विशिष्ट अशी वयोमर्यादा नाही. आठ वर्षांपासून ऐंशी वर्षांपर्यंत सारे ‘ज्ञानदीप’ बघतात. ‘ज्ञानदीप’ चे निर्माते म्हणून आवांनी हे ठरवलेलं असलं तरी प्रत्यक्ष परिस्थिती मात्र थोडी वेगळी आहे. कारण सर्वसाधारणपणे पाहिलं तर ‘ज्ञानदीप’ हा प्रौढ किंवा म्हाताऱ्या वर्गाचा अतिशय आवडता कार्यक्रम; पण तरुणपिढी मात्र ‘ज्ञानदीप’च्या वाऱ्यालाही उभी राहात नाही. ‘ज्ञानदीप की ज्ञानपीठ?’ ‘ज्ञानदीप की अज्ञानदीप’, ज्ञानदीप उजळू दे’– याऐवजी ‘ज्ञानदीप काजळू दे’, ‘ज्ञानदीप की हळदीकुंकू’... अशा शब्दांत तरुणपिढीकडून ‘ज्ञानदीप’ ची यथेच्छ टिंगलटवाळी आणि त्याचबरोबर उपेक्षाही केली जाते. म्हणजे ज्या मंडळींवर खरा परिणाम घडवून आणायचा तीच मंडळी दूर आहेत; पण आवांचा आशावाद उदंड आहे. ते दुसरी बाजू समोर उलगडून दाखवताना म्हणतात, ‘ज्ञानदीप’ मंडळांच्या सभासदांमध्ये तरुणांची संख्या जास्त आहे. ‘ज्ञानदीप’ मंडळांचे विविध उपक्रम हाती घेण्यात, ते यशस्वीपणे पार पाडण्यात तरुणवर्गाचाच हातभार मोठा आहे. नाटकात कामं करण्यासाठी, लिखाणासाठी तरुणवर्गाकडून चांगला प्रतिसाद आहे. हे चित्र नक्कीच आशादायक आहे आता जी तरुण मंडळी हा कार्यक्रम बघत नाहीत, त्यांना कदाचित हा कार्यक्रम आवडत नसेल. हा कार्यक्रम कनिष्ठ प्रतीचा वाटत असेल किंवा दूरदर्शनवरचाच खास तरुणांसाठी असलेला ‘युवदर्शन’ हा कार्यक्रम अधिक आपलासा वाटत असेल; पण एक गोष्ट मात्र खरी की, ‘ज्ञानदीप’ ला वयाची बांधिलकी नाही, हे सिद्ध करण्यासाठी आणखी एक उदाहरण देतो आणि ते म्हणजे आम्ही अगदी अलीअलीकडेच केलेला ‘परीक्षेची पूर्वतयारी’ हा कार्यक्रम. मॅट्रिकच्या परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी मुद्दाम या कार्यक्रमाची कल्पना काढली. आता मॅट्रिकचा विद्यार्थी म्हणजे पंधरा–सोळाच्या वयोगटातला. साहजिकच हा कार्यक्रम ‘ज्ञानदीप’ मध्ये का? अशी विचारणा करणाऱ्या पत्रांचा माझ्यावर अक्षरशः भडिमार झाला; पण त्यावर माझं म्हणणं एकच होतं की, या प्रकारच्या कार्यक्रमाची दूरदर्शनवर खरोखरच गरज आहे. कारण शहरातले विद्यार्थी सतराशेसाठ क्लास लावून किंवा शाळेतील शिक्षकांकडून अशा प्रकारचं मार्गदर्शन सहजी मिळवू शकतात; पण खेड्यातल्या मुलांचं काय? ते काही सहस्रबुद्धे किंवा गोडबोले यांच्याकडे येऊ शकत नाहीत. मग त्यांना असं शिक्षण सहजी मिळवून देण्यासाठी पाच लाखांहून जास्त लोकांच्या घरी एकाच वेळेस जाऊन पोचणाऱ्या दूरदर्शनच्या कार्यक्रमाशिवाय दुसरं कुठलं माध्यम प्रभावी असू शकणार आहे? ही झाली कार्यक्रम सुरू करण्यामागची धारणा. आता हा कार्यक्रम ‘ज्ञानदीप’ मध्येच का? खरं तर हा

## ज्ञानदीपमंडळं

‘ज्ञानदीपमंडळं’ आणि त्यांचे विविध उपक्रम हा खरं म्हटलं तर एका स्वतंत्र लेखाचा विषय होऊ शकतो, इतकं ‘ज्ञानदीप मंडळां’चं खटलं मोठं आहे. ही सगळीच ‘ज्ञानदीपमंडळं’ मोठ्या उत्साहानं आणि धडाडीनं काम करणारी आणि त्यासाठी आवश्यक असलेलं मनुष्यबळही पाठीशी असणारी. एका ‘ज्ञानदीपमंडळा’नं अमुक अमुक कार्य केलं की, ‘हम भी कुछ कम नहीं’ हे दाखवण्याची दुसऱ्या ‘ज्ञानदीपमंडळा’ला खुमखुमी येते आणि आणखी एखाद्या वरचढ कार्यक्रमाची आखणी केली जाते, मोठ्या धामधुमीत हा कार्यक्रम पारही पाडला जातो. परस्परातली चुरसच ही; पण त्यामुळे अनेक भरीव योजना ‘ज्ञानदीपमंडळां’कडून घडल्या आहेत. कुटुंबनियोजनशिबिरं, रक्तदान, दंतचिकित्सा, मोफत रुग्णसेवाशिबिरं घेणं, संस्कारवर्ग घेणं, स्वच्छतामोहीम उभारणं, व्यक्तिविकास–शिबिरं घेणं, वधू–वर मेळावा घेणं. अशी छोटी–मोठी कार्यं करण्यातही ‘ज्ञानदीपमंडळं’ सतत मग्न असतातच; पण यातही मुद्दाम उल्लेखनीय म्हणजे ‘ज्ञानदीपमंडळां’तर्फे हुशार पण गरजू मुलं दत्तक घेतली जातात आणि त्यांचं शिक्षण करण्याची जबाबदारी या ‘ज्ञानदीपमंडळां’तर्फे घेतली जाते. लोणावळ्याच्या सरस्वती कलोपासक ज्ञानदीपमंडळानं तर डोंगरवाडी आणि कुसगाववाडी या खेड्यांमध्ये प्राथमिक शाळा उभारण्याचा अवघड संकल्प पुरा करून इतर ‘ज्ञानदीपमंडळां’वर कडी तर केलीच; पण निरपेक्ष सेवेचा आणि शिक्षणाचा पायाही घातला. या कामासाठी लागलेली जवळजवळ ५० हजार रुपयांइतकी मोठी रक्कम या मंडळाच्या सभासदांनी–ज्यात बहुतांशी महिला आहेत–घरोघरी फिरून गोळा केली. ‘वानप्रस्थ’ नावाच्या वृद्धाश्रमाचीही कल्पना गोरेगावच्या ‘टिळक ज्ञानदीप मंडळा’च्या डोळ्यांसमोर आहे आणि त्या दृष्टीनं वाटचालही सुरू आहे.

## ज्ञानदीप उजळू दे !

‘ज्ञानदीप’ कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाजणारी ‘ज्ञानदीप उजळू दे’ची धून आणि त्यापाठोपाठ येणारं ज्योतीचं चित्र हे साऱ्यांच्याच–कार्यक्रम पाहणाऱ्यांच्या आणि न पाहणाऱ्यांच्याही चांगलंच परिचयाचं झालंय. साहजिकच या प्रतीकाचा विषय निघाला तेव्हा मिळालेल्या उत्तरातून जाणवलं की, या प्रतीकामागेही एक विशिष्ट भूमिका आहे. ही भूमिका अशी आहे की, ‘एका ज्योतीनं दुसरी ज्योत पेटवायची आणि अंधःकाराला छेद द्यायचा. या दिव्यात तेल आणि वात घातली की तो सतत पेटता राहणार आहे. अन्यथा विजेच्या साधनांना त्यांना मिळणाऱ्या वीजपुरवठ्यावर अवलंबून राहावं लागतं. वीज गेली, जनरेटर्स गेले की, या साधनांचं काम ठप्प ! याचा अर्थ या साधनांकडून काम करवून घेणारा कर्ताकरविता वेगळाच आहे आणि त्याच्यावरच सगळं अवलंबून राहणार आहे; पण ‘ज्ञानदीप’चं मात्र असं होता कामा नये. ‘ज्ञानदीप’ची ज्योतीनं ज्योत पेटवण्याची प्रक्रिया सतत होत राहिली पाहिजे आणि ठिकठिकाणी प्रज्वलित केलेले दिवे आपापल्या बळावर सतत प्रज्वलितच राहिले पाहिजेत. आणखी काही वर्षांनी मी कदाचित रिटायर होईन. माझ्या जागी आणखी कुणी येईल; पण ‘ज्ञानदीप’चं कार्य मात्र खंडित होता कामा नये. अंधार दूर करण्याचं काम या ज्योतीकडून सतत होत राहिलं पाहिजे !’ □

# ' ज्ञानदीप 'च्या नाटकात Self identification सहजी होते

— विनायक चासकर

¤ ' ज्ञानदीप ' बघता का ? नियमितपणे का कधी तरी ?

— ' ज्ञानदीप ' कार्यक्रम मी बघतो; पण अगदी नियमितपणे नाही. कारण प्रत्येक वेळेस वेळ असेलच असं नाही; पण मुद्दाम बघायचा नाही किंवा ' ज्ञानदीप ' सुरू झाल्यावर टी. व्ही. बंद करून टाकणं असेही प्रकार करत नाही. वेळ असल्यास आवर्जून बघतो.

¤ मराठी नाटकांचे निर्माते– या नात्यानं ' ज्ञानदीप 'मधील नाटकं, कलाकारांचा अभिनय, कार्यक्रमाची तांत्रिक मूल्यं– याबद्दल मत काय ?

—' ज्ञानदीप 'च्या नाटकांमध्ये मला सर्वात जास्त खटकत असेल तर या नाटकांचं दिग्दर्शन बाहेरच्या कलाकारांकडे सोपवलं जाणं हे. कारण दूरदर्शन हे चित्रपट आणि नाटक यांच्यापेक्षा स्वतंत्र माध्यम आहे आणि त्याच्या दिग्दर्शनाचं तंत्रही वेगळं आहे. उदा. दूरदर्शन हे क्लोजअपचं माध्यम आहे. तिथं शब्दांपेक्षाही चेहऱ्यावरचे भाव अधिक महत्त्वाचे ठरतात. साहजिकच स्क्रीप्ट त्यानुसार बदलायला हवं. ही तंत्र या माध्यमाशी अपरिचित असणाऱ्याला माहिती असणं शक्यच नाही. त्यामुळे कित्येक वेळा विषय चांगला असूनही नाटक मार खातं किंवा बहुतांश वेळा कार्यक्रमात ढोबळपणा येतो.
तसंच दुसरी आणखी एक गोष्ट म्हणजे ही नाटकं ज्या रोखठोक पद्धतीनं किंवा भाबडेपणानं सादर केली जातात, ते पाहिलं की, त्यात बरचसं under estimation वाटायला लागतं. आजच्या काळातल्या प्रेक्षकाला इतक्या ढोबळपणे किंवा बाळबोधपणे सांगायची गरज आहे, असं मला तरी वाटत नाही. याउलट हीच नाटकं थोडीशी का होईना कलात्मक रीतीनं दाखवता येतील, दाखवायला हवीत. अर्थात यात निर्मात्याला दोष देण्यापेक्षा मी म्हणेन हा सेटअपचा दोष आहे. इथं एका केंद्राला पुरेशा फॅसिलिटीज नाहीत आणि नवी नवी केंद्रे काढली जाताहेत.

¤ ' ज्ञानदीप 'नं काही मोजक्याच वेळा खरोखरच चांगले कलाकार दिलेत; पण हे कलाकार मराठी नाटकातून उचलले जात नाहीत असं का ?

— असं कुठे आहे ? ' ज्ञानदीप 'मधले काही कलाकार मी स्वत: माझ्या नाटकांमध्ये वापरले आहेत. जास्ती कलाकारही घेता येत नाहीत. कारण पुन्हा तुम्ही लोकच ओरडाल–तेच तेच कलाकार घेता येत नाही म्हणून. माझ्या बाबतीत विचार करायचा झाला तर मी नेहमी वेगवेगळे कलाकार घेतो. आतापर्यंत ११० नाटकं केली; पण त्यातही जास्तीत जास्त वेळेस नवीन कलाकार घेण्यावरच कटाक्ष ठेवला. पुष्कळ वेळा नवीन कलाकार मिळावेत म्हणून मी राज्यनाट्यस्पर्धांना वगैरे जाऊन बसतो. मग ' ज्ञानदीप ' का टाळेन ? पण त्यात एक गोष्ट मात्र निश्चित की, एखादा कलाकार दुसऱ्या कुठल्या कार्यक्रमात जास्त वेळा चमकलेला असेल, तर तो कितीही चांगला कलाकार असला तरी त्याला मात्र मी टाळतोच. कारण या कलाकारांना दोन–चार महिन्यांनी का होईना; पण दूरदर्शनवर संधी मिळते आहे. मग इतर असे अनेक जण आहेत की, ज्यांना एकदाही संधी मिळालेली नाही. त्यामुळे ही खूणगाठ कायम मनाशी बांधून मग जेवढे कलाकार मला माझ्या नाटकात घेणं शक्य होतं, तेवढे मी आवर्जून घेतलेले आहेत.

¤ ' ज्ञानदीप 'मधून दारू पिऊ नका, सिगारेट ओढू नका, असे संस्कार केले जातात तर दुसरीकडे नाटक / चित्रपट । छायागीत आदी कार्यक्रमांतून या गोष्टींना सर्रास उत्तेजन मिळावं अशीच परिस्थिती आहे ! या विसंगतीबद्दल काय म्हणाल ?

— हा विसंवाद असू नये; पण दुर्दैवानं तो आहे. काही ठिकाणी या गोष्टी नाटकाच्या कथानकानुसार येतात आणि त्या टाळता येत नाहीत; पण पुन्हा माझ्याबाबतीत बोलायचं झालं तर या गोष्टींना उत्तेजन मिळावं अशी वाक्यं–प्रसंग मात्र मी टाळतो. एक उदाहरण देतो. नुकतंच मी एक नाटक केलं होतं. ' महफिल रंगली आहे.' यात मी दारूची पार्टी दाखवली होती; पण म्हणून लोकांनी दारू पिणं हे चांगलं आहे असं मानावं किंवा लोकांना दारू प्यायला उद्युक्त व्हावं. अशी सिच्युएशन कुठेच नव्हती. उलट यातले संवाद असेच होते की, ते नकळत दारू पिण्यातला किंवा दारू हाच दुःखावरचा जालिम उपाय– वगैरे समाजातला फोलपणा पटवून देत होते. त्यामुळे माझ्या बाबतीत तरी मी ही काळजी घेतो; पण चित्रपट–छायागीत यांच्यामुळे मात्र हा विसंवाद मोठ्या प्रमाणावर दिसून येतो आणि मी या कार्यक्रमांच्या विरुद्ध तर आहेच; पण कधी बघतही नाही !

¤ ' ज्ञानदीप 'वर आज सतत टीकेचा भडिमार होत असला तरी दूरदर्शनवरचा तो सर्वात हीट कार्यक्रम आहे. हे मान्य आहे का ? असल्यास तुमच्या दृष्टीनं यामागची कारणं कोणती ?

— ' ज्ञानदीप ' हा दूरदर्शनवरचा सर्वात लोकप्रिय कार्यक्रम आहे, हे अमान्य करण्यात काही अर्थच नाही. कारण खरं सांगू का ? आपल्या लोकांना साध्याच गोष्टी आवडतात. मी जेव्हा जेव्हा ' बंदी ', ' इतिहास ', ' फुलपाखरू ', ' यम ' वगैरे सारख्या नाटकांतून काही तरी वेगळं किंवा नवं करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा लोकांना ते पटलं नाही. त्यांच्या पचनी पडलं नाही आणि परिणामी लोकांनी त्यावर टीकेचा भडिमार केला. यावरून लक्षात येतं की, लोकांनी आपल्याभोवती एक चौकट घालून घेतलीय आणि त्यांची या चौकटीबाहेर जाण्याची इच्छाच नाही आणि ' ज्ञानदीप 'ची नाटकं या चौकटीत राहूनच सादर केली जातात. त्यामुळे प्रेक्षकांच्या विश्वासाला तडा जात नाही आणि सामान्य लोकांची ' ज्ञानदीप 'शी चटकन् जवळीक साधली जाते. याशिवाय ' ज्ञानदीप 'च्या नाटकांमध्ये Selfidentification ही सहजी होतं. यातच ' ज्ञानदीप 'चं यश सामावलेलं आहे. ¤

विषय 'शालेय चित्रवाणी'चा; पण शालेय चित्रवाणीचे कार्यक्रम फक्त पाचवी–सातवी–आठवी पर्यंतच करण्याची मर्यादा दूरदर्शनने स्वतःच स्वतःवर घालून घेतली आहे. मग विचार करायला लागेल तो 'किलबिल' किंवा 'युवदर्शन' या कार्यक्रमांचा; पण या दोन कार्यक्रमांनीही आपापली वयं ठरवून टाकली आहेत आणि मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांचा वयोगट असा आहे की, ही मुलं धड ना 'किलबिल'च्या वयात बसतात, धड ना 'युवदर्शन'च्या. म्हणजे आज अशी परिस्थिती अशी आहे की, या वयोगटातल्या प्रेक्षकवर्गाला कुठल्याच कार्यक्रमात खऱ्या अर्थानं स्थान नाही. मग वयाची बांधिलकी नसलेल्या 'ज्ञानदीप'नं हा कार्यक्रम केला तर बिघडलं कुठं? याचबरोबर आणखी एक गोष्ट सांगायला मला निश्चितपणे आवडेल की, हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून या कार्यक्रमाचं उदंड स्वागत करणारी पत्रं मोठ्या प्रमाणावर 'ज्ञानदीप' कडे आली आणि त्यातही पुन्हा सांगायची गोष्ट म्हणजे यातली जवळजवळ ९० टक्के पत्रं खेड्यांतून आली आहेत. म्हणजे कार्यक्रमाचा उद्देश संपन्न झाला की नाही? बस, मलाही तेच आणि तेवढंच हवंय. ९० मार्क मिळवणाऱ्यांनी १०० मार्क मिळवावेत हा या कार्यक्रमाचा हेतू नाही आणि माझीही तशी अपेक्षा नाही; पण ३४ मार्क मिळवणाऱ्याला ज्या एका मार्काची आवश्यकता आहे, त्यांच्यासाठीच हा कार्यक्रम करतोय!'

### ज्ञानदीपमध्ये बदल ?

'ज्ञानदीप'चा आणखी एक उपक्रम म्हणजे 'ज्ञानदीपमंडळं'. ठिकठिकाणी ही 'ज्ञानदीपमंडळं' स्थापन झालेली आहेत आणि जोगेश्वरीच्या 'समताज्ञानदीपमंडळा'चे एक धडाडीचे कार्यकर्ते रमेश जाधव यांच्या शब्दात सांगायचं तर 'ज्ञानदीप' ही माणसं जोडायची चळवळ आहे आणि ही चळवळ अंग धरते आहे 'ज्ञानदीपमंडळां'च्या रूपानं. 'ज्ञानदीप मंडळा'चे सभासद न चुकता 'ज्ञानदीप'चा कार्यक्रम बघतात. 'ज्ञानदीपमंडळां'च्या उपक्रमांची 'ज्ञानदीप' कार्यक्रमातून आवर्जून नोंद घेतली जाते. या उपक्रमांना काहीसं शाश्वत स्वरूप मिळावं म्हणून 'ज्योत एक सेवेची' नावाचं एक मासिक मुखपत्र काढलं जातं. दूरदर्शनवर 'ज्ञानदीप' कार्यक्रमात होणारी नाटकं–ओंजळ, मनोगत यांसारख्या कार्यक्रमांतून सभासदमंडळींना दूरदर्शनवर चमकण्याची संधी मिळते. साहजिकच या 'ज्ञानदीपमंडळां'च्या द्वारा 'ज्ञानदीप'नं आपला असा एक हुकमी प्रेक्षकवर्ग बांधून घेतला; पण या आरोपाला मात्र आबा आक्षेप घेतात. खरं सांगायचं तर आधी 'ज्ञानदीपमंडळं' आली आणि मग 'ज्ञानदीप' कार्यक्रम सुरू झाला. मी सुरुवातीलाच सांगितलं होतं की, 'मुंबई शहर समाज शिक्षण समिती'नं दूरदर्शनवर सुरू केलेल्या प्रौढसाक्षरता कार्यक्रमांचं

## यश सामान्य माणसाला मिळालेल्या संधीत

—नीना राऊत

¤ 'ज्ञानदीप' पाहता का? नियमितपणे का कधी तरी?

— 'ज्ञानदीप' पाहाणं बऱ्याच वेळा जमतच नाही. कारण एक तर बऱ्याच वेळा त्या वेळात ऑफिसमध्ये तरी अडकलेली असते आणि घरी असले तर घरातल्या कामाच्या धांदलीत जमत नाही.

¤ 'शालेय चित्रवाणी' आणि 'ज्ञानदीप' यांच्यात बालशिक्षण आणि प्रौढशिक्षण असा फरक असला तरी मूळ धोरण शिक्षणाच्या पायावरच उभं आहे. या धोरणसाधर्म्याचा 'शालेय चित्रवाणी'चं स्वरूप निश्चित करताना काही उपयोग? आदर्श वगैरे...

— छे! अजिबात नाही. कारण 'शालेय चित्रवाणी'च्या कार्यक्रमासाठी आबांनी जी पद्धत वापरली होती, ती अजिबात यशस्वी झाली नाही. उलट मी 'शालेय चित्रवाणी'चा Format पूर्णपणे माझ्या कल्पनांनुसार घडवला आणि माझ्या पद्धतीनं कार्यक्रम सादर करायला सुरुवात केली. याचा परिणाम निश्चितपणे दिसायला लागला आहे. साहजिकच मार्गदर्शन किंवा आदर्श वगैरे डोळ्यांसमोर ठेवण्याचा प्रश्नच कधी उद्भवला नाही.

¤ मग 'शालेय चित्रवाणी'ला स्क्रीप्ट-रायटर्सची इतकी उणीव भासते, त्या दृष्टीनं तरी 'ज्ञानदीप'चा काही उपयोग?

— 'शालेय चित्रवाणी'ला स्क्रीप्ट–रायटर्सची उणीव भासते ही गोष्ट खरीच. याला मुख्य कारण म्हणजे 'शालेय चित्रवाणी'साठी स्क्रीप्ट लिहायचं असेल तर त्यांना NCERT चा स्क्रीप्ट-रायटिंगचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो कारण शैक्षणिक कार्यक्रमासाठी स्क्रीप्ट तयार करणं वेगळं आणि विशिष्ट असं तंत्र आहे आणि ते या अभ्यासक्रमात शिकवलं जातं त्यामुळं ऱ्सा स्क्रीप्ट-रायटर्स उचलण्याचा प्रश्न येत नाही; पण तरीही नागपूर दूरदर्शनसाठी केलेल्या कार्यक्रमात मी 'ज्ञानदीप'च्याच दोन कलाकारांकडून स्क्रीप्ट लिहून घेतली होती.

¤ 'ज्ञानदीप' यशस्वी होण्याची तुमच्या मते कारणं कोणती?

— 'ज्ञानदीप गाजण्याचं प्रमुख कारण म्हणजे सामान्य माणसाला दूरदर्शनवर मिळालेली संधी. दूरदर्शनवरून दया डोंगरे; दिलीप प्रभावळकरसारखीच मंडळी सारखी चमकत राहिली असती तर दूरदर्शन सामान्य माणसापासून दूरवरच राहिलं असतं; पण 'ज्ञानदीप'च्या नाटकांमध्ये जेव्हा आपल्यासारखाच एक माणूस दिसतो तेव्हा 'तो करू शकतो, मग मीच का नको?' अशी भावना निर्माण होते आणि 'ज्ञानदीप'कडे सामान्य माणूस आकर्षित होतो. त्याला तो कार्यक्रम 'आपला' वाटायला लागतो. सर्वसाधारणपणे दूरदर्शनवर संधी मिळते ती तज्ज्ञ माणसाला. 'ज्ञानदीप'नं 'मनोगत'सारख्या कार्यक्रमाद्वारा दोन–तीन मिनिटं का होईना, किंवा घाबरत, अडखळत का होईना; पण बोलण्याची, चेहरा दाखवण्याची संधी सामान्य माणसाला उपलब्ध करून दिलीय आणि तज्ज्ञमंडळी फार थोडी आहेत. त्यामानानं दूरदर्शनवर एकदा तरी जायला मिळावं–अशी आशा धरून बसलेली सामान्य मंडळी बरीच आहेत. ¤

# 'ज्ञानदीप' : काही प्रतिक्रिया

नितीन सुळे : मी 'ज्ञानदीप' बघत नाही. तसे थोडे कार्यक्रम पाहिलेत, नाही असं नाही; पण तेही टी. व्ही. चालूच होता डोळ्यांसमोर म्हणून पाहिले. एरवी 'ज्ञानदीप' साठी स्वतःहून टी. व्ही. लावणं वगैरे दूरच; पण एकंदरीतच या कार्यक्रमातला भंपकपणा पाहून टी. व्ही. चालू असला तरी 'ज्ञानदीप' बघण्याचं धाडसही होत नाही आणि इच्छाही होत नाही. एखादी गोष्ट आवडायला त्यात काही तरी असावं लागतं ना ? आवडण्याजोगं आहेच काय 'ज्ञानदीप' मध्ये ? साहजिकच न आवडणारा कार्यक्रम बघण्यात वेळ घालवण्यापेक्षा टी. व्ही. वरचाच दुसरा एखादा कार्यक्रम बघण्याचं किंवा करण्याजोग्या इतर किती तरी गोष्टी आहेत, त्या करणं मी पसंत करेन. 'ज्ञानदीप' आवडत नाही म्हटल्यावर 'ज्ञानदीप' मध्ये काम करण्यासाठी इच्छा अर्थातच नाही. 'ज्ञानदीप' हा सर्वात हीट कार्यक्रम आहे हे तुमच्याकडूनच ऐकतोय.

अभिजित पटवर्धन : 'ज्ञानदीप' बघत नाही. 'ज्ञानदीप' का बघितला जात नाही, याची कारणं जगजाहीर आहेत. कशाला परत परत त्याबद्दल बोलायला लावता ? 'ज्ञानदीप' मध्ये काम करण्यापेक्षा न करणंच जास्त चांगलं होईल नाही का ? 'ज्ञानदीप' सर्वात हीट कार्यक्रम आहे असं बऱ्याच जणांकडून ऐकून आहे. असेलही. मला त्याच्याशी काही घेणं-देणं नाही. बाकीचे लोक बघतात, त्यांना 'ज्ञानदीप' आवडतो म्हणून मी हा कार्यक्रम बघावा असं नाही. आता जे हा कार्यक्रम बघतात, त्यांना आवडतो, ते 'ज्ञानदीप' का बघतात आणि त्यांना का आवडतो हा मात्र यक्षप्रश्न आहे आणि त्याचं उत्तर शोधण्याची मला गरज वाटत नाही. मग व्यर्थ ताप करा कशाला ?

मंदा नेरुरकर : मी 'ज्ञानदीप' कधी कधी बघते. अगदी आवडत नाही असंही नाही; पण त्याचबरोबर त्याबद्दल आवर्जून बोलावं असंही काही नाही. 'ज्ञानदीप' मध्ये काम करण्याबद्दल आताच ठामपणे काही सांगत नाही; पण संधी मिळाली तर कदाचित काम करेनही. 'ज्ञानदीप' सर्वात हीट कार्यक्रम आहे, ही गोष्ट खरी असेलही आणि खरी असेल तर त्यात काही चूकही नाही. कारण 'ज्ञानदीप' मधली साधीसुधी नाटकं ही सर्वसामान्यांशी जवळीक साधणारी अशीच असतात. एखाद्यानं हीच नस पकडून यश मिळवलं तर तुमचा त्याला विरोध का ?

शिल्पा आगटे : बऱ्याचदा बऱ्याच गोष्टींच्या प्रायॉरीटीज् ठरवून घ्याव्या लागतात. टी. व्ही. च्या कार्यक्रमांच्या बाबतीतही असंच होतं. कुठले कार्यक्रम बघायचे आणि कुठले बघायचे नाहीत, हे ठरवून घ्यावं लागतं. कारण नोकरी, संसार, घरकाम– ही सारी तारेवरची कसरत सांभाळायची असते. साहजिकच प्रायॉरीटीज ठरवताना बहुतेक वेळा 'ज्ञानदीप' ला फाटा द्यायला लागतो. अर्थात मुद्दाम 'ज्ञानदीप' पाहावा असंही वाटत नाहीच. म्हणजे मराठी नाटक, गजरा, चेहरे आणि मुखवटे... असे काही कार्यक्रम असले की आपोआपच सगळी कामं आधीच आटपून टाकली जातात; पण 'ज्ञानदीप' साठी म्हणून खास असं काही होत नाही आणि 'ज्ञानदीप' मध्ये काम–बिमही करावंसं वाटत नाही. टी. व्ही. वरचे बहुतांशी कार्यक्रम 'इमेज बिल्टअप' चं काम करत असताना नव्यांना संधी देणारा 'ज्ञानदीप' सारखा कार्यक्रम हीट झाला तर नवल नाही. नव्यांसाठी किंवा सामान्यांसाठी 'दूर' असलेलं दूरदर्शन 'ज्ञानदीप' नं जवळ आणलंय– ही गोष्टही नाकारता येणार नाही.

नीलम फडके : मी 'ज्ञानदीप' बघत नाही. कारण बघावासा वाटत नाही. आता का बघावासा वाटत नाही– यामागची काही विशिष्ट कारणं मला देता येत नाहीत. बस बघावासा वाटत नाही म्हणून बघत नाही आणि बघत नाही म्हणून बोलत नाही.

समीर देशपांडे : 'ज्ञानदीप' सारखा प्रेक्षकांना बावळट ठरवणारा दुसरा कार्यक्रम नसेल. अगदी 'किलबिल' सारख्या लहान मुलांसाठी असलेल्या कार्यक्रमालाही आपला प्रेक्षकवर्ग शहाणा आहे, विचार करणारा आहे, याचं भान असतं; पण 'ज्ञानदीप' च्या मात्र हे गावीही नाही. वर्षानुवर्षं त्याच चौकटीतनं कार्यक्रम देणं चालूच आहे. साहजिकच 'ज्ञानदीप' आजचा हीट कार्यक्रम *असला तरी त्यात काही अर्थ नाही* आणि त्याच्या लोकप्रियतेचंही कौतुक नाही. 'ज्ञानदीप' कार्यक्रमाजवळ प्रेक्षकांना आपलंसं करण्याची खरोखरच ताकद असेल तर 'ज्ञानदीप' ला चौकटीचा एवढा हव्यास का ? 'ज्ञानदीप' जवळ तेवढी क्षमता असेल तर 'ज्ञानदीप' कुठल्याही पद्धतीत यशस्वी होऊ शकतो आणि झाला पाहिजे. 'ज्ञानदीप' नं वेगळ्या प्रयत्नांनी यशस्वी होऊन दाखवण्यातच 'ज्ञानदीप' ची खरी कसोटी आहे आणि असं झालं तरच 'ज्ञानदीप' च्या लोकप्रियतेवर असलेला बेगडीपणाचा आरोप दूर होऊ शकतो.

प्रभाकर लिमये : 'ज्ञानदीप' च्या कार्यक्रमांची अवस्था कानफाट्यासारखी झालीय; पण 'ज्ञानदीप' चे सगळेच कार्यक्रम काही वाईट नसतात. दहा वाईट असले तरी एखादा कार्यक्रम चांगला निघतोच आणि एका चांगल्या कार्यक्रमासाठी बाकीचे दहा वाईट कार्यक्रम बघायचे की नाही, हे ज्याचं त्यानं ठरवावं; पण मी मात्र वेळ असेल तेव्हा 'ज्ञानदीप' ही इतर कार्यक्रमांइतकाच आवर्जून बघतो. 'ज्ञानदीप' हीट कार्यक्रम आहे ही फॅक्ट आहे. अमान्य करण्याचा प्रश्नच कुठे येतो ? आणि 'ज्ञानदीप' हीट नसता तर तुम्हा पत्रकारांचं लक्ष तरी 'ज्ञानदीप' कडे कशाला वळलं असतं. नाही का ?

कॉंट्रॅक्ट पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुढं कार्यक्रम करण्यास नकार दिला. तेव्हा या कार्यक्रमांना मिळणारा प्रतिसाद बघून हा कार्यक्रम सुरू राहावा, असं वाटत होतं; पण मुंबई शहर समाज शिक्षण समितीनं यातून अंग काढून घेतल्यावर त्यांच्या शंभर मंडळांनीही अंग काढून घेतलं. त्यामुळं कार्यक्रम सुरूच ठेवायचा असेल तर शंभर मंडळं करायला लागतील, अशी सूचना मिळाली. तेव्हा एक दिवस दूरदर्शनवरूनच मी ही परिस्थिती लोकांच्या डोळ्यांसमोर ठेवली आणि सहकार्याचं आव्हान केलं. तेव्हा महिन्याच्याआतच शंभरच काय पण एकशेदहा मंडळं स्थापन झाली आणि ही प्रक्रिया तिथपर्यंतच थांबली नाही तर 'ज्ञानदीपमंडळं' पुढंही नव्यानं स्थापन होत राहिली. असं करता करता आजमितीस 'ज्ञानदीपमंडळां'ची संख्या चारशेतीसवर गेली आहे. या 'ज्ञानदीप मंडळां'मध्येही अगदी सर्व थरांचे, सर्व वयांचे सभासद आहेत. या 'ज्ञानदीप-मंडळां'नी किती तरी चांगले उपक्रम केले आहेत. 'जिथं गरज तिथं ज्ञानदीप' हे धोरण मनाशी बाळगूनच ही 'ज्ञानदीप मंडळं' सतत छोट्या-मोठ्या उद्योगात मग्न असतात.

ही सारी झाली 'ज्ञानदीप'ची यशस्वी बाजू; पण 'ज्ञानदीप' कार्यक्रमावर आणि निर्मात्यावरही एका अयशस्वी कार्यक्रमाचा धब्बा बसलेला आहे आणि तो कार्यक्रम म्हणजेच 'रोखठोक' शिक्षणपद्धतीचा अवलंब केलेला 'चला शिकू या' कार्यक्रम. यशच यश पचवलेल्या माणसाला अपयश पचवणं अवघड जातं म्हणतात. मग आत्रांचा काय अनुभव ? आत्रांकडून मिळालेल्या उत्तरात बराचसा शांतपणा असला तरी या अपयशी कार्यक्रमाच्या उल्लेखानं होणारी काहीशी चलबिचलही जाणवण्याइतपत स्पष्ट आहे आणि 'तो आमचा पूर्णपणं फसलेला कार्यक्रम आहे आणि त्याविषयी फारसं बोलावंसं वाटत नाही' असा किंचित त्राग्याचाही सूर आहे; पण तरीही ते पुढे म्हणाले, 'ज्ञानदीप'मध्ये प्रौढशिक्षणाचा हा जो कार्यक्रम सुरू झाला होता तो मुंबई शहर समाज शिक्षण समितीतर्फेच. त्यांनीच या कार्यक्रमाचा Format वगैरे ठरवून दिला होता, त्याप्रमाणेच तो केला गेला; पण त्याची परवड झाली. याचं महत्त्वाचं कारण माझ्या दृष्टीनं म्हणजे कुठल्याही गोष्टीला आरंभ, मध्य आणि शेवट अशा तीन पातळ्या हव्यात आणि या तीन पातळ्यांतूनच कार्यक्रमाचा प्रवास व्हायला हवा. हे तंत्र मी 'ज्ञानदीप' कार्यक्रमातून सतत राबवत आलेय; पण 'चला शिकू या'मध्ये अशी काही विशिष्ट साखळीच नव्हती. शेवटी या कार्यक्रमाची काय परवड झाली ते सर्वश्रुतच आहे.

'पण अशा परिस्थितीत आपणच आपल्या पद्धतीनं कार्यक्रम करावा असं वाटलं नाही का ?'

'मी माझ्या पद्धतीनं कार्यक्रम करायला तयार होतो; पण ते त्यांना मान्य नव्हतं. शेवटी ही कल्पनाच मोडीत निघाली.'

'ज्ञानदीप' च्या कार्यक्रमामध्ये परिस्थितिनुरूप काय बदल होत गेले ?

'बाहेरच्या बदलत्या परिस्थितीतले जे जे बदल मला पटले, ते ते 'ज्ञानदीप' मध्ये तसेच आणले गेले. तसं व्हायलाच पाहिजे, नाही तर कार्यक्रमात ताजेपणा राहिला नसता. अर्थात असं करतानाही निर्माता म्हणून केवळ माझी मतं / आवड मी प्रेक्षकांच्यावर लादत बसत नाही. कारण ते मला पटणारं नाही. त्यामुळं हे बदलही प्रेक्षकांचा विचार मनात धरूनच मी मांडत असतो. तर 'ज्ञानदीप' च्या धोरणात बदल झाला नाहीय; पण कार्यक्रमात मात्र निश्चित स्वरूपात बदल होत गेलाय ! उदाहरणादाखल बोलायचं झालं तर स्त्रीत होत जाणाऱ्या स्थित्यंतराचं परावर्तन 'ज्ञानदीप' च्या कार्यक्रमात कसं होत गेलं ते सांगतो. फार पूर्वी 'ज्ञानदीप' मध्ये एक नाटक झालं होतं. त्यात परिस्थितीनं गांगरून गेलेली, मुळूमुळू रडणारी स्त्री दाखवली होती; पण अगदी अलीकडल्या एका नाटकात रॉकेल टाकून जाळायचा प्रयत्न करू पाहणाऱ्यांपासून स्त्री चाकूच्या धाकानं स्वतःचं संरक्षण करू पाहाते-असं होतं. याचा अर्थ स्त्री ही अशी राहिली नाही की, कुणीही उठावं आणि जाळावं. तर तीही मनात आणलं तर स्वतःचा प्रतिकार करून स्वतःचा जीव वाचवू शकते. असे परिस्थितिनुरूप बदल 'ज्ञानदीप' मध्ये निश्चितपणे होत गेलेत. आणखी एक महत्त्वाचा बदल 'ज्ञानदीप' मध्ये अपेक्षित आहे आणि तो म्हणजे विज्ञानविषयक कार्यक्रमांचा समावेश. आतापर्यंत 'ज्ञानदीप' मध्ये या विषयाला हात घातला गेला नाहीय आणि आणि लवकरच तो बदल करायचाय !

एव्हाना आबांना 'ज्ञानदीपमंडळा'च्या एका कार्यक्रमाला जायचे वेध लागले होते आणि त्या दृष्टीनं एकीकडे आवराआवरी करता करता ते बोलत होते, 'हे असं असतं. प्रत्येक 'ज्ञानदीपमंडळा' चा आग्रह असतो मी त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहावं म्हणून कित्येकदा तर तास-दोन तासांच्या अंतराने दोन कार्यक्रम असतात. एक मुंबईच्या या टोकाला तर दुसरा दुसऱ्या टोकाला. मग मुंबईतल्या मिळेल त्या वाहनातून कसरत करत करत दोन्ही ठिकाणी उपस्थित राहावं लागतं. कारण सभासद इतकं तळमळीनं कार्य करत असतात आणि आग्रहानं बोलावत असतात की, घटकाभर का होईना पण गेल्याशिवाय राहावत नाही. खरं म्हणजे या मंडळांनी 'ज्ञानदीप' च्या निर्मात्यानं प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक कार्यक्रमाला हजर राहण्याचा आग्रह सोडला पाहिजे; पण हे होत नाही आणि मलाही त्यांचं मन मोडता येत नाही...'

आबांशी झालेल्या गप्पांतनं / चर्चेतनं एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली की, आबांनी 'ज्ञानदीप' चा पसारा एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढवलाच की, हे सगळं दिवसाच्या चोवीस तासांच्या मर्यादेतच निभावून नेणं आबाच एकटे जाणोत. दूरदर्शनवर होणाऱ्या निर्मात्यांच्या 'खो-खो' च्या खेळात आबांचा अद्याप समावेश झालेला नाही, यामागचं कारण हेच तर नसावं ?

पुस्तके

## सेवाव्रती कार्यकर्त्याचा जीवनपट

# ‘ माझी घडण ’

‘ माझी घडण ’ हे गांधीवादी विचारवंत आणि समाजवादी कार्यकर्ते कै. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांचे आत्मचरित्र. आत्मचरित्राची ही सुधारित तिसरी आवृत्ती असून तिला सुप्रसिद्ध विचारवंत साहित्यिक कै. नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना आहे. ही प्रस्तावना म्हणजे कुरुंदकरांनी अण्णांची घेतलेली एक मुलाखतच आहे. अण्णांनी आत्मचरित्र लिहिलं असलं तरीही जे जसं घडलं तसं लिहिताना त्यातल्या स्वतःच्या भूमिकेविषयी ते फार लिहीत नाहीत, कुरुंदकरांच्या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांतून हिमनगाचा हा दडलेला भाग स्पष्ट होतो.

मुळात अण्णांच्या स्वभावात अहंकाराचा सुतराम वास नसल्याने ‘आत्मचरित्र न लिहिण्याचं ’ वगैरे ते अहंकार सुखावण्यासाठी मुळीच ठरवत नाहीत, तर खरंच काही लिहिण्यासारखं, सांगण्यासारखं आपल्या आयुष्यात घडलंय, आपण काही घडवलंय असं त्यांना वाटतच नाही. अण्णासाहेबांनीच म्हटल्याप्रमाणे ‘ विधायक काम हा आमचा देहधर्मच होता. ’ त्या पिढीचे आणि विशेषतः महात्मा गांधींच्या सहवासात आलेल्या कार्यकर्त्यांचे तर नक्कीच हे वैशिष्ट्य होते.

लहान वयापासूनच अण्णा देशकार्याकडे वळले. महात्माजींच्या सत्याग्रहामधून, अन्य चळवळींमधून त्यांनी कार्य केलेच; पण ‘ खादी ’ च्या कार्याला तर त्यांनी वाहूनच घेतले त्या निमित्ताने गावोगावी हिंडताना शेतीचा अभ्यास केला. स्वतः शेती घेऊन प्रयोगही केले. खेडी, शेती, खादी यामध्ये ते खऱ्या अर्थाने गुंतले होते.

स्वातंत्र्यानंतर अनेक गांधीवादी सत्तेवर आले. अण्णांनी मंत्रिमंडळात यावे म्हणून पंडित नेहरू आणि मोरारजीभाईंनी प्रयत्न केले. अण्णांच्या शेतीअभ्यासाचा उपयोग देशाला व्हावा असे त्यांना वाटत होते; पण सत्तेचे राजकारण अंगिकारणे अण्णांना मानवणारे नव्हते. सत्तेच्याच काय, एकूणच राजकारणापेक्षा अण्णांना विधायक कामाची ओढ अधिक होती.

अण्णा गांधीवादी होते; पण गांधींचे अंध भक्त नव्हते. गांधींच्या विचारसरणीतील अनेक त्रुटी त्यांनी सांगितल्या. गरिबांबद्दलच्या कळवळ्यातून गांधींनी ‘ गरिबी ’ चा आदर दाखवला ही गोष्ट अण्णांना पटत नव्हती. गरिबी, दारिद्र्य म्हणजे साधेपणा नव्हे आणि ‘ गरिबी ’ ही पूजनीय गोष्ट मुळीच नव्हे असं अण्णा स्पष्टपणे म्हणत.

खादीसंघटनेच्या बांधणीत अण्णांचा सिंहाचा वाटा असला तरी ‘ खादी ’ कडे श्रद्धेच्या ( किंवा अंधश्रद्धेच्या ) दृष्टीने पाहणे त्यांना मान्य नाही. प्रत्येक गोष्टीकडे डोळसपणे आणि स्वतःच्या खास पार्श्वभूमीतून पाहणाऱ्या अण्णांना ‘अहिंसातत्त्वही पूर्णांशाने मान्य नव्हते. १९४२ साली त्यांनी काही सहकाऱ्यांबरोबर बाँबही तयार केले होते. पोलिसांना त्यांच्या शस्त्रागाराचा सुगावा लागल्यावर शस्त्रांच्या पार्श्वभूमीवर अण्णांचा फोटो घेऊन तो जगभरच्या वृत्तपत्रांतून केवळ गांधींना बदनाम करण्यासाठी प्रसिद्ध केल्याचे त्यांनी लिहिले आहे; परंतु गांधीजींनी मात्र या संदर्भात अण्णांना कधी दूषण दिल्याचा उल्लेख नाही.

अण्णा ब्रह्मचारी होते, खरं तर सत्तरी उलटल्यानंतर जेव्हा त्यांना विचारलं जायचं ‘तुम्ही देशकार्यासाठी ब्रह्मचारी राहिलात का ?’ तेव्हा कोणीही त्यांचं ‘ हो ’ हे उत्तर मानून त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला असता; पण अण्णा सांगत ‘ लग्न करायच्या वयात दारिद्र्य होतं. नंतर परिस्थिती सुधारली तेव्हा कोणी लग्नाचं विचारलं नाही— मग लग्न राहूनच गेलं !’ विलक्षण प्रामाणिकपणाशिवाय या गोष्टी शक्य होत नाहीत.

अण्णांनी स्वातंत्र्यपूर्वकाळातील किती तरी आठवणी त्या घटना जवळून अनुभवलेल्या साक्षीदाराच्या दृष्टिकोनातून लिहिल्या आहेत.

मुळशीचा सत्याग्रह, फैजपूर काँग्रेस, मिठाचा सत्याग्रह, १९४२ चा लढा इ. घटना समोर उभ्या राहतात. फैजपूर काँग्रेसची अभूतपूर्व गर्दी, अनपेक्षितपणे एवढी प्रचंड गर्दी झाल्याने उडालेला गोंधळ, शेवटी अधिवेशन दीड दिवसातच उरकणं, संडासाची सोय न झाल्याने रोगराईची भीती मनात येऊन कार्यकर्त्यांचं गोंधळून जाणं सगळं अण्णांनी साकार केलंय.

मुळशीच्या सत्याग्रहानंतर शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचा पैसा मिळाला; पण त्याबरोबर दारूसारखी व्यसनेही खेड्यात शिरली याची विलक्षण खंत अण्णांना आहे.

घटनांबरोबरच लहान-मोठ्या अनेक व्यक्तींची व्यक्तिचित्रणे अण्णांनी रेखाटली आहेत. पंडित नेहरू, सेनापती बापट, विनोबाजी, शंकरराव देव, मौलाना आझाद, सानेगुरुजी, सुभाषचंद्र बोस, बाबा आमटे या व्यक्तींच्या कार्यपद्धती, गुणवैशिष्ट्ये अण्णांनी बरोबर टिपलीत.

दीर्घायुष्यामुळे अण्णांनी स्वातंत्र्यपूर्व आणि उत्तरकाळही दीर्घकाळ अनुभवला. खादी, सहकार, राजकारण या क्षेत्रात नव्याने आलेल्या अनिष्ट गोष्टींबद्दल ते नाराज होते. काँग्रेसच्या नेत्यांमध्ये सत्ताग्रहणानंतर झालेला बदल अण्णांना क्लेशकारक होता; पण सत्तेत जायचे नाही आणि बाहेर राहून काही करता येत नाही ही वस्तुस्थिती मान्य करून ते राजकारणापासून दूरच राहिले. आणीबाणीत काही कार्य करण्याची जबरदस्त इच्छा होती; पण वार्धक्याने ते शक्य झाले नाही.

या संपूर्ण आत्मचरित्रातून नकळत अण्णांचं तेजस्वी व्यक्तिमत्त्व आपल्यापुढं येतं. देशकार्याची तळमळ, कष्टाची तयारी, सेवाभाव, त्याग, निर्लोभीपणा आणि निरहंकारी वृत्ती हे अण्णांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू एकाहून एक तेजस्वी आहेत.

‘ पद्मभूषण ’ स्वीकारताना ते म्हणाले,

पदवी न स्वीकारणे हा अहंकार सुखावण्याचा प्रकार होईल. मला अहंकार वाढू द्यायचा नाहीय !

अण्णांच्या आत्मचरित्रातून जवळजवळ साठ वर्षांचा कालखंड उलगडतो. स्वातंत्र्य-पूर्व आणि उत्तरकाळाची नकळत तुलना होते आणि वाटतं खरंच आम्ही फार उशीरा जन्माला आलो. हिमालयासारखी थोर माणसं केव्हाच संपलीत ! ◻

माझी घडण
अण्णासाहेब सहस्रबुद्धे
साधना प्रकाशन, पुणे.
पृष्ठे १६४, किं. १० रु.

## देशभक्त-दांपत्याचे आत्मचरित्र

# ' जागतो संयमी तिथे '

जागतो संयमी तिथे ' हे एक चरित्र/आत्म-चरित्र आहे. शंकर विनायक ऊर्फ नानासाहेब ठकार यांच्या पत्नी श्रीमती पार्वतीबाई ठकार यांनी नानासाहेबांच्या मृत्यूनंतर लिहिलेल्या ' अधुकशा आठवणी ' हा पुस्तकाचा अर्धा भाग आहे, तर अर्ध्या भागात नानासाहेबांनी स्वतःच लिहिलेल्या काही आठवणी व काही लेख यांचा समावेश आहे.

नानासाहेब आणि पार्वतीबाई यांचा विवाह हा एक समसमा संयोग होता. पार्वतीबाईंना त्यांच्या माहेरची पार्श्वभूमी देशभक्तीचीच लाभली होती. त्यांची आई चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाला बायकांना बोलावून त्या वेळच्या राजकीय परिस्थितीवर भाषणे देत असे. तो ' टिळकयुगाचा ' भारलेला काळ होता. पुढे हीच सूत्रे गांधीजींच्या हाती येऊन देशभक्तीने भारलेली तरुणपेढी गांधींकडे आकर्षित झाली.

नानासाहेबांनी सरकारी नोकरी तर नाहीच सरकारी मदत घेणाऱ्या संस्थेतही नोकरी करायची नाही असा निश्चय केला होता. त्यामुळे अतिशय कमी वेतनाच्या नोकऱ्या करून, खेड्यात संसार करावा लागला. अर्थात पत्नीची जोड या कार्यात त्यांना नसती तर सगळेच प्रश्न अवघड होऊन बसले होते. पार्वतीबाई या सर्वार्थाने त्यांच्या अर्धांगिनी होत्या. त्यांचेही मन देश-कार्याने भारलेले असल्याने खेड्यात राहून कार्य करण्याच्या नानासाहेबांच्या विचारांना त्यांचा सक्रिय पाठिंबा राहिला.

खेड्यातील जीवन आणि देशसेवेचे व्रत दोन्हीही अवघडच गोष्टी. संसार म्हटला की अनंत अडचणी आल्याच. मुलांची दुखणी, पैशाची टंचाई, गावकऱ्यांचा विरोध आणि सरकारचा ससेमिरा यांना तोंड देतच काम करावे लागे. त्यातच त्यांची दोन मुले औषधोपचार वेळेवर न झाल्याने गेली ! दुःख कितीही झाले तरी त्याचे खापर त्यांनी देशसेवेवर फोडले नाही. उलट यामुळे ' मला खेड्यातले जीवन किती खडतर असते ते समजले असं पार्वतीबाई म्हणतात.

गांधींच्या अनेक योजनांपैकी ग्रामसुधाराची योजना नानासाहेबांनी व्रत म्हणून स्वीकारली आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत ते व्रत त्यांनी पाळले.

भारत हा खेड्यांचा देश आहे आणि खेडी सुधारली तरच देशोद्धार आहे हे गांधींनी ओळखले होते. गावोगाव निष्ठावान कार्यकर्ते जाणे आवश्यक होते. त्यात नानासाहेब एक होते; परंतु खेडी म्हणजे जातीयता, अंधश्रद्धा, दारिद्र्य, देवभोळेपणा यांचेच राज्य. आजही त्यात फारसा फरक झालेला नाही. मग ५०–६० वर्षांपूर्वीची परिस्थिती काय असेल ?

साधे चरांचे संडास तयार करायचे तर त्यालाही लोकांची तयारी नसायची. महत्त्व पटवून दिले तरी पटायचे नाही. शेवटी नानासाहेब स्वतः कुदळ घेऊन खणत, तट्टे लावत आणि रोज सकाळी पार्वतीबाई त्या चरांमध्ये माती टाकत.

भजने, साक्षरताप्रसार, खादी, स्वावलंबन या गोष्टी या पति–पत्नींनी आपल्या उदाहरणाने लोकांना पटवून दिल्या,

ग्रामोद्धाराबरोबरच नानासाहेब राजकीय चळवळीचाही प्रचार करत होते. अक्षरशः पायपीट करून गावोगावीं व्याख्याने द्यायचे. देशात काय चालले आहे, आपण काय करायला हवे ते लोकांना सांगत. कित्येकदा तुरुंगात जावे लागे. अशा वेळी पार्वतीबाई स्वतः त्यांचे काम आणि संसार दोन्ही चालवत. एकदा तर दिवस भरलेले असताना त्यांना तुरुंगात जावे लागले, तिथूनच परस्पर दवाखान्यात जाऊन बाळंतपण झाले. १९४२च्या चळवळीतही त्यांनी येरवड्याला भोगलेल्या तुरुंगवासाचे वर्णन रोमहर्षक आहे.

खेड्यातील लोकांच्या अंधश्रद्धा दूर करणे ही फारच अवघड गोष्ट होती. रेडा कापणे ही त्यातलीच एक प्रथा होती. ती नाहीशी करण्यासाठी नानासाहेबांना फार प्रयत्न करावे लागले; पण ते त्यांनी कसे यशस्वी केले हे मुळातूनच वाचायला हवे.

खेड्यातील किती तरी स्त्रिया उत्तम सूत काढतात; परंतु ते देवासमोर जाळतात ते नानासाहेबांना मुळीच पटत नसे. या स्त्रियांना त्यांनी मोठ्या खुबीने या सुताचे कापड विणून त्याचे वस्त्र देवाला वाहण्याची कल्पना सांगून तिची कार्यवाही केली.

स्वातंत्र्योत्तर काळातही सत्तेच्या राजकारणात गुंतून न पडता नानासाहेबांनी आपले जुनेच ग्रामोद्धाराचे कार्य चालू ठेवले. त्याच्या जोडीला ' गांधी स्मारक निधी 'चे कार्यही स्वीकारले.

' हिमालया 'च्या ओढीतून नानासाहेबांनी आयुष्याच्या उत्तरार्धात हिमालयातील लहान गावांमधून कार्य केले. पार्वतीबाई तशा अल्पशिक्षितच होत्या; परंतु हिमालयात राहताना त्या हिंदीतून बोलून सर्वांशी चांगला संपर्क साधत असत. या ऋषितुल्य दांपत्याला सर्वजण अत्यंत आदराने वागवत असत. स्वातंत्र्यपूर्व काळाच्या तुलनेत स्वातंत्र्योत्तर काळात सगळ्या क्षेत्रात दिसणाऱ्या भ्रष्टाचाराबद्दल मात्र दोघांनीही फारसे लिहिले नाही, हाही कदाचित त्यांच्या संयमी व्यक्तिमत्त्वाचाच भाग असेल. वैफल्य, चीड, राग, उसासे नाहीत. म्हणूनही असेल कदाचित पण लेखकाबद्दल आदर दुणावतो.

—सौ. शशिकला उपाध्ये

जागतो संयमी तिथे
शंकर विनायक ठकार व
पार्वताबाई ठकार
मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४.
पृष्ठे १३०, किं. २० रु.

# साहित्याची नवी दिशा दाखविणारा जनसाहित्य विशेषांक

पहिले अखिल भारतीय जनसाहित्य-संमेलन मार्च ८४ मध्ये नागपूर येथे भरले. या संमेलनानिमित्त 'जनसाहित्य समेलन विशेषांक' मार्चमध्ये निघाला. सर्वच दृष्टींनी हा विशेषांक वैशिष्ट्यपूर्ण आहे. या जनसाहित्य संमेलनाच्या निमित्ताने संमेलन विशेषांकांत संपादकीयाच्या निमित्ताने जो मागोवा घेण्यात आला तोही लक्षवेधी आहे.

मराठी भाषेत ललितसाहित्याची जी सुरुवात झाली त्या निर्मितीचे निमित्त पश्चिमेकडून येणाऱ्या साहित्याशी जोडले गेलेले संपादकीयातून दिसते. हा विचार जरी बहुतांशाने खरा असला तरी सर्वस्वी खरा नाही. कै. ह. ना. आपटे जरी मराठी कादंबरी वाङ्मयातील आद्य कादंबरीकार समजले जात असले आणि त्याच संदर्भात प्रसिद्ध नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचे नाव संपादकीयात घेतले गेले असले तरी या दोघांच्या पूर्वीही मराठी भाषेत मराठी कादंबरी आणि नाटक लिहिले गेले आहे आणि त्या साहित्याला पश्चिमेकडील वाऱ्यांचा स्पर्श झालेला नाही. 'मंजुघोषा' ही कादंबरी, किर्लोस्करांचे 'सौभद्र', देवलांची 'शारदा' आणि खाडिलकरांची नाटके हे सर्व साहित्य अस्सल मराठी–भारतीय ललितसाहित्य होय.

परंतु हा इथे चर्चेचा किंवा वादविवादाचा विषय नाही. मुख्य विषय जनसाहित्य आणि त्या अनुषंगाने येणारे विचार हाच आहे. ललितसाहित्याच्या निर्मितीच्या प्रवासात समाजजीवनातील जुने-नवे विचार नेहमीच उपस्थित होत असलेले दिसून आलेले आहेत. ललितसाहित्याच्या निर्मितीचा पट कधीच एका रेषेत, जीवनाच्या एकाच बद्ध आकृतीत किंवा तंत्राच्या आखून दिलेल्या चौकटीत स्थिरावलेला दिसत नाही. तो जसा पूर्व आणि पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या दिशांना संपूर्णपणे बांधला गेलेला नसतो, तसेच त्याला या दिशांकडून वाहात येणाऱ्या वाऱ्यांचे देखील वावडे नसते. नसले पाहिजे आणि कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना हेही पाहिले पाहिजे की वरील प्रकारचा निकषही या मूल्यमापनाला गैरलागू असतो.

गंगाधर गाडगीळ यांनी एका नव्याच कथेचे आपल्याला दर्शन घडविले असे जेव्हा आपण म्हणतो किंवा दुसऱ्या महायुद्धातील परिस्थितीत आणि नंतरही मानवी जीवनाची जी मूल्ये बदलली तिचे पडसाद मर्ढेकरांच्या कवितांमधून उमटून गेले. मानव हा अखिल जगताचा केन्द्रबिंदू होता, त्याची जागा या केन्द्रापासून ढळली आणि तो एक परावलंबी, असहाय्य, क्षुद्र प्राणी बनला असे जे चित्र तेव्हाच्या सर्जनशील, संवेदनाक्षम लेखकाला दिसू लागले त्याचे पडसाद मराठी साहित्यातून तेव्हा उमटलेले दिसतात.

आज तर ती सारीच परिस्थिती बदललेली आहे. यंत्रयुगाने मानवी जीवनाला जसे दुय्यम स्थान दिले तसेच दुसऱ्या एका अर्थाने या युगाने मानवाला समृद्धही केले आहे. या दोन्ही गोष्टींकडे साहित्यिकाने नेहमीच विवेकाने पाहिले पाहिजे. गंगाधर गाडगिळांनी जी नवी, अस्सल, सौंदर्यपूर्ण कथेची सुरुवात केली, तशीच ती ललित साहित्याच्या इतरही शाखांत झालेली दिसून येते. मानवी जीवनाचा आवाका, त्याचा बदललेला पिंड, समाजात झालेली किंवा होऊ घातलेली उलथापालथ या सर्वांचा अत्यंत डोळसपणे या लेखकांनी वेध घेतला. माणूस आणि समाजमन, माणसाचे मन आणि त्याच्यापुढे उभे राहिलेले जीवनविषयक अगणित प्रश्न यांच्या शोधांमधूनच नवसाहित्याचा जन्म झालेला आहे.

श्री. म. माटे काय किंवा व्यंकटेश माडगूळकर काय ? तसेच अण्णाभाऊ साठे, नारायण सुर्वे, आनंद यादव, शंकर पाटील यांनी जे ललितसाहित्य लिहिले ते सारे बदलत्या जीवनाचे कलात्मक चित्रणच होय. उद्धव शेळके यांची 'धग', जयवंत दळवी यांची 'चक्र', मधु मंगेश कर्णिक यांची 'माहिमची खाडी', आनंद यादव यांची 'गोतावळा' आणि अगदी अलीकडची 'नटरंग' ही सारी अशीच उदाहरणे आहेत. बदलत्या समाजव्यवस्थेचे अत्यंत वास्तववादी चित्रण इथे झालेले दिसते. ढवळल्या गेलेल्या खालच्या समाजाचे आणि त्या समाजातील मानवी मनाचे हे जसे चित्रण आहे, तसेच केवळ खेडेगावातीलच नव्हे तर एका संपूर्ण खेड्याचे चित्रण वि. दां. पारगावकर यांच्या 'अंतरिता' या कादंबरीचं झालेले आहे. खेडेगावातील एक ब्राह्मण कुटुंब आणि ते संपूर्ण खेडे, त्यामधील ताणतणाव, जातिव्यवस्थेच्या उतरंडी, त्यांचे व्यवसाय, त्या व्यवसायातील सुखदुःखे या संपूर्ण खेड्याचे एक प्रभावी चित्रण ही कादंबरी करते. तिला एक खास व्यक्तित्व आहे. तिचे स्वतःचे असे तिला एक वातावरण आहे. थोडक्यात म्हणजे वरील प्रकारच्या ललितसाहित्याने समाजजीवनाचा पट विस्तारलेला दिसून येतो.

## समृद्ध अंक

अनेक अंगांनी हे साहित्य फुललेले दिसून येते. मराठी ललितसाहित्याचा इतिहास १९४५ पासून पूर्णपणे बदलून गेलेला दिसून येतो आणि दशकादशकाने तो विस्तारतच आहे.

१९८४ मधील 'जनसाहित्या'चा संमेलन विशेषांक हा एक या बदलत्या साहित्याचा आणि साहित्यविषयक बदलत्या जाणिवांचा जणू वाङ्मयीन इतिहासच आहे. या अंकामधून प्रसिद्ध झालेल्या साहित्याकडे एक ओझरता दृष्टिक्षेप जरी टाकला तरी याची साक्ष सहज पटते. यामध्ये अमृता प्रीतम यांचे जसे साहित्यविषयक विचार आहेत तसेच हिंदीमधील प्रसिद्ध लेखक आणि कादंबरीकार मुनशी प्रेमचंद यांच्या साहित्याचादेखील डोळस आढावा घेतलेला दिसून येतो. तसेच 'सन्त साहित्यातील जनवादाचे अंतःस्तोत्र' हा डॉ. यू. म. पठाण यांचा विचारप्रवर्तक लेखही या अंकाला एक परिमाण देतो. तसेच डॉ. शाम सोनारे यांचा 'संत साहित्यातील जनवादी प्रवृत्ती' हा लेखही महत्त्वपूर्ण वाटतो. हे झाले ललितसाहित्यामधील एक वैचारिक दिशा दाखविणाऱ्या लेखांबद्दल. प्रत्यक्ष कथा–कविता आदींनी या अंकाचे झालेले संपादनही तसे अगदीच सर्वस्पर्शी नसले तरी प्रातिनिधिक आहे.

आजच्या बदलत्या समाजाचे आणि त्या समाजाबरोबरच बदलत्या साहित्यविषयक जाणिवांचे हा अंक म्हणजे प्रातिनिधिक रूपच बनलेला आहे.

त्यामध्ये विशेष लक्ष वेधून घेणारा भाग म्हणजे कादंबरीच्या संदर्भात आयोजित केलेल्या परिसंवादाचा आहे असे म्हणावे लागेल. इथे ज्या चार कादंबऱ्यांच्या लेखकांच्या कादंबरीनिर्मितीमागील प्रेरणा आणि प्रत्यक्ष निर्मितीच्या वेळचे त्या त्या लेखकांचे अनुभव निवेदन करणारे लेख विशेष महत्त्वाचे आहेत. या लेखकांच्या निवडीमध्ये काही मतभेद होण्याची शक्यता असली आणि त्यामुळे हे अनुभव पूर्णपणे प्रातिनिधिक रूप घेऊ शकत नसले तरी अशा प्रकारच्या कामात काही उणीवा या राहणारच.

तसेच जनवादी कादंबरीच्या संदर्भात, संपादक म्हणतात तसे वरील चार कादंबऱ्यांचे रूप आणि त्यांच्या निर्मितीपाठीमागच्या प्रेरणा त्या त्या लेखकांनी न्याहाळल्या, तसेच जनवादी कथेच्या संदर्भातही काही समर्थ मानदंड निर्माण केलेले लेखकही आहेत. त्यामध्ये ज्यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा असे व्यंकटेश माडगूळकर आणि शंकर पाटील हे होत. माडगूळकरांनी तर समग्र ग्रामीण (जनवादी–संपादकाचा शब्द) जीवनाचा, त्यामधील प्रखर वास्तवतेचा अत्यंत कलात्मकतेने वेध घेतलेला आहे. तसेच शंकर पाटील यांनी ग्रामीण जीवनातील स्त्रीचे अत्यंत जिवंत चित्रण केलेले आहे. त्याची दखल या अंकाने घेणे आवश्यक होते.

शेवटी या अंकातील एका महत्त्वपूर्ण लेखाचा उल्लेख करावासा वाटतो. तो लेख म्हणजे 'जनसाहित्य व परात्मतेचा प्रश्न' हा प्रा. विशाखा वडसकर यांचा लेख. परात्मभाव हा जसा मार्क्सच्या सिद्धांतांमधील एक महत्त्वपूर्ण विषय आहे, तसाच तो माझ्या दृष्टीने ललितसाहित्याच्या समीक्षेच्या संदर्भातही महत्त्वाचा आहे. स्वत: प्रा. वडसकर यांनी फार खोलात जाऊन या विषयाची, साहित्याच्या प्रक्रियेमधील आणि आस्वादामधीलही परात्मभावाचे जे स्थान आहे त्याचा विचार या लेखात केलेला नसला तरी ललितसाहित्याला एक नवी दिशा आणि दृष्टिकोण देण्याचे सामर्थ्य या तत्त्वज्ञानात आहे असे मला वाटते. सध्या मी याच विषयावर विचार करीत आहे. या खास अंकात त्या विषयाची निदान चाहूल का होईना व्यक्त झाली या दृष्टीनेही या अंकाचे महत्त्व लक्षात येते. या निमित्ताने जनसाहित्याचा विकास ललितसाहित्य या कलाप्रकाराला समृद्ध करील, अशी या निमित्ताने आशा बाळगण्यास हरकत नाही.

—वि. शं. पारगावकर

जनसाहित्य
संमेलन-विशेषांक, मार्च १९८४
संपादक : मनोहर तल्हार
प्रकाशक : हरिभाऊ केदार, नागपूर
मूल्य : पंधरा रुपये.

# रंगभूमी

## थिएटर युनिटचे नवे नाटक 'हृदय'

वि. भा. देशपांडे

'हृदय' हे श्याम मनोहरांचे नवे नाटक थिएटर युनिट, मुंबई या संस्थेने रंगभूमीवर पेश केले आहे. अद्याप या नाटकाचे प्रयोग मुंबई सोडून अन्य ठिकाणी झालेले नाहीत. (दिनांक २८ एप्रिलचा प्रयोग छबिलदास मुलांची शाळा येथे मी पाहिला.)

आपल्या समाजातील उच्चपदस्थांचा वर्ग. आर्थिकदृष्टीने आणि शिक्षण, व्यवसाय यांच्या संदर्भात उच्च किंवा वरिष्ठ मध्यमवर्गीय असलेला. त्यातले एक कुटुंब. विठ्ठलराव पांगारे यांचे हे कुटुंब तसे आटोपशीर. पत्नी तारा आणि मुलगा प्रफुल्ल. हा प्रफुल्ल एस्सेसीला पहिला, इंटरला पहिला आलेला. आता बी. ई. लाही पहिला यावा यासाठी आईचा जीव कासावीस होतोय. आईवडिलांनी हा प्रश्न प्रतिष्ठेचा केला आहे. पन्नाशीच्या घरात असलेले विठ्ठलराव पांगारे हे अतिशय हुशार गृहस्थ आहेत. अविकसित राष्ट्रांना परवडेल आणि कमीत कमी खर्चात होईल असा एक घराचा नमुना त्यांनी बनवला आहे. या नमुन्याचा (डिझाइनचा) यू. नो. मध्ये गौरव झालेला आहे. हे विठ्ठलराव शासनाच्या बांधकामखात्यात मंत्र्यांचे सचिव आहेत. यांच्या कर्तृत्वाचे सारे श्रेय मंत्री आणि इतरजणच घेऊन जातात. त्यामुळे ते अस्वस्थ आहेत. आपल्या मुलाला इथे चांगली संधी मिळाली नाही तर कॅलिफोर्निया वगैरे ठिकाणी पाठवण्याच्या विचारात आहेत. एका बाजूने हा विठ्ठलराव आपल्या नोकरीच्या संदर्भात पुरेसा भ्रष्ट आहे. त्याने निरनिराळ्या प्रकारांनी लाच घेतलेली आहे. त्यावर श्रीमंतीही आली आहे; पण त्याच्या पत्नीला वाटते की, आपला मुलगा बी. ई. ला पहिला येताना कोणत्याही प्रकारची लाच दिली जाऊ नये, सरळपणाने तो पहिला यावा ! अशा वातावरणात आरंभित झालेले नाटक पांगारे कुटुंबाच्या आणि त्यांच्या मित्रमंडळींच्या जीवनातील अनेक तपशील आपल्याला सांगत राहते.

आजचा आपला समाज कसा आणि किती भ्रष्ट आहे, लाच देणे आणि घेणे हा व्यवहार कसा सहजतेने घडतो, त्यात माणसे कशी रुतून बसलेली असतात त्यांची जीवनदर्शने, वृत्तिदर्शने या नाटकात आहेत. एखाद्या मद्याच्या पार्टीला जमल्यावर आपण 'नॉनकरप्ट' कसे आहोत हे सांगण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. या संबंधातला एखादा तरी प्रसंग प्रत्येकाने सांगावा असे



'हृदय' नाटकात सुनीला प्रधान–मीरा दोशी

ठरते. त्याच वेळी प्रत्येकाच्या ध्यानात येते की, असे काही सांगायचे म्हणजे विशेष प्रयत्नपूर्वक सांगावे लागेल. जे सांगितले जाते ते अगदीच सामान्य असते. याचाच अर्थ आपल्याकडे असे सांगण्यासारखे काही नसते, असते ते केवळ केविलवाणे काही तरी !

या नाटकात भ्रष्टाचार, लाच देणे–घेणे हा विषय जरी दर्शनी वाटला तरी नाटककार त्याहीपेक्षा अधिक खोलवर काही मांडू इच्छितो किंवा सांगू इच्छितो आहे असे जाणवते. ते म्हणजे सधन उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातील आई-वडील मुलांमध्ये इतके गुंतलेले आहेत, ते आपल्या साऱ्या इच्छाकांक्षांचे ओझे त्याच्यावर लादू पाहातात. तो मुलगा ते ओझे फेकून देऊन दुसराच मार्ग स्वीकारतो आहे. अशा या विशिष्ट समाजाला स्वतःच्या देशापेक्षा परदेशात जाणे–येणे अधिक सहज वाटते. आपली मुले-मुली तिकडे जावीत, त्यांनी अधिक पैसा मिळवावा, त्या पैशातून अधिक सुखे मिळवावीत अशी त्यांची अपेक्षा असते. ती सारी मंडळी स्वतःच्या भौतिक सुखाच्या शोधात रमलेली आहेत, त्या नशेतच वावरत आहेत. परस्परांच्या भावना जपण्याचा प्रयत्न करीत आहेत अशा परिस्थितीला छेद देणारा एखादा प्रफुल्लसारखा मुलगा वेगळ्या विचाराचा निघाला आणि त्याने आईवडिलांना, अन्य संबंधितांना त्यांच्या वागण्याविषयी काही प्रश्न विचारले तर ही सारीच मंडळी आतून अस्वस्थ आहेत. या अस्वस्थतेतले नाट्य श्याम मनोहरांनी व्यक्त केले आहे. अशा अवस्थेत असतानाच नाटकाच्या अखेरीला विठ्ठलराव म्हणतो– 'आपण सिंपल जगायचं ढोंग करू, ते जमेल आपल्याला. आपण नॉनकरप्ट जगायचं ढोंग करू, तेही जमेल आपल्याला. आपण प्रफुल्लवर प्रेम करायचं ढोंग करू...'

## चांगला अभिनय, सूचक नेपथ्य

अशा ढोंगी कुटुंबाचे समाजभागाचे वृत्तिदर्शन या नाटकात घडवलेले आहे. आपण वर्तमानात जे जगतो, अनुभवतो, आपल्या भवती जे सतत घडत असते त्यावर तितक्याच विदारक, भेदकपणाने लिहिणे नेहमीच अवघड असते. म्हणूनच अनेक नाटककार भूतकाळात रमणाऱ्या कथावस्तूवर नाटके बेततात किंवा वर्तमानाचा भास निर्माण करून स्वप्नरंजनात गुंग करणारी नाटके लिहितात. अशा नाट्यलेखनाच्या पार्श्वभूमीवर आणि स्वतंत्रपणानेही या नाट्यलेखनाचे महत्त्व विशेष आहे. आणखी एका दृष्टीने श्याम मनोहरांचे लेखन महत्त्वाचे ठरते. त्यातील विषयाचे ताजेपण, नेमकेपण ही आज प्रायोगिक रंगभूमीची गरज आहे. प्रायोगिक रंगभूमीची आजची स्थिती भयाण आहे. राज्यस्पर्धेच्या पातळीवर वार्षिक नाट्यप्रयोग घडण्यापलीकडे स्वतंत्रपणाने असे नाट्यलेखन–प्रयोग घडताना फारच अल्प प्रमाणात आढळतात. अशा वेळी जाणिवेने, स्वतःच्या वळणा-वाटेने जाऊन लिहिणारा, आपले वर्तमान जीवनप्रश्न, जीवनदर्शन वरकरणी हसतखेळत पण आपल्याला अंतर्मुख करायला लावणारे लेखन करणारा नाटककार आज हवा होता, तो श्याम मनोहरांच्या निमित्ताने लाभला आहे. कथा, कादंबरी आणि नाटक अशा तिन्ही वाङ्मयप्रकारात त्यांनी आपल्या लेखनाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या 'बिनमौजेच्या गोष्टी' हा कथासंग्रह, 'हे ईश्वरराव... हे पुरुषराव' ही कादंबरी, 'हृदय'च्या आधीची दोन नाटके यांना योग्य प्रमाणात आणि क्षेत्रात मान्यता लाभली आहे. त्यामुळेच त्यांच्याकडून अधिक नाट्यलेखनाची अपेक्षा आहे.

असे काही वेगळ्या जातीचे नाट्यलेखन असले की, ते सत्यदेव दुबेकडे गेले नाही तरच नवल ! दुबेने या नाटककाराला हेरले म्हणा किंवा नाट्यसंहिता त्याच्याकडे आली म्हणा, दुबेने आपल्या नेहमीच्या पद्धतीने तिचा प्रयोग चोखपणाने पेश केला. त्याच्या नेहमीच्या कलाकारांपैकी सुनीला प्रधान आणि विहंग नायक हे दोघेजण होतेच. त्यांच्या सहज अभिनयपद्धतीविषयी नव्याने लिहिण्याचे कारण नाही. विहंगच्या बाबतीत एवढेच म्हणता येईल की, त्याच्या रंगमंचीय कारकीर्दीतील आणखी एक चांगली भूमिका त्याच्या वाट्याला आली व ती त्याने तितकीच उत्तमपणाने केली. तीच गोष्ट सुनीलाबाबतही आहे. या दोघांच्या साथीला आणखी काही नवे चेहरे या नाटकात दिसले. ते म्हणजे चंद्रकांत बेलोसेकर, मीरा दोशी, गीता जोशी, अरुण गोंदरकर, गौरंग वागळे, अरविंद आडारकर, उदय जोशी, अतुल दाते, गौरंग बळवळी. यामध्ये विशेष ध्यानात राहिले ते चंद्रकांत बेलोसेकर आणि मीरा दोशी. या दोघांनाही चांगले रंगमंचीय व्यक्तिमत्त्व आहे. आवाज, शब्दफेकीची समज उत्तम आहे. याशिवाय आणखी जुनाजाणता कलाकार या प्रयोगात होता तो म्हणजे हेमू अधिकारी. त्याने कमी संवादात आणि

थोडक्या वेळात आपली अभिनय-चुणूक व्यक्त केली.

मूळ नाट्यसंहितेतले नेपथ्य वास्तव किंवा प्रत्यक्षदर्शनी असावे असा उल्लेख आहे; पण दुबेने प्रयोगात मात्र अतिशय सूचक नेपथ्य वापरले होते. काही रंगीत चौकोनी ठोकळ्यांचा वापर, बसण्यासाठी, वस्तू ठेवण्यासाठी केलेला होता. याव्यतिरिक्त कोणतीही वस्तू नव्हती. (कॉफी, दारू यासाठीची काचपात्रे आणि दूरध्वनी वगळता) या सूचक नेपथ्यामुळे प्रेक्षकाचे लक्ष नाट्यप्रसंगावर, संवादावर आवश्यक तेवढे केंद्रित होत होते. नेपथ्य होते उदय जोशी यांचे. त्यांनी हे सारे सूचक नेपथ्य निळ्या कापडाच्या पार्श्वभूमीवर आणि त्यावर मध्यभागी असलेल्या पांढऱ्या पट्ट्याच्या आधाराने उभे केलेले होते. प्रकाशयोजना होती सुनील शानभाग, रवि चारी, संजोग चैंदन यांची.

हे नाटक पाहात असताना जाणवले की, श्याम मनोहर यांचे याआधीचे 'यकृत' हे नाटक 'आताचे 'हृदय' या दोन्हींच्या संहितांवर स्वतंत्रपणे लिहायला हवे. दुबेने त्याची केलेली रंगावृत्ती (खरे तर आहे त्यापेक्षा अजूनही ती संपादित व्हायला हवी.) याचा तुलनात्मक स्वतंत्र विचार करायला हवा. ज्यांना प्रायोगिक नाटकाची आवड आहे किंवा नवे, वेगळे असे काही नाटकात हवे असते त्यांनी दुबेने केलेला 'हृदय'चा प्रयोग आवर्जून पाहावा. □

---

## गार्डनरीच खून प्रकरण : पृष्ठ ४ वरून

विनोदकुमार मेहतांच्या हत्येचे रहस्य संपलेले नाही तर त्या प्रकरणाने आता वेगळे वळण घेतले आहे. विनोदकुमार मेहतांच्या हत्येतील संशयित गुन्हेगार शेख मोहंमद इद्रिस (इद्रिसमियाँ) यास बिहारमधील गया येथे पकडण्यात आले. त्याला कलकत्ता पोलीस हेडक्वार्टर्सच्या लालबझार येथील पोलीसलॉकअपमध्ये नेण्यात आले- अर्थात इद्रिसमियाँच्या बाबतीत पोलीसलॉकअप ह्या काही नवीन प्रकार नव्हता. त्याने तुरुंगाची हवा यापूर्वी बऱ्याच वेळा खाल्ली होती. इद्रिसमियाँ हा फत्तेपूर भागातला मोठा स्मगलर होता. सुरुवातीला अगदीच कफल्लक असलेल्या इद्रिसमियाँने त्याचा स्मगलिंगमध्ये जम बसल्यावर गार्डनरीच भागातील रामनगरलेनमध्ये एक प्लॉट विकत घेतला. थोड्याच काळात त्याने ह्या प्लॉटवर दुमजली इमारत बांधली व तळमजल्यावर आपले ऑफिस थाटले. आपल्या दोन बायकांपैकी एका बायकोबरोबर तो पहिल्या मजल्यावर रहात असे. त्याची दुसरी बायको त्याच्याच इमारतीलगत ज्या झोपड्या होत्या त्यात रहात असे. इद्रिसमियाँचा कार्यक्रम ठरलेला होता. दिवसा तो ऑफिसमध्ये बसून असे. त्या काळात त्याला भेटण्यास येणारांत पोलीस, त्याच्या टोळीतले साथीदार, राजकीय कार्यकर्ते मदत मागण्याकरीता आलेले सामान्य नागरिक यांचा समावेश असे. पोलिसांशी त्याचे लागेबांधे होते. १९७० च्या अगोदर तो बऱ्याच वेळा पकडला गेला. नंतर मात्र पोलिसांशी त्याचे जिव्हाळ्याचे संबंध असल्याने एकदाही पकडला गेला नाही! राजकारण्यांवर तर त्याचा जबरदस्त प्रभाव होता. त्या विभागात त्याला नको असलेल्या पोलीस-अधिकाऱ्यांची बाहेर बदली करण्यासाठी तो राजकीय नेत्यांजवळ रदबदली करत असे. रात्रीच्या वेळी इद्रिसमियाँ कधीच घरी नसायचा. तो त्या वेळेस डॉकमध्ये जाऊन स्मगलिंगच्या व्यापात गुंतलेला असायचा. १६ मार्चला होळीच्या आदल्या दिवशी इद्रिसमियाँने आपल्या एका साथीदाराच्या घरात त्या विभागातील स्मगलर्स व गुंडांची एक मीटिंग घेतली. या मीटिंगमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, आपल्या धंद्यावर संक्रांत आणणाऱ्या व मुस्लिमविरोधी असलेल्या पोलीसउपआयुक्त विनोदकुमार मेहतांना खलास करावयास हवे. शिवाय इद्रिसमियाँची मेहतांशी वैयक्तिक दुष्मनी होतीच. १९८३ मध्ये कलकत्ता कस्टमच्या सहाय्याने मेहता यांनी या विभागात बऱ्याच धाडी घालून इद्रिसमियाँचे चार-पाच लाखांचे वैयक्तिक नुकसान केले होते. एकदा मेहतांना खलास करण्याचा प्लॅन तयार करण्यात आल्यावर मग मेहतांना जाळ्यात कसे पकडायचे याबद्दल विचार झाला. हिंदु-मुस्लिम यांच्यात दंगा पेटवून हे काम करता आले असते. पूर्वतयारी म्हणून रामनगरलेनमध्ये एका गोठ्यात बाँबचा साठा करण्यात आला. नारळ चोरण्यावरून जे भांडण निर्माण झाले ते मिटवूनसुद्धा इद्रिस आणि त्याच्या साथीदाराने ते उकरून काढले व ज्या विभागातील मुलांनी नारळ चोरले होते तो विभाग लुटण्यात आला. १८ मार्चला दंगा चालू असता इद्रिसमियाँने स्टेनगन घेऊन घर सोडले. घटना घडली तेव्हा तेथे हजर असलेले सांगतात की, इद्रिसमियाँ स्टेनगन घेऊन एका घराच्या गच्चीत गेला व तेथून त्याने आपल्या गुंड साथीदारांना मार्गदर्शन केले. जेव्हा विनोदकुमार मेहता व त्यांचा बॉडीगार्ड त्याला (इद्रिसमियाँ) गल्लीमध्ये एकाकी दिसले तेव्हा त्याने आपले मेहतांना खलास करण्याचे काम पुरे केले! इद्रिसमियाँने नंतर पोलीसजबानीत आपण मेहतांची हत्या केल्याचे नाकबूल केले असले तरी तो हत्येच्या वेळेस तेथे हजर होता व हे कृत्य बाहेरच्यांनी केल्याचे त्याने सांगितले. असे सांगतात की, पोलीसजबानीच्या वेळेस इद्रिसमियाँने या हत्येमागे कोण पडद्याआडचे सूत्रधार होते त्यांची नावे सांगितली. त्याचप्रमाणे एका फॉरवर्ड ब्लॉकच्या नेत्याचेही या संदर्भात नाव घेतले!

इद्रिसमियाँला २६ मार्चला गया जिल्ह्यात पकडण्यात आल्यावर त्याला २८ मार्चला सकाळी कलकत्ता येथे आणण्यात आले व अलीपूर येथील सबडिव्हिजनल ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात उभे करण्यात आले. तेथे त्याला पोलीसकस्टडीत ठेवण्याचा आदेश देण्यात आला. जेव्हा इद्रिसला सकाळी कोर्टात नेण्यात येत होते तेव्हा लालबझार येथे कॉन्स्टेबलसच्या एका ग्रुपने त्याच्या विरोधी घोषणा व शिव्यांची लाखोली वाहिली. नंतर कोर्टातून जेव्हा त्याला परत आणण्यात आले तेव्हा पुन्हा एकदा सशस्त्र कॉन्स्टेबल्सनी त्याच्याशी धक्काबुक्की केली. नंतर सीनियर पोलीसऑफिसर्सनी परिस्थिती आटोक्यात आणली. त्यांच्या एका वरिष्ठ सहकाऱ्याचा (विनोदकुमार मेहता) खून झाल्याने पोलीस इद्रिसवर संतप्त झाले होते. नंतर इद्रिसला मर्डरस्क्वाडच्या खोलीत नेण्यात आले. मर्डरस्क्वाडचा प्रमुख दीपक रॉय याने एक तास इद्रिसची जबानी घेतली. इद्रिस हा कसलेला गुन्हेगार असल्याने तो साध्या उपायाने

बघत नाही हे पाहून मग त्यामध्ये पारंगत असणाऱ्या पोलिसांना व अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले. मग त्याला बेड्या घालून वर टांगण्यात येऊन ( दाराच्या बिमला ) यथेच्छ झोडपण्यात आले. त्याच्या ओरडण्याचा आवाज जोरजोरात मर्डररवकाडच्या खोलीतून ऐकू येत होता. थोड्याच वेळाने इद्रिसचा आवाज येईनासा झाला. सेंट्रल लॉकअपचे डॉक्टरांना बोलवण्यात आले. इद्रिस हा जमिनीवर पडलेला व त्याच्या तोंडातून रक्त येत असलेले डॉक्टरांना दिसले. इद्रिसची अवस्था पाहून डॉक्टरांनी त्याला ताबडतोब हॉस्पिटलमध्ये हलवण्याची शिफारस केली; परंतु इद्रिसला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी तेथून हलवण्यापूर्वीच त्याचे निधन झाले. ताबडतोब वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यांनी त्याला हॉस्पिटलमध्ये हलवले. इद्रिसला ज्या हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले त्या कलकत्ता मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलच्या इमर्जन्सी डिपार्टमेंटच्या रेकॉर्डनुसार इद्रिसला हॉस्पिटलमध्ये रात्री आठच्या सुमारास मेलेल्या अवस्थेत आणण्यात आले. त्या रेकॉर्डमध्ये इद्रिसच्या अंगावर ज्या जखमा होत्या त्याचीही नोंद होती. त्याची बॉडी पोस्टमार्टेमकरता पाठवण्यात आली होती. पोलिसांनी नेहमीप्रमाणे इद्रिसचे हृदयविकाराने निधन झाल्याचे जाहीर केले व त्याला ही व्याधी पूर्वीपासूनच असल्याचे सांगण्यात आले. प. बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसु यांनी विधानसभेत सांगितले की, इद्रिसने बऱ्याच जणांना उघडे पाडले असते आणि काही जणांना बहुदा हे आवडले नसते. डाव्या आघाडीचे नेते (अध्यक्ष) सरोज मुखर्जी यांनी इद्रिसच्या पोलीसकस्टडीतील निधनाचा निषेध केला व काही वरिष्ठ पोलीसअधिकाऱ्यांना याबद्दल जबाबदार धरले. विधानसभेत विरोधी पक्षीयांनी या प्रश्नावर गदारोळ माजवून ज्युडिशियल इन्क्वायरीची मागणी केली व ती सरकारने फेटाळताच सभात्याग केला. पोलिसांनी इद्रिसमियाँच्या निधनाचे जे कारण दिले होते ते पटण्यासारखे नव्हते. एक अशीही आवई उठवण्यात आली की, इद्रिसला पोलिस-लॉकअपमध्ये इतर कैद्यांनी बेदम मारले त्यामुळे त्याचा अंत झाला. याचे कारण काय तर इद्रिसमियाँमुळे त्यांना पोलिसांचा त्रास सहन करावा लागत होता.

## सूत्रधार नामानिराळे

'आनंद बझार पत्रिका' या कलकत्याच्या प्रचंड खप असलेल्या दैनिकात इद्रिसच्या पोस्टमॉर्टेम रिपोर्टबद्दल कलकत्ता शहरातील नावाजलेल्या डॉक्टरांची मते छापून आली होती व त्यात त्यांनी इद्रिसचे निधन हृदयविकाराने झाल्याच्या रिपोर्टवर आपली असहमती प्रगट केली होती. एका वकिलाने या पोस्टमॉर्टेम–रिपोर्टबद्दल संशय आल्याने कलकत्ता हायकोर्टात पेटिशन दाखल केले. त्याचा निकाल नुकताच लागला असून न्यायमूर्तींनी मेडिकलबोर्डातर्फे या पोस्टमॉर्टेम–रिपोर्टची छाननी करण्याचा आदेश दिला आहे. त्याचप्रमाणे प. बंगाल सरकारला कारणे दाखवा नोटीस पाठवण्यात आली असून इद्रिसमियाँ–प्रकरणी इंडिपेंडंट सेंट्रल एजन्सीद्वारे चौकशी चालू करण्यात का येऊ नये अशी विचारणा करण्यात आली आहे. प. बंगाल सरकार या प्रकरणी अडचणीत येण्याचे कारण म्हणजे त्यांच्या डाव्या आघाडीच्या सरकारमधील फॉरवर्ड ब्लॉक या घटक पक्षाचे नेते व विधानसभेचे उपसभापती कलीमुद्दीन शम्स हे या प्रकरणात गोवले गेले आहेत. इद्रिसमियाँने मरणापूर्वी दिलेल्या जबानीत असे म्हटले होते की, 'मला, पोलिसांना शरण यायचे होते; परंतु डाव्या आघाडीचे नेते असलेल्या एका व्यक्तीने जो माझा नातेवाईक आहे, मला बिहारमध्ये (गया) पाठवले. हा नेता दुसरा–तिसरा कोणी नसून शम्सच आहेत याबद्दल आता सर्वांची खात्री पटली आहे. शम्स यांचा कॉंग्रेस, मार्क्सवादी कम्युनिस्ट, फॉरवर्ड ब्लॉक असा राजकीय प्रवास झालेला आहे. ते गार्डनरीचजवळच्या परिसरातून निवडून येतात. ते मूळचे बिहारचे असून कित्येक वर्षे बंगालच्या राजकारणात आहेत. फॉरवर्ड ब्लॉकचे निधी जमवण्याचे एक मोठे आधारस्तंभ म्हणून ते ओळखले जातात. इद्रिसमियाँ त्यांना चांगला ओळखत होता व त्यांचे इद्रिसमियाँकडे जाणे–येणे होते. बांगलादेशमधून बंगालमध्ये (गार्डनरीच विभागात) जे मुसलमान अनाधिकृतपणे घुसले त्यांना रेशनकार्ड देण्यासाठी शिफारसपत्रे देण्यात शम्स हे आघाडीवर होते. त्यांचे त्या विभागातील स्मगलर्सशी संधान होते व या स्मगलर्सना विनोदकुमार मेहता सतावत असल्याने शम्स हे मेहतांवर नाराज होते. या प्रकरणी शम्सचे नाव घेण्यात आल्याने मुख्यमंत्री ज्योती बसू यांनी शम्सना खूप छेडले; परंतु शम्सनी आपल्यावरील आरोपांचा इन्कार केला. त्यांच्या खुलाशाने बसू यांचे समाधान झाले नाही. विधानसभेत व बाहेर सर्वांनी शम्सवर टीकास्त्र सोडले. यात प्रथमतः शम्सची बाजू घेणारे फॉरवर्ड ब्लॉकचे सदस्यही सामील झाले. मेहतांचा ज्या दिवशी खून झाला त्यामध्ये संशयित आरोपी इद्रिसमियाँ बिहारमधील गया जिल्ह्यात पळाला. या इद्रिसमियाँला गयाला पळवण्यात शम्स यांचा हात होता असे बोलले जाते. शम्स यांचे मूळ गाव गयाजवळच आहे. शम्सही मेहतांचा खून झाला त्या दोन–तीन दिवसांत कलकत्याबाहेर होते. अर्थात आपण या काळात आपल्या नातेवाइकाच्या लग्नाकरता उत्तरप्रदेशात गेलो होतो असा त्यांनी खुलासा केला. इद्रिसमियाँचा लॉकअपमधील मृत्यू हा हृदयविकाराने झाला नाही या तर्काला पाठबळ देणारे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे तो कित्येक लोकांना आवडत नव्हता. विशेषत: पोलीसअधिकारी, राजकारणी या लोकांचे इद्रिसमियाँशी जे घनिष्ट संबंध होते त्यामुळे लॉकअपमध्ये तो फार काळ रहाणे त्यांच्या दृष्टीने धोक्याचे होते. पोलीसजबानीत त्याने या लोकांना एक्सपोज केले असते व त्यातील काही लोकांची त्यामुळे तुरुंगातही रवानगी झाली असती. इद्रिसमियाँचा मृत्यू (पोलीसकस्टडीतील) हा हृदयविकाराने झाला की पोलिसांच्या मारहाणीमुळे झाला याबाबत सत्य परिस्थिती यथावकाश बाहेर येईलच; परंतु असे अनेक इद्रिसमियाँ मारले जातात; परंतु त्याला जबाबदार असणारे पडद्यामागचे सूत्रधार मात्र नामानिराळे रहातात हीच खरी शोकांतिका आहे!

# नाटयपंढरी

## ' मौजे 'ची निवडणूक !

त्या काळात भागवतबंधूंचे ' मौज ' हे आपल्या गुणविशेषांनी लोकप्रिय झालेले साप्ताहिक होते. काही काळ अनंत हरि गद्रे (झुणका—भाकर फेम नि नंतरचे समतानंद) हे त्याचे संपादक होते. त्यांचा वारसा अच्युतराव कोल्हटकरांचा. अनंतराव नुसतेच संपादक नव्हते तर एक जाहिरातपटूही होते. वृत्तपत्रव्यवसायात नेहमीच काही तरी नवीन, सनसनाटी करून दाखविण्याची त्यांना हौस. मौजेत ' रंगभूमीचा रागरंग ' हे एक सदरच त्यांनी टाकले होते. त्यात नाटकांच्या पुस्तकांचे नि प्रयोगांचे परीक्षण, कंपन्यांच्या मुक्कामांची माहिती, नव्या नाटकमंडळ्यांची स्थापना, जुन्यांची फाटाफूट, नट—नाटककारांविषयी खुसखुशीत बातम्या असा भरगच्च मजकूर असे. मराठी रंगभूमीचा तो वाजता—गाजता काळ होता. बालगंधर्व, दीनानाथ, पेंढारकर, बोडस, पोतनीस, टिपणीस, दाते, फाटक, कोल्हटकर, शाळिग्राम आदी अनेक नामवंत नटमंडळी ( गायक नि गद्य ) आपआपल्या भूमिकांनी रंगभूमी गाजवीत होती.

या वेळी अनंतरावांनी एक नवीन टूम काढली. मौजेत एक आवाहन केले की, वाचकांनी आपल्या आवडीच्या पहिल्या पाच संगीत नि प्रोज नटांची नावे, गुणानुक्रमाने लिहून आमच्याकडे पाठवावी. स्पर्धेचा निकाल ' मौज ' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केला जाईल. त्याबरोबरच आपण सुचविल्याप्रमाणे स्पर्धेचा निकाल लागल्यास आपलीही नावे दिली जातील. झालं ! दहा—पंधरा दिवसांत पत्रांचा पाऊस पडला ! दिवाळी अंकात निकाल जाहीर झाला. गायकनटात सहाजिकच अग्रपूजेचा मान बालगंधर्वांचा होता. ते पहिले आले ! प्रोज नटात नटवर्य दाते हे पहिल्या नंबराने निवडून आले. गायक नट प्रथम क्रमांक—नारायणराव बालगंधर्व ! प्रोज नट प्रथम क्रमांक—केशवराव दाते !

## द्रौपदीची कर्णफुले तारामतीला

बालगंधर्व हे लाड—कुटुंबीयच समजले जात. ( सॉलिसिटर लाडसाहेब दुर्गाबाई खोटे यांचे वडील ) गंधर्वमंडळीचा मुक्काम मुंबईत असला की, मग काही विचारायलाच नको; पण लाडकुटुंब उन्हाळ्याच्या सुटीत महाबळेश्वरला गेलं की,लाडसाहेब नारायणरावांना आवर्जून बोलावून घेत, इतके घरोब्याचे संबंध होते त्यांचे. दुर्गाबाईंच्या आईला ते अक्का म्हणत. द्रौपदी—नाटकाच्या वेळी अक्कांपासून जुन्या पद्धतीची सोन्याची कर्णफुले नि जयपुरी लांब लोंबते डूल त्यांनी घेतले होते. अक्कांनीही मोठ्या प्रेमाने ते त्यांना दिले होते. द्रौपदीच्या भूमिकेत ते त्यांना फार सुरेख दिसत. पुष्कळ वर्षं ते बालगंधर्वांकडेच होते. अक्कांनीही कधी मागितले नाहीत.दुर्गाबाईंनी पुढे ' अयोध्येचा राजा ' या चित्रपटात काम स्वीकारले. तारामतीचा मेकअप झाल्यावर त्यांना द्रौपदीच्या—बालगंधर्वांच्या त्या सुंदर कर्णफुलांची सहाजिकच आठवण झाली. त्यांनीही तेवढ्याच लाडिक दृष्टीने नारायणरावांजवळ ते मागितले. त्यांनी आपल्या बानूताईला ( दुर्गा खोटे ) तितक्याच प्रेमाने दिले. दुर्गाबाईंनाही तारामतीच्या भूमिकेत ते फार शोभून दिसले. इतक्या वर्षांनी आईचे डूल लेकीकडे आले. द्रौपदीचे डूल तारामतीला मिळाले !

## पृथ्वीराज नि हिराबाई

पृथ्वीराज कपूर हे चित्रपटसृष्टीचे ज्येष्ठ नि श्रेष्ठ कलावंत म्हणून जरी प्रसिद्ध असले तरी ते मूळचे रंगभूमीचे अभिनेते. हिंदी रंगभूमी त्यांनी गाजविली होती. इंग्रजी नाटकांतूनही त्यांनी समर्थ भूमिका केल्या होत्या. ' पृथ्वी थिएटर्स ' ही त्यांची स्वतःचीच नाटयसंस्था होती. दीवार, गद्दार, पठाण, पैसा अशी दर्जेदार नाटके त्यांनी सादर केली होती. त्यांना मराठी नाटकांचीही खूप आवड होती.

एकदा कोल्हापूरच्या पॅलेसथिएटरमध्ये ( आताचे केशवराव भोसले नाटयगृह ) ते सौभद्र पहायला आले होते. पहिल्या रांगेत मधल्या सीटवर त्यांना बसविले होते. नटसंच सुरेख होता. बालगंधर्व—अर्जुन, हिराबाई बडोदेकर—सुभद्रा, मा. कृष्णराव—नारद, लोंढे—कृष्ण. प्रयोग छान रंगत होता दुसऱ्या अंकातील हिराबाईंचे ' व्यर्थ मी जन्मले ' सुरू झाले नि पृथ्वीराज सारखे आपल्या घड्याळात पहात होते. मग ' वद जाऊ कुणाला ', ' अरसिक किती हा शेला ' ही पदे होताच वन्समोअर पडत होते. इकडे पृथ्वीराज अधिकच अस्वस्थ होत होते. पडदा पडताच पृथ्वीराज धावतच आत गेले. हिराबाईंचे खूप कौतुक केले नि म्हणाले, 'ताई, तुम्ही इतका वेळ,उभ्या राहून गाता कशा याचे खरेच मोठे आश्चर्य वाटते ! नाही तर आमच्या सिनेमात तीन मिनिटांच्या गाण्यासाठी नटयांचे कोण नखरे ! त्यांनी पुढे हिराबाईंनी गायलेली मीराबाईंची हिंदी भजने टेप करून घेतली होती. विश्रांतीच्या वेळात ते आवर्जून ती भजने ऐकत असत.

## आधी नाटक मग सीन !

कुबेराचे वैभव नि कर्णाचे औदार्य एकत्र नांदले ते बालगंधर्वांच्या रूपाने ! रंगदेवतेच्या पूजेअर्चेत कधी काही कमी पडू दिले नाही. रसिकांना अवमानिले नाही. जे जे काही केले, ते ते रंगदेवतेच्या नि रसिकांच्या सेवेसाठीच. ' आनंद भरीन—' अशी जणू शपथ घेऊनच, त्यांनी ' आनंद ' लुटला, नि ती लूट असंख्य रसिकांना अखेरपर्यन्त पुरली. मग त्या कुबेराला कर्ज झाले म्हणून आम्ही मामुली माणसांनी का कुरकुर करायची ? नाही नाही ते पाप आहे. त्याची टीकाटिप्पणी आम्ही काय करायची !

गंधर्व कंपनीने ना. वि. कुलकर्णी यांचे ' कान्होपात्रा ' नाटक बसवायचे ठरविले. पंढरपूरचा देखावा अगदी हुबेहुब पंढरपूरसारखा झाला पाहिजे हे नारायणरावांचे पहिल्यापासूनचे मत. मग खर्च किती का येईना ! स्वयंवरासाठी खऱ्या जरीने जडविलेले गालीचे आले द्रौपदीत डोळे दिपवणारी मयसभा उभी केली. त्याला काय थोडा खर्च झाला होता ? मग ' कान्होपात्रा ' ला विठोबाचे देऊळ का नको ? हवेच ! पंढरपूरच्या विठ्ठलमंदिराबरहुकुम सेट तयार करण्याचे काम सुरू झाले. नाटकाचा प्रयोग लागण्याची वेळ आली, तरी मंदीर तयार होतच होते. तुळया, कमानी घडत होत्या. अखेर एका जुजबी सीनवर प्रयोग करावा लागला. प्रेक्षकांना तो सीन पसंतही पडला; पण मनासारखे विठ्ठलमंदीर प्रेक्षकांना दाखविल्याखेरीज नारायणरावांना कसे चैन पडणार ? नाटकाचे किती तरी प्रयोग झाल्यावर, ते मंदिर एकदा उभे राहिले. खरे म्हणजे लोक येत होते ते बालगंधर्वांचा अभिनय पहायला, त्यांचे गाणे ऐकायला का सीन पहायला ? पण नाही. सगळं कसं अगदी जिथल्या तिथे हवं ! अखेर पंधरा-सोळा हजार रुपयांचा चुराडा होऊन ते मंदिर रंगमंचावर मांडले गेले, तेव्हा बालगंधर्वांचा जीव भांड्यात पडला. याचेच नाव बालगंधर्व !

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

## पाच नवी प्रकाशने

### बलसागर

**श्री. ग. माजगावकर**

तीस रुपये

राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

### डॉ. आयडा स्कडर

**सौ. वीणा गवाणकर**

बावीस रुपये

ग्रामीण भागात डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

–एक होता कार्व्हरच्या लेखिकेचे दुसरे पुस्तक.

### पूर्णिया

**अनिल अवचट**

बारा रुपये

अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

आवृत्ती तिसरी

### लेक वालेसा

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

बावीस रुपये

यंदाचे नोबेल प्राईझ विजेता लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

### मला निसटलंच पाहिजे

**अनुवाद : श्रीकांत लागू**

वीस रुपये

दुसऱ्या महायुद्धातील एका चित्तथरारक पलायनाची कथा

### राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०